

# एक वादळ शांत झालं



□ □ □ □ □ □ □

**माणूस**

□ □ □ □ □ □ □

शनिवार
४ सप्टेंबर १९७१
पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ४ सप्टेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | चौदा | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

□ 'माणूस'चा विशेषांक नुकताच वाचून संपवला आणि खूप समाधान झाले.

'पाटीलवाडी, पाडळदे आणि शहादे' या भागातल्या आदिवासींच्या करुण कहाण्या, त्यांचे हक्क, त्यांना माणस म्हणून (न) मिळणारी किंमत–हे सारं वाचून मन विषण्ण झाले.

आज ना उद्या तिथे नक्षलवाद फोफावला तर त्याचे आश्चर्य वाटणार नाही; हे एकदम तर्कशुद्ध वाटतें. 'माणस'ने ह्या विषयाला वाचा फोडली हे खास अभिनंदनीय.

याबरोबर एक सूचना (विनंती) करावीशी वाटते. ती म्हणजे या बाबतीत लक्ष ठेवून वेळोवेळी अधिक माहितो 'माणूस'च्या वाचकांना उपलब्ध करून द्यावी. कुणाच्यावतीने, कुणीतरी चव्हाटच वर बोंब मारणे आवश्यक आहे. त्यालाही काही निश्चित अर्थ आहे, असे वाटले.

श्री. रवींद्र पिंगे यांचेही अभिनंदन. 'शतपावली' अधिकाधिक रंगत आहे. या वेळी खासच उर्वरित भागाबद्दल 'नाकदुऱ्या' काढणे शक्य नाही. श्रीयुत कर्नल जाधव यांची हजेरी व कामगिरी विशेष डोळयात भरते. ग्यानबांची 'मुक्ताफळे' नियमित मिळणार काय? मिळावीत अशी अपेक्षा. 'कविता' सदराकडेही दुर्लक्ष होऊ नये. आणि भविष्य पुन्हा सुरू करण्याच्या भानगडीत पडू नये.

'माणूस'च्या संपादक महाशयांचे लेखन म्हणजे 'माणूस'ची शान आहे. अधून मधून अशीच वाचकांना भेट द्यावी. ही मनःपूर्वक विनंती...

१९ ऑगस्ट, १९७१ — मोहन मुळे, नागठाणे (सातारा)

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

अरुण गोसावी

# मुंबई वार्ता

## महाराष्ट्र सरकारचा 'गरिबी हटाव' कार्यक्रम

नव्या काँग्रेसच्या महाराष्ट्र शाखेने नाशिक शिबिरानंतर जो प्रचंड पंधरा कलमी कार्यक्रम जाहीर केला होता तो पाहून सारे हसले होते. आपणही टिंगल केली होती. इलेक्शन स्टंट म्हणून त्या कार्यक्रमाची कुचेष्टा केली होती.

आता हसण्याची पाळी काँग्रेसवाल्यांची आहे. महाराष्ट्र सरकारने गेल्या महिनाभरात या कार्यक्रमावर आधारित असे जे भराभर निर्णय घेतले ते स्तिमित करणारे आहेत. इलेक्शनसाठी असो, की आणखी कशासाठी, पण हे जे निर्णय नाईक सरकारने घेतलेले आहेत त्यांनी समाजातील कनिष्ठ वर्गाचे कल्याण होणार आहे ना? मग केवळ त्या निर्णयांसाठी सरकारचे कौतुक केले पाहिजे. त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावीपणे होते ही गोष्ट वेगळी.

ग्रामीण भागात मागेल त्याला काम देण्याची हमी, शेतमजुरांना निश्चित वेतनाची हमी, शेतसाऱ्याची रक्कम सारीच्या सारी ग्रामपंचायतींना बहाल, हे ग्रामीण भागातील पददलितांच्या कल्याणाचे काही निर्णय. तर औद्योगिक व सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना योग्य प्रतिनिधित्व, बोनस व प्रॉव्हिडंट फंडाची योजना सर्व संस्थांना लागू करणे व शहरी मालमत्तेवर कमाल मर्यादा घालणे हे आणखी काही महत्त्वाचे निर्णय.

हे निर्णय खरोखर अत्यंत महत्त्वाचे आहेत यात शंकाच नाही. ग्रामीण भागात मागेल त्याला काम देण्याची हमी घेतल्याने ग्रामीण बेकारी नाहीशी होण्याच्या मार्गाला लागेल आणि हीच योजना शहरी भागांनाही पुढे लागू केली तर—आधुनिक युगातला स्वर्ग—स्वर्ग असा आणखी कोणता बरे? मागेल त्याला काम—बस्स्! आज भारतामध्ये लाखोंच्या संख्येने शिक्षित, अर्ध-शिक्षित व अशिक्षित बेकार नोकऱ्यांच्या शोधात टाचा घाशीत हिंडत आहेत. राज्यसरकारच्या या निर्णयाने निदान ग्रामीण भागातल्या बेकारांना तरी काम मिळेल. आधुनिक स्वर्गाच्या दिशेने टाकलेले हे पहिले पाऊल होय.

शेतमजुरांना निश्चित वेतनाची हमी दिल्याने या समाजाने पिळलेल्या अत्यंत गरीब वर्गाला मोठाच दिलासा मिळेल. सध्या महाराष्ट्रात सुमारे ५७ लाख शेत-

मजूर आहेत. या सर्वांना कामाची हमी आणि निश्चित वेतन! केवढे प्रचंड हे काम! एवढे केल्यानंतर जर हे लोक सरकारच्या पाठीमागे ठामपणे उभे न राहिले तरच नवल.

शहरी मालमत्तेवर कमाल मर्यादा घालण्याचा निर्णयही असाच क्रांतिकारी आहे. ही मर्यादा किती असणार हे जरी निश्चितपणे बाहेर आले नसले तरी वीस हजारांवरील वस्तीच्या गावी पाचजणांच्या कुटुंबावर ही मर्यादा पाच लाख रुपयांची राहणार असल्याच्या बातम्या आहेत. मुंबईच्या कोटयाधीशांच्या पोटात आत्ताच गोळे उठले असणार.

व्यवस्थापनामध्ये कामगारांना प्रतिनिधित्व देण्याची योजना सध्या सरकारी उद्योगधंद्यांना, कॉर्पोरेशन्स्ना आणि सहकारी कारखान्यांनाच लागू होणार. पण ही पद्धती सर्वंकष व्हावी अशी महाराष्ट्र सरकारची इच्छा आहे. आणि तशा प्रकारचा कायदा करण्यासंबंधी राज्यसरकारने दिल्लीला लिहिले आहे. नोकरवर्गाच्या संख्येची मर्यादा न जुमानता बोनस आणि प्रॉव्हिडंट फंडाच्या तरतुदी सर्वच व्यापारी कंपन्यांना लागू होणार आहेत.

तेव्हा, आत्तापर्यंत बड्या शेतकऱ्यांचे हस्तक, समाजवादी बुरख्याखाली प्रतिगाम्यांचा अड्डा म्हणून हिणविल्या गेलेल्या महाराष्ट्र सरकारने हे असे धडाडीचे पुरोगामी निर्णय घेतले आहेत. व त्यामुळे साऱ्या डाव्या–उजव्या पक्षांचे आवाज एकदम बंद झाले आहेत. सरकारच्या या निर्णयांचे कौतुक केल्याखेरीज त्यांना गत्यंतर नाही. निर्णयांची अंमलबजावणी होणार की नाही, कितपत होणार, त्यातून पळवाटा किती निघणार, वगैरे टीका विरोधी पक्ष करू शकतात. तसेच गेली दहा वर्षे समाजवादाच्या नावाने माळ जपत पेंगुळलेल्या महाराष्ट्र कॉंग्रेसला एकाएकी खडबडून जाग कशी आली म्हणून चितायुक्त आश्चर्य व्यक्त करू शकतात. पण नाईलाजाने का होईना, सरकारची पाठ थोपटण्याचे कडू काम त्यांना केलेच पाहिजे.

आतापर्यंत कॉंग्रेस काय करीत होती हा मुद्दा गैरलागू आहे. तसेच इंदिरा गांधींच्या प्रेरणेने जी नवी हवा देशात निर्माण झाली आहे त्याचाच परिपाक या निर्णयात झाला. इंदिराबाई नसत्या तर महाराष्ट्र कॉंग्रेसने एवढे धाडस दाखविलेच नसते वगैरे मुद्देही पोकळ आहेत. सरकारने रोखठोक निर्णय घेतले आहेत हे नाकबूल करून चालणार नाही. कारणे काहीही असोत.

हां–एक गोष्ट विचारली जाऊ शकते. शहरी संपत्तीवर मर्यादा घालण्यास आतुरलेले सरकार ग्रामीण संपत्तीच्या बाबतीत का माघार घेते? जमीनधारणेची मर्यादा खाली आणायला महाराष्ट्र सरकारचा कडाडून विरोध आहे. असे का? नोकरी करणाऱ्या कारकुनालाही उत्पन्न कर भरावा लागतो. पण शेतीवर लाखांनी उत्पन्न काढा. मरण नाही. शेतीच्या उत्पन्नावर पट्टी आहे. पण ती बसते बत्तीस ते छत्तीस हजार रुपयांच्या वर! हा विरोधाभास का? शहरी मालमत्तेवर मर्यादा

बसणार तशी ग्रामीण संपत्तीवर का नको ? की ग्रामीण सधनता नव्या समाजवादात बसते. वगैरे प्रश्न विचारले जाऊ शकतात.

या प्रश्नांना अजूनतरी महाराष्ट्र सरकारजवळ योग्य उत्तर नाही. महाराष्ट्राचे बहुतेक मंत्री ग्रामीण धनिक आहेत हे तर त्याचे उत्तर नसेल ? महाराष्ट्र कॉंग्रेसची बडी नेतेमंडळीदेखील अगदीच शेतमजूर नव्हेत. गाठीला बऱ्याच जमिनी आणि सहकारी संस्था बांधून आहेत. त्यामुळे तर असा हात आखडला जात नसेल ?

तेव्हा समाजवादाच्या नावाने एका पायाने उडी मारायची आणि दुसऱ्या पायाने लंगडायचे अशी अर्धवट धावपळ कितपत यशस्वी होईल याचाही सरकारने विचार केला पाहिजे. जमीनधारणेच्या मर्यादेचा सरकार विचार करीत आहे. पण या शंका-कुशंका बळावण्यापूर्वीच सरकारने निर्णय घेतला पाहिजे.

शहरी मालमत्तेवर कमाल मर्यादा घालण्याचे केंद्रसरकारचे धोरण आहे. व त्याप्रमाणे दिल्लीतून एक नमुना विधेयकही या विषयावर प्रसृत केले होते. त्याच्याच आधारावर महाराष्ट्र सरकारने स्वतःपुरता निर्णय घेऊन एक पायंडा पाडला. केंद्र सरकारच्या नमुना विधेयकात दहा हजार लोकवस्तीवरील कोणत्याही गावात ही मर्यादा बसविली होती. महाराष्ट्र सरकारला वस्तीची ही अट वीस हजारावर न्यायची आहे म्हणे. (म्हणजे ग्रामीण धनिकांना अधिक वाव ?)

या साऱ्या गडबडीमध्ये महाराष्ट्र मंत्रिमंडळाने सर्व राज्यात शिक्षण समान पातळीवर आणण्याचा एक महत्त्वाचा निर्णय घेऊन टाकला हे बरे झाले. आतापर्यंत विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये माध्यमिक शिक्षण दहावीपर्यंत असायचे. दहावीनंतर एस्. एस्. सी. ची परीक्षा. त्यानंतर एक वर्षाचा प्री-युनिव्हर्सिटी अभ्यासक्रम आणि मग तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम. पश्चिम महाराष्ट्रात मात्र माध्यमिक शिक्षण अकरावीपर्यंत चालायचे. त्यानंतर एस्. एस्. सी. असे विद्यार्थ्यांचे एक वर्ष जादा जायचे. त्यामुळे पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या, सैनिकी संस्थांच्या परीक्षांना बसताना वयाची अट लवकर आड यायची आणि पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे नुकसान व्हायचे. खरें म्हणजे हा निर्णय आधीच घ्यायला हवा होता. ◻ ◻ ◻

---

## काही सीनिक विचार

◻ १९७२ सालासाठी महाराष्ट्र कॉंग्रेसने आपला खुंटा हलवून बळकट केला.

◻ मुख्यमंत्री नाईक यांनी बहात्तरनंतरही आपली खुर्ची पक्की राहील अशी व्यवस्था करून ठेवली.

◻ विरोधी पक्षांनो, आता बोला; तुमचा प्रोग्राम काय ?

सीनिक लोकांच्या तोंडी लागण्यात अर्थ नसतो.

---

# हसरी हंसा

गजानन जागीरदार

आज, सोमवार २३ ऑगस्ट रोजी एका कलंदर स्त्रीच्या जीवनाची यात्रा संपली.

सतत सुखाचा शोध घेत भटकणारी व नेमक्या दुःखाला, प्रथम अनवधानामुळे आणि नंतर बेदरकारपणे, कवटाळणारी कलावंत नटी अखेर मृत्यूच्या मिठीत विसावली.

'सांगत्ये ऐका' असं धाडशी आव्हान करणाऱ्या हंसाच्या आयुष्याची कथा आज समाप्त झाली. पूर्णविराम पावली.

तिला अश्रू ढाळताना, मनस्वी कष्टी होताना मी अनेकदा पाहिली. पण आठवण येताच डोळ्यांसमोर चित्र उभं राहतं ते तिच्या हसऱ्या रूपाचं, हसऱ्या डोळ्यांचं. 'हसरी हंसा'...वरेरकर मामांनी अगदी योग्य नाव ठेवलं होतं.

'रामशास्त्री'चं शूटिंग चालू असताना कंपनीने माझ्या राहण्याची सोय कंपनीच्या 'गेस्ट हाउस'मध्ये केली होती. सगळ्यात जास्त हवेशीर मोठी अशी कोपऱ्यावरची खोली निवडून मी त्या बंगल्यात राहात होतो. एका संध्याकाळी स्टुडिओतून परतलो तेव्हा त्या खोलीत माझं सामान नसून दुसऱ्या कुणाचं होतं. मी बघतच राहिलो. मागून हसण्याचा आवाज आला. वळून बघतो तोच ती म्हणाली, 'मी हंसा. तुमचं सामान पलीकडच्या खोलीत हलवलं आहे. मी या मोठ्या खोलीत राहणार आहे. कारण माझ्याबरोबर माझी बेबी आहे, आया आहे. चालेल ना ?' आणि ती हसली. तीच तिची प्रतिमा आजही डोळ्यांसमोर येते.

गुलामांच्या बाजारात तिला गुलाम म्हणून नाचायचं होतं. नाचाची तयारी बेताबात. पण जिद्दीने ती नाचायला शिकली. खूप श्रम घेतले. वेळ निभावून नेली.

नंतर ती पेशव्यांच्या अस्थी घेऊन रामशास्त्र्यांकडे येते, तो सीन घ्यायचा होता. अभिनयाच्या दृष्टीने हा सीन खूप अवघड होता. मला तिच्या अभिनयाचा आवाका माहीत नव्हता. मी तिच्या बाबतीत साशंक होतो. त्या सीनची आधी तालीम

घेण्याची माझी इच्छा होती; पण वेळ मिळाला नाही. सीनला सुरुवात झाली. ती म्हणू लागली, 'शेस्त्रीबाबा, मला वाटलं व्हतं, या आगीला मी मी म्हननारं भितील, कारबारो दबतील, सारं दरबारो शेपटी वाकवतील, पण तुम्ही ? तुम्ही वाग हायसा ! येका झापंसरशी धन्याचा जीव घेणाऱ्या कोल्याचं नरडं फोडाल !'

तिच्या जिवंत अभिनयाचा साक्षात्कार मला त्याच वेळी झाला.

'रामशास्त्री 'नंतर 'बैरमखान ' या मुगलकालीन चित्रपटाचं दिग्दर्शन माझ्याकडे आलं. त्यात पोरसवदा अकबर बादशहाच्या आईचं काम मी हंसाला दिलं. तिच्या अभिनयाबद्दल मला आता खात्री होती, पण अरबी–फारसी–प्रचुर उर्दू भाषा ती बोलू शकेल असं कोणाला वाटेना. त्या दृष्टीने तिची तयारी करून घ्यायची, असं मी मनाशी ठरवलं. तिचे संवाद महिनाभर आधी तिला देण्यात आले. काही दिवसानंतर तिला तालमीसाठी बोलावण्यात आलं. तिचे संवाद तर पाठ झाले होतेच पण उर्दू उच्चारही ऐकणाराला थक्क करणारे होते. नंतर कळलं की, तिनं तेवढ्या वेळात एका मौलवीची शिकवणी ठेवून तासन् तास श्रम घेतले होते; आम्हाला चकित करण्यासाठी !

त्यानंतर तिची प्रमुख भूमिका असणारा 'राजकमल 'चा 'रामजोशी ' हा चित्रपट खूपच गाजला. आपल्या लग्नाच्या बायकोला टाकून शाहीर रामजोशी ज्या तमाशातील बाईच्या नादी लागला, तिची भूमिका हंसाला मिळाली होती. अशा विरोधी भूमिकेतही प्रेक्षकांची सहानुभूती मिळवणं यातच तिच्या अभिनयाची आणि व्यक्तिमत्त्वाची कसोटी होती. त्या चित्रपटाच्या यशाचा फार मोठा वाटा तिच्याकडे आला, यात नवल नाही.

तिची भूमिका असलेला त्यानंतरचा गाजलेला चित्रपट म्हणजे अनंत माने दिग्दर्शित 'सांगत्ये, ऐका. ' या चित्रपटाची सुरुवात तर अतिशय बहारदार होती. मान्यांच्या दिग्दर्शन–कौशल्याला चंद्रकांत व हंसा यांनी उत्तम साद दिली. त्यांच्या मुखसंवादात जिव्हाळा होता. त्यांच्या चालण्याबोलण्यात विलक्षण सहजता होती. त्यांचे डोळे खूप खूप बोलून जात होते.

त्याप्रमाणेच या चित्रपटाचा शेवट ज्या सवालजवाबांनी केला गेला ते सवाल-जवाब हंसाच्या तोंडूनच वदवले गेले. घडलेल्या कथानकाची पुनरोक्ती होत असताही प्रेक्षक जागच्या जागी खिळून राहिला ही करामत कवी ग. दि. माडगूळकरांची तर खरीच पण हंसाच्या आवेशपूर्ण अभिनयाचीही म्हणता येईल.

तिच्या अभिनयाच्या सीमा चित्रपटापुरत्या सीमित होत्या असं नाही. दैनंदिन जीवनातही तिच्या अभिनयकलेचा प्रत्यय येत असे. जे घडलं नाही ते घडलं असल्याची किंवा जे घडलं ते घडलं नसल्याची बतावणी करण्यात तिचा हातखंडा होता. हेतू हा की समोरच्या माणसाला वाईट वाटू नये. पण त्याही पलीकडे एक मानसिक Compulsion तिला असं खोटं वागण्यास भाग पाडीत होतं, असं मला

आढळून आलं. तिला त्या बाबतीत विचारलं असता तिनंच मला सांगितलं की ज्या वातावरणात तिचं बालपण गेलं तिथे खोटं बोलणं, खोटं वागणं आणि ते यशस्वी-पणे पचविणं यातच भूषण समजलं जात असे. कलावंतिणीच्या परिसरात यशस्वी पणे जगणाऱ्या सर्वांनाच या मार्गाचा अवलंब करावा लागतो. कारण त्यांना भेटणारे पुरुष बहुधः चोरटेपणानं आपली वाट काढीत त्यांचेकडे आलेले असतात. ते सारे व्यवहार तिने बालपणातच पाहिले होते व त्या तऱ्हा वागण्याचं मर्मही तिला कळलं होतं. त्या वयात घडलेले संस्कार इतके दृढ असतात, त्या वेळची घडण इतकी मजबूत असते की त्या मुशीतून बाहेर पडणं अशक्यप्राय होतं.

सुदैवानं नंतरच्या आयुष्यात तिला साहित्यिकांचा, कलावंतांचा आणि सुसंस्कृत लोकांचा सहवास मिळाला आणि अपुरं शिक्षण असूनही ती पूर्वाश्रमीच्या पुष्कळशा जाळ्या जळमटांना बाजूला सारू शकली. तिच्यातला कलावंत फुलू लागला असताना, यश आणि किर्तीच्या पायऱ्या ती झपाट्याने चढत असता, जर तिला समजून घेणारा, तिचं कोडकौतुक करणारा, तिच्यावर अवलंबून नसणारा, तिच्या-पेक्षा श्रेष्ठ असा जीवन-साथी तिला मिळाला असता तर तिच्या आयुष्यात घडलेले अनेक 'अपघात' टळले असते हे निश्चित. कारण चिखलातून बाहेर पडणाऱ्या कमळाचा दिमाख तिच्या व्यक्तिमत्त्वाला आला होता. त्याचं चीज होईल अशी तिची परिस्थिती मात्र नव्हती.

विवाह-बाह्य संबंधांचा मोह विचारवंतांना आणि बुद्धिमंतांनाही होतो कारण त्याचा उगम निसर्गाच्या रचनेतच आहे. समाजाची घडी शाबूत ठेवण्यासाठी माणसानं स्वतःवर बंधनं घालून घेतली आहेत, ती पूर्णपणे पाळण्याची शक्ती एखाद्यात असते, एखाद्यात नसते. आपल्याकडील स्त्रियांत ती पुष्कळशी असते. हेही खरं. पण ज्या समाजातनं हंसा वर आली आणि ज्या आगीत तिचा संसार करपला गेला, ते लक्षात घेता जर ती संयमात कमी पडली तर ते क्षम्यच आहे असं म्हणावं लागेल.

'सांगत्ये ऐका' हे आत्मकथन म्हणजे हंसानं शेवटचं आणि मोठं धाडस. बहुतेक आत्मचरित्रं म्हणजे आत्मसमर्थनं असतात. या पुस्तकातही आत्मसमर्थन अजिबात नाही असं नाही. प्रत्येकाला आपण घेतलेली भूमिका योग्य होती असंच वाटत असतं. तीही एक बाजू असते जी मांडण्याची संधी आत्मचरित्रकाराला मिळालेली असते आणि ती संधी उपेक्षणीय खास नाही.

पण आत्मचरित्रात आपण जसे नाही तसे आहोत असं भासवण्याचा प्रयत्न जे करतात त्यातली हंसा नव्हे. तिला जवळून जाणणारे लोकदेखील कबूल करतील की तिनं आपली प्रतिमा यथार्थ उभी केली आहे. तसं करताना, विशेषतः एका स्त्रीला, जे मनोधैर्य लागतं ते तिच्यापाशी होतं यात शंका नाही. कथनाच्या बारीक सारीक तपशिलात चुका झाल्या असतील. नव्हे झाल्याही आहेत. पण दुसऱ्यावर

चिखल उडविण्यासाठी किंवा कुणावर आकस धरून मुद्दाम त्या केल्या आहेत असं म्हणता येणार नाही. ज्या व्यक्तींचा उल्लेख आहे तो त्या व्यक्तींबद्दल योग्य तो आदर बाळगून, ज्या व्यक्तींना दोष दिला आहे तो कटुता न येऊ देता व ज्यांनी तिच्यावर मायेची पाखर धरली त्या व्यक्तींत उणीवा असल्या तरी त्या दाखवताना त्यांच्याबद्दल प्रेमभाव बाळगूनच सर्व लिहिलेलं आहे, अशी जाणीव झाल्याशिवाय राहात नाही.

'एवढं सगळं झालं तरी माझा त्यांच्यावर विश्वास आहे. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते मला ओळखतात. नाही पटलं माणसाचं संसारात म्हणून तो मनुष्य वाईट आहे असं नाही. आमचे धागे जुळू शकले नाहीत एवढंच. ते मला समजू शकले नाहीत. कदाचित मी त्यांना समजू शकले नसेन...मला खात्री आहे, आत्ताही जरी त्यांना कळलं, की मी दुःखात आहे तर माझ्यासाठी ते प्रत्यक्षपणे अप्रत्यक्षपणे धावून येतील.'

आपल्या दुरावलेल्या पतीबद्दल तिचे वरील उद्गार तिच्या उदार समंजसतेची साक्ष देत नाहीत का ?



## शनिपावली

रवींद्र पिंगे

# एक वादळ शांत झालं

हंसाबाईंच्या किर्तीची खरी झांज वाजली ती 'रामजोशी'तल्या बया कोलाटणीच्या रूपाने पायातले चाळ छुमछुम करीत. रूपेरी पडद्यावर त्या अवतरल्या तेव्हाच. बाई रूपाने बर्फीचा मोठा कंडा तुकडा होत्या अशातला भाग बिलकूल नाही. लचकणं, मुरडणं, डोळे मोडणं, हेही काही अफलातून होतं असं नाही. तिरपे हसरे कटाक्ष मारून – मारून मिनाक्षीने बाईंच्या अगोदर कितीतरी वर्षं रसिकांच्या झुंडीच्या झुंडी घायाळ करून टाकल्या होत्या. रजतपटावरल्या कारकिर्दीच्या बाबतीत हंसाबाई मिनाक्षीला कितीतरी वडील; मग भले त्या मिनाक्षीपेक्षा वयाने लहान असोत. आल्या आल्याच मिनाक्षी जेव्हा प्रेक्षकांवर गारूड करीत होती, तेव्हा गरजू हंसाबाई उमेदवारीचा कातळ फोडीत होत्या; कमजोर ललाटलेखांचे दिशाहीन धनी असलेल्या उन्मादी मंडळीत कॅम्पिंग करीत होत्या. त्यांनी बाईंची ज्वानी यथेच्छ लुटून घेतली. तशी ती त्यांना थोडीबहुत दुसऱ्यांनी लुटायलाही लावली होती हेही खोटं नाही. पण त्या उन्मादी उपभोगपर्वांत त्यांच्यातल्या कलावंताची धार पाजळून निघाली नाही. उपभोग कोण घेत नाही? मर्द मनाचे सारेच कलावंत त्याच एका तंद्रीत असतात. पण हंसाबाईंच्यामधल्या कलावंताचं चीज झालं नाही. ते ग्रहण 'रामजोशी'ने सोडवलं. मुदलात बाईंचं हसणं मोहकच होतं. बयाचं दुटांगी लुगडं नेसलेलं नखरेल रूप त्यांनी घेतलं तेव्हां मादकतेच्या अत्तराचे चार थेंब त्यात अनायासे पडले आणि बाईंच्यातल्या कलावंतानं नशीब

फळफळलं. बाईंच्या मादक आणि छचोर नजरेने प्रेक्षकांवर साक्षात मंत्र टाकला. केवड्याच्या पातीसारख्या सणसणीत यष्टीचाही त्यांना भांडवली फायदा झाला. कारण रूपाचं लावण्य, नजरेची धुंद मादकता आणि पायातल्या चाळांचा आमंत्रक छंद, ह्यांचा त्रिवेणी संगम झाल्याबरोबर तारूण्य शाबूत असलेला रसिकवर्ग बाई-वर अक्षरशः फिदा झाला. त्यातही नंबर एकची उत्तम गोष्ट अशी झाली, की आमच्या पिढीने तारूण्यात पाऊल टाकायला आणि बाईंचे कुर्रेबाज पवित्र्यामधले मोठे मोठे रंगीत पोस्टर्स नाक्यानाक्यावर लटकायला एकच गाठ पडली! बहर-लेल्या फुलझाडाकडे प्रेमाची भाषा कळू लागलेली तरूणी ज्या आतुर नजरेने पाहाते, त्याच कुळीतल्या आशाळभूत नजरेने आम्ही बाईंचे जाहीरातीतले फोटो डोळे फाड-फाडून पाहिले नाहीत असं मुकटा नेसून आता सांगण्यात काय हशील आहे? खरी गोष्ट अशी आहे की आम्ही बाईच्या उफाड्यावर भुललो. ह्याचा एकतर्फी फायदा असा झाला की बाईंचे चित्रपट आम्ही तहानभूक हरून परत परत पाहीले. आमची पिढी एका अनुपम आनंदाची धनी झाली. एकाअर्थी बाईंच्या वैभवाचाच असा तो काळ होता. बाई किती, म्हणजे किती लोकप्रिय होत्या त्याची एक चुणूक सांगतो. बाईंनी भुमिका केलेल्या 'लग्नाची बेडी'चे ओळीने बाराशे सदतीस प्रयोग अलम महाराष्ट्रात झाले. मावळलेल्या पिढीतले स्त्रीपार्टी नट सोडले, तर लोक-प्रियतेच्या हंसाबाईचा हा उच्चांकी विक्रम अजून तरी कुणी मोडलेला दिसत नाही. ठेकेदारांनी बाईंच्या खेळावर रात्रीगणिक चार चार हजार रुपयांचा गल्ला सतत गोळा केलेला आहे. आता, तेव्हाच्या रात्री कशा होत्या, ठेकेदार कोण होते आणि त्यांनी कसले कसले खेळ आरंभिले, त्यातून फळाला काय आलं, वगैरेची साक्ष त्यांच्या आत्मचरित्रात ओळीओळीतून हुंदक्या हुंदक्यागणिक मिळू शकते. मात्र विजयपर्वात ते हुंदके नव्हते. विजयपर्वाच्या ऐन मध्यावर आम्ही बाईंना पाहिलं. तृप्त झालो.

नंतर बाईंबद्दलच्या कंड्यांचं पेंव फुटलं तेव्हाही ओठावरून जीभ फिरवीत आम्ही कानात प्राण गोळा केलेच. सर्व थेर करून थकलेल्या बाई आता देव-देव करतात, बोटातून पिंजर काढतात, इथपासून तो बाई एका छुप्या बदफैली अड्ड्यात आहेत, इथपर्यंतचे सारे प्रकार कानावरून गेले. 'सांगत्ये ऐका!' ह्या छतफाडू विजयी चित्रपटांचा एक अनाकलनीय अपवाद वजा केला, तर बाईंची लोकप्रियता दिवसागणिक कमीकमी होऊं लागली आहे हे दिसतच होतं. अखेरच्या वनवासपर्वात उफाडा हरवून बसलेल्या बाई किती, म्हणजे किती अप्रिय होत्या त्याचं एक उदाहरण. बाईंच्या नावाचे बोर्ड टांगलेले असूनसुद्धा त्यांनी भुमिका केलेल्या बबन प्रभुंच्या 'माणूस खाणारी कोंबडी' ह्या फार्साचे धड पाच खेळ बघायलाही प्रेक्षक आले नाहीत. कुठे ओळीने रंगवलेल्या बाराशे सदतीस धुंद रात्री, नि कुठे इन मीन तीन प्रयोगांना मोठ्या शिकस्तीने जोडलेल्या उसन्या अवसानाच्या दोन

कोमट रात्री ! ह्याच पराभवपर्वात मी त्यांना हताश अवस्थेत जवळून पाहीलं. बिवटच्या वाघासारख्या जमिनीला पोट घासटत पळणाऱ्या लठ्ठ मोटारीत त्या पुढे बसलेल्या दिसायच्या. बाजूला चाकावर सिनेस्टार राजन जावळे असे. त्याचीही दशाच झालेली होती. मूळचं राजबिंडेपण पूर्णपणे मावळलेलं होतं. अगदी खरं सांगायचं तर त्या जोडप्याला पाहून मी चरकलोच ! होय जोडपं हाच शब्द बरोबर आहे, कारण राजनने दारू सोडून द्यायला सांगितल्यानंतर दारूचा घोट गिळायला ठाम नकार दिल्यामुळे पहिल्या यजमानांच्या संसारातून आणि घरातून बाहेर पडावं लागलेल्या हंसाबाईंचा आणि पहिल्या संसारातून मोकळे झालेल्या राजन (बाबा) जावळे यांचा पाचलेगांवकर महाराजांच्या मुलुंडच्या आश्रमात विधीपूर्वक विवाह झाला होता. मी त्यांना प्रथम पाहिलं तेव्हां त्या सौ. जावळे म्हणून कुंकू लावीत होत्या. भरतीचं पाणी फिरलेल्या खाडीच्या काठावर मात्र आता त्या बसलेल्या होत्या. त्यांच्यापुरती तरी उन्हं आता मावळत होती. मी त्यांना त्यांच्या आत्मचरित्राचा, एका बाजूने खूष असलेला आणि दुसऱ्या बाजूने त्यातल्या काही जहाल मजकूराच्या सत्यतेबद्दल दाट संशय असलेला असा वाचक म्हणून भेटलो.

ती भेट डोळ्यासमोर ताजी आहे.

संध्याकाळच्या शेंदरी किरणांनी शिवाजी पार्कवरल्या डॉ. पुरंदऱ्यांच्या इस्पितळातली ती कडेची खोली उजळून निघाली आहे. खिडकीतून झाडांचे गप्प शेंडे दिसत आहेत. पांढऱ्या स्वच्छ बिछायतीवर पांढरा अेप्रन घातलेल्या बाई हातात अडकित्ता घेऊन पडल्या आहेत. बाजूला पोथी आहे. कुंकवाची कुयरी आहे. जपमाळ आहे. भिंतीवर शंकराची जटासर्पधारी तसबीर आहे. बाई ओळखीचं हसतात. मात्र त्यात फारसा जीव नाही. त्या कंटाळलेल्या दिसतात. नमस्कार चमत्कार होतात. मी दबकत विचारतो,

'बाई, मराठी साहित्याच्या संदर्भात विचार केला तर तुमचं आत्मचरित्र स्फोटक वाटतं. आता मनुष्य स्फोटकच मजकूर का निवडतो ह्याची अनेक मानसिक कारणं असतात. एखाद्या पराक्रमी माणसाचा उत्तर आयुष्यात पराभव होतो. तो कलावंत असला तर लोकांनी आपल्याला विसरू नये असं त्याला उत्कटतेने वाटतं. तेव्हा, आपल्याकडे बळेच लक्ष वेधून घेण्यासाठी मीठमसाला लावून कलावंत स्फोटक मजकूर तयार करतो. किंवा, अपयशी कलावंताला मानसिक विकृती जडतात. त्या विकृतीतून आनंद मिळविण्यासाठी कलावंत चिखलफेक करतो. कधी कधी न्यूनगंडाने नकळत हैराण झालेला कलावंत पोकळ वढाया मारण्यासाठी स्फोटक लिहितो. काही काही वेळा लैंगिक अनुभवांच्या आठवणी चघळण्यातही कलावंत तंद्री अनुभवतो. कधी कधी पुस्तक खपावं इतका साधाच उद्देशही असतो. असे अनेक प्रकार आहेत. तुम्ही आत्मचरित्रात स्फोटक का लिहिलं ?'

'माझ्या आयुष्यात स्फोटक गोष्टी घडल्या. त्या मी स्वच्छपणे सांगितल्या.'

'तुमच्या आयुष्यातल्या झाडून सगळ्या स्फोटक गोष्टी तुम्ही लिहिल्यात ?'

'नाही. काही भयानक गोष्टी सत्य असूनही, मला लिहाव्यात असं वाटलं नाही.'

'का ?'

'कारण त्या ज्या व्यक्तींच्या संदर्भात होत्या त्या व्यक्तींची सुरळीत चाललेली आजची यशस्वी जीवनं मुद्दाम गढूळ करावीत असं मला वाटलं नाही.'

'मग काही लोकांचीच आयुष्यं तेवढी गढूळ करण्याचा निर्णय तुम्ही घेतलात तर !'

'मला त्यांची आयुष्यं गढूळ करायची नव्हती. मला सत्य सांगायचं होतं.'

'पण त्यामुळे तुम्ही काही निवडक माणसांचं निवडक सत्य सांगितलंत.'

'असेलही.'

'तुम्ही आत्मचरित्र का लिहिलंत ?'

'मला पैशांची फार गरज होती. पुस्तक लिहिणं हा पैसे मिळविण्याचा एक चांगला मार्ग आहे.'

'पैसे मिळविणं एवढाच हेतू होता ?'

'नाही. चित्रपटसृष्टी सध्या कामवासनेने फारच बरबटलेली आहे. तेव्हा नव्या होतकरू मुलामुलींना, विशेषतः चित्रपटात पदार्पण करू इच्छिणाऱ्या तरुण रूपवान मुलींना मी धोक्याचा लाल कंदील दाखवावा असंही मला वाटलं. म्हणून मी आत्मचरित्र लिहीलं.'

'कामवासनेने पछाडलेल्या पुरुषांचे जे तुम्हाला अनुभव आले तसेच इतरही नटींना आले होते ?'

'दुसऱ्यांबद्दल मी काय सांगू ? तुम्ही तर्काने ओळखा.'

'चित्रपटसृष्टी सर्रास बरबटलेली आहे ?'

'त्याबद्दल मी पुस्तकात खुल्लंखुल्लं लिहिलं आहे. कलावंत स्त्री तिथे भ्रष्ट होणारच. पण आता मला तसल्या विषयात काही रस उरलेला नाही.'

'सत्प्रवृत्त माणसं तुम्हाला चित्रपटसृष्टीत अजिबात आढळली नाहीत ?'

'काही सज्जन तिथे भेटले. त्यांच्यापैकी बहुतेक बंगाली होते.'

'स्फोटक मजकूर लिहिल्याबद्दल तुमच्यावर फिर्यादी वगैरे झाल्या ?'

'नाही. काही मंडळी रुष्ट झाली. उदाहरणार्थ धुमाळ. पण मी खरं ते लिहून मोकळी झाले. इतरांना काय वाटलं त्याचा विचार करणं मी सोडून दिलं.'

'सध्या तुम्ही कसला विचार करता ?'

'देवाचा. शंकर हे माझं दैवत आहे. मी त्याचंच चिंतन करते. शिवाय हा संसार आहेच. मुलींचीही काळजी आहेच. घरात कमी का होईना, पण वेळेवर आणि नियमीत पगार आला पाहिजे. पैसे नसले तर माणसाची फारच ओढाताण होते, नाही ?'

'खरं आहे. ह्या पुढच्या काळात तुम्ही काय करायचं मनाशी ठरवलं आहे ?'

'मरणार !'

'असं नका बोलू. तुम्ही जगणार आहात.'

'छे हो ! हे माझ्या जीवावरचंच आजारपण आहे. एक एक दिवस मी मोजत्याय.'

'मी असं करतो, माझे एक कविमीत्र आहेत. त्यांना ज्योतिष्याचं अंग आहे. त्यांना मी इथे घेऊन येतो.'

'या. मी वाट पाहते. आजपर्यंत शेकडो ज्योतिषी झाले. आता तुमचा ज्योतिषी काय उजेड पाडतो पाहूया.'

ज्योतिषाला घेऊन मी बाईंच्या भेटीला परत गेलो. दरम्यानच्या काळात मी बाईंच्या आत्मचरित्रावर 'मनोहर'मध्ये परिक्षण लिहिलं होतं. त्यात मी म्हटलं होतं, 'चित्रपटसृष्टीत सदाचार हा अपवादात्मकच असतो; तिथली एकूण प्रवृत्ती कलावंताला बेईमानपणाकडे, गरजवंतांना उदंड लाचारीकडे, बुद्दूंना चमचेगिरीकडे, सत्ताधिशांना सौदेगिरीकडे आणि सरसकट सर्वांनाच भ्रष्टविण्याकडे खेचून नेणारी आहे, ही हंसाबाईंच्या अनुभवसिद्ध विचारधारेची सम आहे. मदिरापान केल्याचं, ज्वानी लुटू दिल्याचं, किंवा परपुरुषाशी रत झाल्याचं त्यांनी खुल्लंखुल्लं लिहिलं आहे, ते चविष्ट वाटेल. तथापि त्या अनुभवांचं वेगळेपण एका वाचनानंतर ओसरून जातं. दीर्घकाळ स्मरणात राहतो तो ह्या शोकांतिकेचा एकाकी नायक जगन्नाथ बंदरकर ! नियतीनं त्याच्या भाळी केविलवाणेपणाचाच टिळा टेकवायचा चंग बांधलेला ह्या आत्मचरित्रावरून दिसतो. एके काळी पाणी जाळलेल्या हंसा वाडकरांनी कहाणी ही जेवढी त्याच्या स्वतःच्या असफलतेची आणि निःश्रेयसत्तेची आहे, त्याहीपेक्षा अधिकांशाने, बंदरकरांच्यातल्या सतत डोकं वर काढणाऱ्या पुरुषाच्या हुंदक्यांचीच आहे. ह्या सव्वाशे पानात, चोहोकडून जमत चाललेल्या काळोखाचे ते दूर कोपऱ्यात उभे राहिलेले फक्त शापित साक्षीदार ठरले आहेत !' माझा हा निष्कर्ष बाईंना मंजूर झाला नाही. प्रकरण एवढ्यावर मिटलं नाही. त्या गुरगुरल्या. पण शांत, संयमीत शब्दात. आपली नापसंती दाखविताना त्यांनी मला विचारलं,

'तुम्हाला असं-असं लिहा असं मी सांगितलं होतं ?'

त्यांच्या प्रश्नाचा उद्देश मला कळला नाही. मी विचारलं,

'म्हणजे ?'

'म्हणजे काही नाही. पण अशा लिहिण्याने गैरसमज वाढतात. संबंधित माणसांना वाटायचं की मीच तुम्हाला तसं लिहायला सांगितलं आहे.'

बाईंचं हे बोलणं गैरलागू होतं. पण मी प्रकरण तेवढ्यावरच जिरवलं कारण शब्दाने शब्द वाढून ज्योतिषी मधल्यामध्ये खट्टावला असता. मग बाईंनी उशाखालून कुंडलीचा कागद काढला. ज्योतिषाने तो नीट न्याहाळला नि होरा वर्तवायला

पृष्ठ ५८ वर

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## खुर्ची कुणाची?

एका गुजराती मासिकात एक मिनी-कथा पाहिली. ती जशीच्या तशीच सांगाविशी वाटते.

एक जहाज समुद्रातून प्रवास करीत होतं. अचानक एक भलीमोठी मगर जहाजाच्या मागंमागं येऊ लागली. तिला भूक लागली होती हे जहाजाच्या कॅप्टनने ताडलं. त्याने तातडीने सर्व प्रवाशांची सभा बोलावली. म्हणाला – मगरीला भूक लागलीय्. ती सारं जहाज उलटं करील. त्यापेक्षा आपणापैकी कोणातरी तीनजणांनी इतरांच्या रक्षणार्थ आत्मबलिदान करावे. पण त्यासाठी स्वेच्छेने कोणीच तयार होईना. म्हणून मग चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. कर्मधर्मसंयोगाने त्याच जहाजाने प्रवास करणाऱ्या तीन मंत्र्यांच्याच नांवाच्या चिठ्ठ्या निघाल्या. आता त्यांना मगरीच्या तोंडात जाणंच भाग होतं.

गंमत अशी की तिघांना गिळूनही मगरीचा 'आ' आपला वासलेलाच. कॅप्टनला फार राग आला. इकडे तिकडे तो पाहू लागला. जवळच पडलेली एक खुर्ची त्याने मगरीच्या दिशेने भिरकावली. ती तिने अचूक तोंडात पकडली. पण तीच्या दोन्ही जबड्यात ती पक्की फसून बसली. मग खलाशांनी मगरीला दोराने बांधून आवळले. तिच्या तोंडात अडकलेल्या खुर्चीच्या बाजूने कॅप्टनने सहज टॉर्चचा प्रकाशझोत फेकला, व पाहातो तो काय–

ते तिघेही मंत्री मगरीच्या तोंडात अडकलेल्या खुर्चीसाठी आपा:सात भांडत होते.

## भाव चढतील .... कुठपर्यंत?

पाच वर्षापूर्वी दहा सिगरेटच्या एका पॅकेटची किंमत ६० पैसे द्यावी लागे ती आज डबल द्यावी लागत आहे. चढत्या भावाचं हे एक उदाहरण. आमच्या टॅक्सवाल्यांच्या दृष्टीने हे चढते भाव योग्यच आहेत. थोडेसे भाव चढले म्हणून कुठे बिघडलं असं आम्हालाही वाटतं. परंतु पुढच्या पिढ्यांचा विचार करण्यात रात्ररात्र जागून काढणारे एक गृहस्थ आहेत. त्यांनी ह्या बाबतीत बराच लांबलचक हिशोब

केलेला आहे. ते म्हणाले – ह्या प्रमाणात भाव वाढत राहिले तर १९७६ मध्ये ह्याच सिगरेटच्या पॅकेटची किंमत २ रु. २० पैसे राहील. १९८१ मध्ये ती ४ रु. ४० पैसे, २००१ साली ती ७० रु. ४० पैसे, २०२१ साली २८१ रु. ३० पैसे आणि २०४१ साली ती ११२५ रु. ६० पैसे पर्यंत जाईल. मग २०६१ साली ह्याच सिगरेटच्या पॅकेटची किंमत किती होईल हो ? असे विचारले असता ते गृहस्थ म्हणाले त्याचा विचार करण्याची जरूर नाही. आता हे आश्चर्यच नव्हे काय ? जो गृहस्थ २०४१ सालच्या किंमतीचा हिशोब करु शकतो त्याला २०६१ सालच्या पिढीला किती खर्च करावा लागेल ते सांगणे तर मुळीच कठीण नसावे. पण मग त्या गृहस्थांनी खुलासा केला. म्हणाले – त्याचा व्यावहारिक दृष्ट्या काही उपयोग नाही. कारण झाफर फतेहा ह्या विख्यात 'नॅचरॅलिस्ट'ने म्हटले आहे की सध्या हवा ज्या प्रमाणात अशुद्ध होत आहे त्याला अनुसरुन २०४८ सालानंतर कोणीच जिवंत राहणार नाही. ह्याला पुरावा म्हणून त्या गृहस्थांनी एक वर्तमानपत्र उघडून त्यातील ही बातमी असलेले पान आमचेसमोर धरले. आम्ही यावर मग काहीच बोलू शकलो नाही. पण आम्हाला एकच आनंद झाला की २०४८ साली केवळ अशुद्ध हवेने मरण्यासाठी आपण मुळी जिवंतच राहणार नाही !

## ह्यांचेही थोडे कौतुक कराल ?

बांगला देशचे निर्वासित, स्वातंत्र्ययुद्ध खेळणारी शूर माणसे व चतुर मुत्सद्दी नेते इत्यादींबद्दल आपण खूप वाचतो आणि ऐकतो. पण जे भारताला भारभूत होऊ इच्छित नाहीत उलट जी काय थोडीशी कमाई होईल त्यातून आपल्या आवश्यक गरजा भागवून बाकीचे सारे आपल्या देशबांधवांच्या प्रीत्यर्थ खर्चतात अशा लोकांचा मात्र उल्लेख देखील होत नाही.

कलकत्त्यात बांगला देशच्या चवदा तरूणांचा एक तांडा आहे. चार वर्षांपूर्वी ते सारे एकत्र आले तेव्हा ते शाळकरी मुलगे होते. आपल्यातील संगीतप्रेमाची जोपासना करणे हा त्यांचा एकत्र येण्याचा उद्देश. त्यांच्यापैकी एकाला तर चितगांवला आर्ट कौन्सिलचे बक्षीस मिळालेले आहे. त्याचा आवाज अत्यंत मधुर आहे. पाकिस्तानी सैन्याने तरूणांचीच कत्तल करण्यास सुरवात केली तेव्हा हे घरातून तावडतोब बाहेर पडले. कलकत्त्यात ते येऊन पोचले तेव्हा त्यांच्या जवळ त्यांच्यातील कलेखेरीज काहीही नव्हते. ही मुले अत्यंत सज्जन असून आपल्या दुःखाचे रडगाणे ती गात नाहीत किंवा आमच्या कुटुंबियांचे काय झाले असेल, आमचे पुढे काय होणार, आज आमची ही काय अवस्था झाली आहे असे म्हणून आक्रोशही करीत नाहीत.

सध्या त्यांना एक प्रेमळ मित्रत्व प्राप्त झाले आहे. नेताजींची पुतणी सौ. ललिता

बोस ह्यांनी त्यांची जबाबदारी घेतली असून त्यांच्या अनेक मित्रमडळींकडे ह्या मुलांचे संगीताचे कार्यक्रम होतात. 'आमार शोनार बांगला' 'आमादेर जात्रा होलो शुरु' इत्यादी गाणी भावपूर्ण आणि देशाभिमानाने ओथंबलेल्या सुरात गाईली जातात.

शेवटी निधी गोळा करण्यात येतो. ज्याने त्याने आपल्या इच्छेप्रमाणे द्यावे. त्यातून स्वतःचा कमीतकमी खर्च करून उरलेली रक्कम ही मुले आपल्या निर्वासित देशबांधवांच्या मदतीसाठी स्वखुषीने पाठवतात.

## एकच बॉम्ब का म्हणून

एक ओळखीचे गृहस्थ ज्या विभागात राहतात तिथे नेहमीच बाँब फुटत असतात. रोज कमीत कमी दोन-तीन बाँबचे आवाज तरी पाठोपाठ येतातच. पण एखादे वेळी एकच बाँब फुटला म्हणजे मात्र ह्या गृहस्थांना आश्चर्य वाटतं. त्यांचं म्हणणं असं—पाठोपाठ कित्येक बाँब फुटणं म्हणजे त्या विभागात प्रबळ असणाऱ्या दोन-तीन राजकीय गटांच्या आपापसात चालणाऱ्या मारामारीचं ते लक्षण आहे. अशा वेळी मुलं हातात पाईपगन्स घेऊन पळताना किंवा बाँब फेकताना स्पष्ट दिसतात. पण जेव्हा नुसताच एक बाँब फुटल्याचा आवाज होतो तो कशासाठी हे मात्र काही कळत नाही. सुरक्षा पोलिसांची ड्यूटी बदलत असल्याची ही खूण समजावी की पोलिसांची गाडी येत असल्याची पूर्वसूचना समजावी? काहीच कळायला मार्ग नाही. ते गृहस्थ म्हणतात ह्याचा तपास एकदा लावायला हवा. पण खरं म्हणजे त्यांची हिंमतच होत नाही.

## अरेरावी चांभार

इथल्या बाटानगरच्या संपूर्ण विभागात एकसुद्धा चांभार दृष्टीला पडत नाही. जोडा दुरुस्त करायचा प्रसंग आला की पंचाईतच. तसे फॅक्टरीत बारा हजार मजूर काम करतात पण दुरुस्तीचं काम करणारा दुर्मिळच. एकदा एका गृहस्थांची ऐन ऑफिसचे वेळी मोठी पंचाईत झाली. त्यांच्या सँडलचा पट्टा तुटला. एक खिळा मारला असता तर काम होत होतं. पण चांभार दिसेल तर ना? चांभाराच्या शोधात गृहस्थ एका पायाने फरफटत चालू लागले. बऱ्याच वेळानंतर एक चांभार दिसला. अगदी देवाने पाठवल्यासारखा.

त्याने जोड्याला खिळा ठोकला आणि ताबडतोब पॉलीश करायलाही सुरुवात केली. हे गृहस्थ म्हणाले—

'किती पैसे द्यायचे ?'

'दुरुस्तीचे दहा अन् पॉलिशचे पंधरा.'

'अरे, पण तुला पॉलिश करायला कुणी सांगितलं ?' गृहस्थानी विचारलं. तो उत्तरला–

'देखिये बाबू, पॉलिश नको असेल तर राहिलं. पण एका जोड्याला पॉलिश नि एक जोडा तसा किती विजोड दिसेल ते तुम्हीच पाहा. चालत असेल तर असंच राहू देतो.'

बिचारे गृहस्थ यावर काय म्हणणार ? त्यांनी दुसराही जोडा पॉलिश करून घेतला नि मुकाट्याने चांभाराच्या हातावर चार आणे ठेवले.

## क्रूर प्रसंग ओढवला

आजच्या वर्तमानपत्रात एक हृदयस्पर्शी फोटो आहे–मरून पडलेला सिंहाचा बच्चा नि शेजारी हताश होऊन बसलेले जॉर्ज ॲडॅमसन ! जॉर्ज व त्यांची पत्नी जॉय ह्यांनी ह्या सिंहाला बालपणापासून पाळलेले ! Born Free ह्या प्रसिद्ध पुस्तकाची जॉय ही लेखिका आणि हे सिंहाचं पिलू–बॉय त्याचं नाव–सिनेमाचा नायक. एका रानम्हशीच्या तडाख्यातून जॉर्जने त्याला एकदा वाचवले होते. त्याच्या जखमा धुतल्या होत्या. आपल्या लाडक्या बॉयला क्षणभरही न विसरणारं हे जोडपं. पण आज त्यांच्यावर विलक्षण प्रसंग ओढवला. केन्यामधील एका आफ्रिकन माणसाला बॉयने मारून टाकले या कारणास्तव बॉयलाच गोळी घालून मारून टाकण्याचा प्रसंग जॉर्जवर ओढवला. ज्या बॉयवर जिवापाड प्रेम केले त्याला मारून टाकताना जॉर्जची काय अवस्था झाली असेल बरे !

–पण काही झालं तरी बॉय हे एक जनावर होते आणि जॉर्ज हा माणूस होता. पण बांगला देशातील एका आईला आपले सहा महिन्यांचे अपत्य गळा दाबून मारून टाकताना काय वाटले असेल याची कल्पना तरी करवेल का ? पण ही सत्य गोष्ट आहे. आठ-दहा जणांचा एक ग्रुप इकडे पळून येतेवेळी पाकिस्तान्यांची चाहूल लागली म्हणून आडोशाला लपून बसला होता. त्यात एक बाईपण आपल्या सहा महिन्याच्या अपत्यासह सामील होती. बाळ अचानक रडू लागले. काही केल्या शांत होईना. त्याच्या रडण्यामुळे पाकिस्तान्यांना आपला पत्ता लागेल व सर्वजणच संकटात सापडू अशी तिला भीती वाटू लागली. केवळ इतर सर्वांचा जीव वाचावा म्हणून तिने आपल्या पोटच्या गोळ्याचा गळा दाबण्याचे निर्दय कृत्य केले. ह्या वीर मातेच्या धैर्याला खरोखरच सीमा नाही. तुलनात्मक दृष्टेने पाहता जॉर्ज आणि जॉयपेक्षा ही स्त्री श्रेष्ठ आहे असंच म्हणायला हवं !

□ □ □

मुंबईची जी गत
तीच कलकत्त्याची
आणि तशीच
प्रत्येक नव्या औद्योगिक केंद्राची.

# दूषित हवा आणि दूषित पाणी

रा. म. बिवलकर

---

मानवी जीवनात जास्तीत जास्त सुख आणि समाधान निर्माण करण्याकरता, माणसाच्या जास्तीत जास्त उच्च गरजा भागविण्याच्या दृष्टीने – म्हणजे त्याचे राहाणीमान सुधारण्याच्या दृष्टीने जगभर आर्थिक विकासाचा गदारोळ विसाव्या शतकाने उभा केला. त्यातून निघालेल्या स्पर्धेमुळे ज्या कुरापती, महायुद्धांच्या संहारक रूपाने पुढे उभ्या ठाकल्या, त्यांच्यावर संयुक्तराष्ट्र संघटनेसारखा तोडगा काढून, गेल्या २५ वर्षांत ठिकठिकाणी पडणाऱ्या ठिणग्या, वणवे ठरू नयेत या दृष्टीने काळजी घेतली गेली. वाढते शोध, वाढते उद्योग, वाढते संशोधन, वाढते उत्पादन हे आजच्या युगाचे व्यवच्छेदक लक्षण. त्यातूनच समृद्धता, संपन्नता येईल, गरिबी हटेल, माणसे निरोगी, सुखी बनतील ही धारणा.

पण वाढत्या विकासाने अनेक समस्या मानवापुढे उभ्या केल्या. निसर्गाचा तोल बिघडविणाऱ्या माणसावर निसर्ग जणू सूड घेऊन उठला! कीटकनाशकांद्वारे हजारो रोगप्रसारक कीटकांचा संहार माणसाने केला, तर मानवनिर्मित कीटकनाशके पचविणाऱ्या हजारो कीटकांचा प्रादुर्भाव अलिकडे झाल्याचे, आणि त्यांनी रोगप्रसाराचे काम जोरात सुरू केल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या लक्षात आले आहे. आणि नवी औषधे शोधून काढण्याची डोकेदुखी संशोधकांना लाभली आहे!

मानवी गरजा भागविणाऱ्या नवनवीन वस्तू मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याकरता, बाष्पशक्ती, विद्युत्शक्ती आणि आता अणुशक्तीला दिमतीस धरून जगात कोट्यावधी कारखान्यांची चक्रे फिरू लागली. पण त्यामुळे अन्न, पाणी वा हवा यासारख्या मानवाच्या मुलभूत गरजांतच विष कालवले जाऊ लागले! औद्योगिक प्रगतीतून जी कारखानदारी जन्माला आली तिच्या पायीच हे घडले होते. उद्योगप्रधान देशांना या समस्येने भंडावले होते. आपल्या देशात आजवर फारसे मोठे उद्योगधंदेच नव्हते. त्यामुळे शहरीकरणही झाले नव्हते. खेड्यापाड्यांच्या या देशात, सामाजिक आरोग्याची काहीच कल्पना नसल्यामुळे, पाणी दूषित होई,

नारू, पटकी हे रोग पसरत, हजारो माणसे मृत्युमुखी पडत पण ती देवाची अवकृपा मानण्यात येई ! पाणी वाहाते असले तर निसर्गत:च ते शुद्ध होते आणि तळ्या-विहीरीत असले तर मासे, कासवे हे जलचर प्राणी ते शुद्ध करतात, तेवढे शुद्धीकरण पुरेसे आहे, अशी भाबडी समजूतही होती.

स्वातंत्र्योत्तर काळात विविध रोगराजांविरुद्ध ज्या मोठमोठ्या मोहिमा संघटित करण्यात आल्या त्यातून या समजुती खऱ्या नसल्याचे प्रत्ययाला आले. सामाजिक आरोग्य सुधारण्याच्या प्रयोगांनी अनेक कीटकनाशकांप्रमाणे अनेक औषधांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू करून, त्यांचा खेडोपाडी वापर सुरू करण्यात आला आणि या देशाचे मरणप्रमाण हजारी ४० वरून १५ वर आणण्यात यशही आले.

विकासाच्या घणाघाईत अनेक प्रकारच्या वस्तु, रासायनिक द्रव्ये व यंत्रे निर्माण करणारे कारखानेही संघटित होत होते. त्यांना उत्तेजन दिले जात होते. नवी शहरे उभी राहात होती. तिथल्या पाण्याच्या, विजेच्या, राहाण्याच्या, जागांच्या समस्या सोडविल्या जात होत्या. पण त्यात फारशी नियोजनबद्धता होती असे नाही. कारण दूषित हवा, पाणी हा प्रश्न केवळ औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांपुढचा आहे. आपला देश अजून खूपच मागासलेला आहे. त्यामुळे आपल्याला या प्रश्नाचा आजच मोठ्या गंभीरपणे विचार करायला हवा असे नाही; अशी भाबडी समजूत राज्यकर्त्यांचीही होती. सामान्य माणसाला हे संकट उमगणेही कठीण होते. दहा-बारा वर्षापूर्वी, केंद्र सरकारने, नागपूरला 'सेंट्रल पब्लिक हेल्थ इंजीनियरिंग रिसर्च इन्स्टिटयूट' नामक संस्था स्थापन केली. पण पाणी व हवा दूषित करणाऱ्या कारखानदारांवर काही कायदेशीर बंधने घालणारे कायदेच अस्तित्वात नसल्यामुळे इतर अनेक राष्ट्रीय संशोधन शाळांप्रमाणे ही संस्थाही कूर्मगतीने कार्य करीत आहे. 'Unless we are armed with proper legislation, we public health engineers will remain by-standards.' ही त्या संस्थेच्या संचालकांची, डॉ. आर्शीवाला यांची तक्रार खरीही आहे. दूषित हवा व पाणी ही समस्या अजून आपल्याला पुरेशी उमगलेलीच नाही !

मध्यंतरी 'टाईम्स'ने या विषयावरील आपल्या संपादकीयात म्हटले होते, 'आपल्या रासायनिक आणि इतर कारखान्यांची घाण तलावातून आणि नद्यातून सोडून, श्रीमंत देश, त्यांच्या पाण्याचे विष करतात तर त्या देशाच्या शहरातील कारखान्यांची धुराडी व गाड्यांचे 'एक्झॉस्ट्स्' हवा दूषित करतात. गरिब देशात हे काम नद्या-तळ्यातून टाकलेली घाण-केरकचरा व विष्टा आणि चुली-चुलाण्यांतून लाकडे जाळून स्वयंपाक करण्याच्या पद्धतीमुळे केले जाते.' भारतासारख्या विकसनशील देशात दोन्ही प्रकारे दूषितीकरण घडत आहे.

स्वच्छ आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची टंचाई ही जशी ग्रामीण भागाची समस्या आहे तद्वत ती झपाट्याने वाढणाऱ्या शहरांचीही समस्या आहे. म. गांधी जन्म-

शताब्दीच्या निमित्ताने खेडोपाडीची पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याचे मनोदय जाहीर झाले, घोषणा झाल्या, पण त्यादृष्टीने म्हणावेसे तसे प्रयत्न झाले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या १५ कलमी कार्यक्रमात त्या गोष्टीचा पुनरुच्चार झाला आहे.

## सांडपाण्याची अव्यवस्था

पाण्याच्या पुरवठ्याची दुसरी बाजू सांडपाण्याच्या विल्हेवाटीची. ती व्यवस्था झाली नाही तर ते रोगांना निमंत्रणच! विहीरी, ओहोळ, नद्या, खेड्यांना व छोट्या शहरांना पाणी पुरवठा करतात. पाणी शेंदून काढायचे असले वा दुरून डोक्यावरून वाहून आणायचे असले की साहजिकच पाण्याचा वापर दर माणशी कमीच होतो. म्हणजे माणशी फक्त २० लिटर पाणी लागते. पण नळावाटे पाण्याचा पुरवठा सुरु झाला की हा वापर माणशी १२० लिटर एवढा वाढतो. आणि यातील ८० टक्क्यापेक्षा जास्त पाणी सांडपाणी म्हणून फुकट जाते. त्याचा योग्य निचरा करण्याची व्यवस्था नसेल तर ते जमिनीत मुरते. विहीरीत अगर तळ्यात वा नद्यातून मिसळते. पिण्याच्या पाण्याचे साठे दूषित करते.

आपल्या देशात २५४० छोटी मोठी शहरे आहेत. यातील फक्त १२०० शहर-गावांना नळाद्वारे पाणीपुरवठा होतो. या बाराशेपैकी सुमारे दोनशे शहरात भूमिगत सांडपाण्याच्या गटारांची सोय उपलब्ध आहे. आणि या देशाच्या खूप मोठ्या अशा २० शहरांपैकी फक्त दोन शहरांतून सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा बागायती साठी उपयोग करून घेण्याच्या योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. म्हणजे बाकी सर्व शहरगावे, गटारे काढून आपले सांडपाणी नजिकच्या नदी ओहोळात सोडून देतात आणि त्यांच्या ग्रामपंचायती, वा म्युनिसिपालिटया आपण आपले काम चोख बजावले अशा संभ्रमात राहातात.

शहरातून आता उद्योग वाढले आहेत. या कारखान्यांना खूप पाणी लागते. शहरातील सांडपाण्याच्या नालीतून तेही आपले घाण पाणी सोडीत असतात. यात अनेकदा विविध प्रकारची विषारी रसायने मिसळलेली असतात. सांडपाण्याबरोबर तीही नदी ओहाळात मिसळल्याने पाणी विषवत बनते. उदाहरणार्थ, ठाणे-कल्याण भागात अलिकडे अनेक कारखाने सजले आहेत. त्या कारखान्यांच्या रस्ते, वीज या सारख्याच गरजांकडे लक्ष द्यायला शासनाला अजून जमलेले नाही, मग त्यांच्या रसायनमिश्रित सांडपाण्याच्या विल्हेवाटीकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे हे निराळे सांगायला नको. पण हे पाणी खाडीत वा नदीत सोडल्याने एक तर मासे मोठ्या प्रमाणावर मरत असल्याने मच्छिमारांचा धंदा बसला आणि नदीचे पाणी दूषित झाल्याने पिण्यासाठी निरूपयोगी ठरले. उल्हास नदीचा फाल्गुनमास झालेला कुणा-च्याही सहज नजरेत भरतो! आपली राजधानी दिल्ली. ती यमुना नदीचे पाणी पिते. नदीच्या वरच्या भागातील गावांच्या सांडपाण्यामुळे दूषित झालेले यमुनेचे

पाणी दिल्ली पिते ! १९५६ साली नझफगढ नाल्यात सोडलेले सांडपाणी वझिराबादजवळ यमुनेला मिळाल्याने, दिल्ली काविळीने ' पिवळी ' पडली होती, ही गोष्ट अनेकांच्या स्मरणात असेल. पण दिल्लीसुद्धा स्वतःच्या अनुभवाने अजून शहाणी झालेली नाही. दिल्लीचेही बरेचसे सांडपाणी आजही यमुनेतच सोडले जाते आणि आग्ऱ्याला दिल्लीची घाण प्यावी लागते ! विश्वनाथाची काशी म्हणजे हिंदूचे सर्वोच्च पवित्र स्थान. गंगामाईला केवढे मोठेपण आणि पावित्र्य हिंदूमन बहाल करते ! पण बनारस हे या देशातले अत्यंत गलिच्छ शहर. या शहराची ३ हजार गॅलन एवढी गलिच्छ घाण प्रतिदिनी गंगेत सोडली जाते ! बरौनीसारखे गंगेकाठचे अनेक कारखानेही आपली हजारो गॅलन घाण गंगार्पण करीत असतात ! म्हैसूरातील दोनअडीच हजार कारखाने कावेरी-तुंगभद्रेत आपले सांडपाणी सोडतात. उत्तर प्रदेशातील बहुतेक नद्या व तलाव विविध शहरगावाच्या सांडपाण्यामुळे असेच दूषित झाले आहेत. पुणे औद्योगिक दृष्ट्या वाढतेय पण मुळा, मुठा, भीमा मलिन होत आहेत. त्यामुळे ' गंगेच यमुनेचैव गोदावरी-सरस्वती. नर्मदे, तापि कावेरी जलेस्मिन् सन्निधिं कुरू ' असे म्हणण्याची आता सोय राहिलेली नाही. कारण या सप्त सरितांच्या दूषित पाण्याने देवालाही आंघोळ घालण्यात काय अर्थ आहे ? देवाला सांडपाण्याची का आंघोळ घालायची ! १९६८ साली एक विचित्र बातमी प्रसिद्ध झाली होती ! ' गंगेच्या पाण्याला मोंघीरजवळ आग लागली होती ! ' खरेच लागली होती. नजिकच्या तेलशुद्धीकरण कारखान्याची ती करामत होती ! पण बिचाऱ्या मोंघीर शहराला त्यामुळे एक आठवडाभर बिना-पाणी तडफडावे लागले होते !

सरकारी अर्थक्षेत्रातील हैद्राबाद येथील एका सिंथेटिक ड्रग्ज्च्या कारखान्याच्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न १९६७ साली नागपूरच्या केंद्रीय संस्थेकडे सोपविण्यात आला होता. कारखान्याचे सांडपाणी थोडे होते पण त्यात विविध प्रकारच्या ७० रसायनांचे मिश्रण होते. त्यात बोट बुडविले तर ते भाजत होते ! हे सांडपाणी प्रक्रिया न करता मुसा नदीत वा तलावात सोडले असते तर ! तेलंगणच्या लढ्याने हादरले नाही, एवढे हैद्राबाद शहर हादरले असते !

पाणी दूषिती करणाचा प्रश्न वाटतो तितका साधा नाही. वेळीच खबरदारी घेतली नाही तर तो नागरिकांचे जीवन तर धोक्यात आणीलच पण उभी पिके जाळून टाकील. सुपिक जमिनी नापिकी बनवील. झाडे करपवून टाकील ! केंद्रानेही आजवर या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलंय् आणि महाराष्ट्र राज्याचा आपवाद वगळता इतर कुठल्याच राज्यानेही या समस्येचा गंभीरपणे विचार केलेला दिसत नाही.

लंडनचा पाणीपुरवठा स्वच्छ राहावा व हवाही शुद्ध राहावी यासाठी लंडनचे मेट्रोपोलिटन वॉटर बोर्ड संशोधनावर अमाप खर्च करते. पाणी व हवा शुद्ध राखण्याकरता, प्रतिवर्षी ७०० कोटी रुपये इंग्लंडमध्ये खर्च करतात. अमेरिकेत ४०० कोटी

रुपये या कामाला लागतात. पण प्रामुख्याने कारखानदारानाच हा खर्च करावा लागतो. थेम्स् वा अन्य नद्यांच्या काठावरील कारखाने, योग्य प्रक्रिया करून शुद्ध केलेले सांडपाणीच या नद्यांत सोडतात. तशी सक्तीच त्यांच्यावर केली जाते. थेम्स् नदीत मोठमोठ्या बोटी वाहातूक करीत असतात. त्यातून येणारी घाण, तसेच बोटींचे रंग यामुळे पाणी दूषित होऊ नये म्हणून अनेक शास्त्रीय उपाय योजले जातात. ते प्रयत्न पाहिले की आपल्या या अवाढव्य देशात, पाणी-दूषित होऊ नये म्हणून आपण किती काळजी घ्यायला हवी याची कल्पना येईल. पण इथे सरकार आणि नागरिक दोघेही बेफिकीर आहेत !

नाही म्हणायला, गतवर्षी महाराष्ट्र राज्याने ‘ Watar Pollution Control Act ’ पास केला आणि ‘ महाराष्ट्र स्टेट वॉटर पोल्युशन बोर्ड ’ची स्थापनाही केली. पण हे मंडळ स्थापन झाले तरी, या मंडळाशी उद्योगपती, नागरिक व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सहकार्य केल्याखेरीज बोर्डाचे काम सुकर होणार नाही. हे सहकार्य समजुतीने मिळाले नाही तर कडक उपायांच्या सक्तीने ते मिळविले पाहिजे. एकट्या महाराष्ट्र राज्याने पावले उचलून भागणार नाही. केंद्रानेही याबाबतीत पुढाकार घेऊन, पाणी व हवा दूषितीकरणाबाबत सर्व राज्यांना उपाययोजना करण्यास भाग पाडले पाहिजे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या पाश्चात्य पद्धती अतिखर्चिक आहेत. या गरीब देशाला त्या परवडणार नाहीत. या दृष्टीने नागपूरच्या ‘ सेंट्रल पब्लिक हेल्थ इंजीनियरिंग रिसर्च इन्स्टिटयूट ’ने कमी खर्चिक पण अधिक उपयोगी अशा पद्धती शोधून काढल्या आहेत. प्रत्येक शहराच्या गरजेप्रमाणे विविध प्रकारचे सांडपाणी-प्रक्रिया प्रकल्प उभे करायला डॉ. आर्शीवाला आणि त्यांचे सहकारी तयार आहेत. या मंडळींना कामे हवी आहेत. पण ती मिळायला सरकारने कायद्याने बडगा उगारायला लागेल. कारखान्यांना, नगरपालिकांना सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची सक्ती करायला हवी. काही सवलती द्यायला हव्यात. आणि एवढे करूनही त्यांनी न ऐकले तर त्यांची वीज व पाणी तोडण्याचीही धमकी द्यायला हवी.

## मोटारी ! छे: विषवायुवाहिन्या

हवेच्या दूषितीकरणाचा प्रश्न पाश्चात्य देशाइतका या देशात गंभीर बनलेला नाही. तरीपण मध्यंतरी दूषित हवेमुळे, न्यूयॉर्कच्या नागरिकांना जसे जीवन असह्य झाले होते तसे गतवर्षी जुलै महिन्यात तुर्भे खत कारखान्यातून येणाऱ्या धुरामुळे त्या भागात राहाणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ लागला होता. डोळे दुखणे, खोकल्याची उबळ येणे यासारख्या दुखण्यांनी लोक बेजार झाले होते. तेव्हा कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सल्फर डायऑक्साईडवर नियंत्रण ठेवण्यात आले. दादर भागात रंगांच्या कारखान्यांमुळेही लोकांना असाच त्रास होतो. तुर्भे येथील अणुभट्ट्यांमुळेही नागरिक जीवनावर विपरीत परिणाम होण्याची

शक्यता नाकारता येणार नाही. कल्याणजवळच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रामुळेही काळ्या धुराच्या पट्टयाचा जनतेला त्रास होतो. शहरातील हजारो कारखाने आणि त्यांची धुराडी अविरतपणे धूर ओकीत असतात. त्यातील अनेक कारखाने कार्बन मोनो ऑक्साईड हा विषारी वायू सोडीत असतात. मैदाने आणि मोकळ्या जागा आक्रसत आहेत. त्यामुळे दूषित हवेचाही प्रश्न हळूहळू गंभीर बनत आहे. मुंबईची जी गत तीच कलकत्त्याची आणि तशीच गत प्रत्येक नव्या औद्योगिक केंद्राची होणार आहे. हा धोका चटकन् लक्षात न येणारा म्हणूनच दुर्लक्षिला जाणारा आहे.

अन्न व पाणी याप्रमाणेच नव्हे तर किंबहुना अधिक महत्त्व हवेला. माणूस जगण्याकरता ज्या गोष्टी शरिरात घेतो त्यातले ८० टक्के वजन हवेचे असते! पाणी दूषित असेल अगर अन्न नासले असेल, तर आपण त्या गोष्टी टाळू शकतो. पण हवा दूषित झाली आहे, हे माहीत झाले तरी श्वासोच्छ्वास टाळणे वा थांबविणे आपल्याला शक्य आहे का? आपल्या देशात ही समस्या अधिक महत्त्वाची, कारण आपण पाश्चात्य देशांपेक्षा दीडपट हवेचा आणि दुप्पट पाण्याचा वापर करतो!

आपल्या देशात 'स्मोक न्यूझन्स् ॲक्ट' अंमलात आहे. पण तो फक्त कोळशाचा वापर करणाऱ्या बॉयलर्सनाच लागू आहे. आज देशात उभे झालेले अनेक खत कारखाने व पेट्रोकेमिकल उद्योग, सल्फर, नायट्रोजन आणि मिश्रण असलेली जवळ जवळ अदृश्य अशी रासायनिक वाफ बाहेर टाकीत असतात. ती आरोग्याला अत्यंत धोकादायक असते.

दिल्ली, कलकत्ता आणि मुंबईच्या हवेची पाहणी करता असे आढळून आले आहे की, त्या हवेत पाश्चात्य शहरांपेक्षा दुप्पट तिप्पट नव्हे पाचपटीनेही धूलिकण आहेत. हे धूलिकण, सल्फर डायऑक्साइड वा हायड्रोकार्बन्स सारख्या, हवा दूषित करणाऱ्या द्रव्यांचे वाहक बनतात. हवेत धूलिकण आणि सल्फरडायऑक्साईड असणे हे हवेच्या दूषितीकरणाचे लक्षण मानले जाते. उद्योगांशिवाय, हवा दूषित करतात त्या मोटारी. पाश्चात्य देशांतील शहरांएवढ्या मोटारी आपल्या देशांतील शहरातून धावत नाहीत ही गोष्ट खरी. पण कमी संख्येची भरपाई, आपल्या जुन्या-डबड्या मोटारी भकभक धूर ओकून करतात! पळण्यापेक्षा पेट्रोल खाणाऱ्या व धूर ओकणाऱ्याच या गाड्या! यापैकी कांही गाड्या जो 'एक्झॉस्ट' ओकतात त्यात कार्बन मोनॉक्साइड नामक एका अत्यंत विषारी वायूचे प्रमाण ५.५ ते १० टक्के इतके असते, असे आढळून आले आहे. एक्झॉस्टमधील कार्बनमोनॉक्साईडचे प्रमाण जास्तीत जास्त दीड टक्क्यापेक्षा अधिक असू नये, असा अमेरिकेतील नव्या मोटारीवर दंडक घातला आहे. या संदर्भात १० टक्के विषारी वायू ओकणाऱ्या मोटारी म्हणजे विषवायु-वाहिन्याच म्हणायला हव्यात. असल्या मोटारी एकट्या कलकत्ता शहराची हवा एवढी दूषित करतात की, न्यूयॉर्क शिकागो, लंडन आणि वॉशिंग्टन या चार शहरांच्या रस्त्यातून धावणाऱ्या असंख्य मोटारीही त्या शहरांची हवा तितकी दूषित

करीत नाहीत ! कार्बोरेटर्स आणि एअर-फ्युएल प्रमाण यांत सुधारणा करून एक्झॉस्टमधील कार्बनमोनॉक्साइडचे प्रमाण २५ टक्क्यानी घटविता येईल असा तज्ञांचा दावा आहे. पण ते यापेक्षाही कमी करायचे तर आपल्या मोटारींच्या एंजिनांत खूपच बदल करावे लागतील. या देशातील मोटारींची वाढती मागणी, वाढते उत्पादन विचारात घेता, एंजिन बांधणीतील हे बदल लवकर घडून यायला हवेत.

डिझेल तेलावर चालणाऱ्या गाड्या धूर अधिक ओकतात, त्याला घाण वासही मारतो पण त्यांच्या एक्झॉस्टमध्ये कार्बनमोनॉक्साइड मुळीच नसतो. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. अर्थात् अतिधूर हवेत जमा होणेही वाईटच. तो कमी करायलाच हवाच !

मुंबई म्युनिसिपालिटीने या प्रश्नाचे महत्व ओळखून नागपूरच्या 'सेंट्रल पब्लिक हेल्थ इंजीनियरिंग रिसर्च इन्स्टिटट्यूटला', येत्या तीन वर्षात, मुंबईच्या हवेची तपासणी करून हवा दूषित करणाऱ्या सर्व गोष्टींची पाहणी करून 'उपाययोजना' सुचविण्याची विनंती केली आहे. या पाहणीवर मुंबई महानगरपालिका १ लक्ष ८६ हजार रुपये खर्च करणार आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

दोनशे शास्त्रज्ञ सांभाळणारी नागपूरची संस्था विश्वविख्यात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने हवा व पाणी दूषितीकरणाबाबत संशोधन करणाऱ्या ज्या तीन प्रादेशिक केंद्राना मान्यता दिली आहे त्यात टोकियो आणि मॉस्को येथील संस्थांच्या मांडीला मांडी लावून नागपूरची आपली संस्था बसते ! पण या यंत्रज्ञ-तंत्रज्ञांकडून आपण मात्र पुरेसे काम करून घेत नाही. कारण आग लागली की विहीर खणायला धावणारे नियोजनकार आपण आहोत ! येणारे संकट ओळखून त्यावर आधीच तोडगा काढून सुसज्ज राहण्याचे आपल्या गांवीच नसते ! परिसर स्वच्छ राहावा म्हणून अमेरिकेत 'एन्व्हिरॉनमेंट कौन्सिल' स्थापन केले आहे. प्रत्येक कारखान्यातून कोणत्या प्रकारचा धूर हवेत सोडला जातो, सांडपाण्यात कुठले मिश्रण असतें याची तपासणी केली जाते. कारखानदारांना त्यावर प्रक्रिया करायला भाग पाडण्यात येते. पुरेसे कायदेशीर अधिकार उपलब्ध केले, पुरेसा पैसा दिला तर नागपूरची संस्थांही ठिकठिकाणी अशा तपासण्या करू शकेल आणि त्यावर प्रतिबंधक उपायही सुचवू शकेल. पण त्याकरता शासनाने त्वरित पावले उचलली पाहिजेत. विलंब झाला तर या निष्काळजीपणाला क्षमा होणार नाही ! !

□ □ □

आस्तिक–नास्तिक

देवीदास बागूल

# कांदा मुळा भाजी

काम करायला कोणाला आवडतं? काम म्हटलं म्हणजे नकोच वाटतं. अगदीच अंगावर आलं तर शिगावर घेतलं जातं, ती गोष्ट सोडा. पण अगदी मनापासून सांगायचं झालं तर नको ते काम, किंवा कधी संपतं ते काम, किंवा संपलं बुवा एकदाचं हे काम, असंच ज्याला त्याला वाटत नाही का? संगीतात रमलेल्या, प्रयोगशाळेत गढलेल्या किंवा प्रेमात हरवलेल्या माणसांचं सोडा. त्यांना त्या त्या गोष्टी मनापासून आवडतात म्हणून त्यांना ती कामं, कामं म्हणून वाटतच नाहीत, त्याला कोण काय करणार? पण इतरांना कामं ही ओझ्यासारखी वाटतात त्याला उपाय काय?

माणसाला ह्या कामाच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी हिंदु धर्माने नाना प्रकारचे उपाय शोधले, सुचवले आहेत. त्यासाठी कधी सरळ सरळ सांगितलं की कोणतंही काम हे काम नसतंच, तर कधी असं सांगितलं की, काम तुम्ही करत नसून तुम्ही केवळ निमित्तमात्र असता; कधी असं सांगितलं जातं की तुम्ही काम करा, पण कामाचं फळ परमेश्वराला अर्पण करा. कधी असं तर कधी तसं. त्या सगळ्यांचा उद्देश एकच की माणसाने काम करताना गांजून जाऊ नये, गंजून जाऊ नये; उलट फुलासारखे उमलत जावे, मोकळे मोकळे व्हावे.

पण माणसाचं दुर्दैव असं की हे सर्व उपाय प्रत्यक्ष कामापेक्षा अधिक जाचक झाले, अधिक ओझ्यासारखे झाले. सांख्ययोग अवघड म्हणून कर्मयोग आला, पण कर्मयोग समजायलासुद्धा सतत जागृत बुद्धी हवीच होती ना? कर्म काय, अकर्म काय, विकर्म काय ह्या गोष्टी तर सोडाच, पण कर्माचं फळ म्हणजे तरी कुणा लेकाच्या डोक्यात हरघडी राहणार होतं? आणि कर्माचं फळ म्हणजे काय हे जर लक्षात राह्यलं नाही तर मग ते परमेश्वराच्या ठिकाणी अर्पण तरी कसं करणार?

म्हणजे सांगणारा सांगायचा, आणि ऐकणारा पुन्हा कामाला कामच समजून कामाला कंटाळत कंटाळत काम करीत राह्यचा आणि ह्या कामाच्या विळख्यातून सुटण्याचो स्वप्नं पाहत जगायचा.

फार तर तो म्हणायचा की ही कामं थोडा वेळ बाजूस ठेवून, थोडं प्रेम करू या, थोडी भक्ती करू या, थोडं वात्सल्य दाखवू या. कामं आवरली म्हणजे देवळात जाऊ, नाहीतर चार दिवस तीर्थक्षेत्री जाऊ या.

सामान्य माणसांची ही द्विधा अवस्था पाहून ज्या संतांना कळवळा वाटला आणि त्यांनी एक नवा सोपा उपाय सांगितला त्यांत सावता माळ्याचा आवर्जून उल्लेख करायला हवा. सावता माळ्याने कामाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात एक सूक्ष्म फरक करायला सांगून कामाचं रक्तशोषक रूप नष्ट करण्याचा प्रयत्न केला. कोणतंही काम हे काम नसतंच हे तत्व, किंवा 'काम नाही काम नाही झालो पाही रिकामा' हे तुकारामाचं तत्त्व लोकांना समजणं फार अवघड आहे हे सांगायला कोणी तज्ज्ञ हवा कशाला? सावता माळ्याने लोकांची ही असमर्थता पाह्यली, आणि शिवाय हेही जाणलं की लोकांना काम जसं आवश्यक आहे तसंच त्यांना पारंपरिक देवाचं प्रकरणही टाळता येत नाही. म्हणून सावता माळ्यानं एक नवी सांगड घालण्याचा प्रयत्न केला. अशाश्वत काम आणि शाश्वत देव यांच्या संबंधाबद्दल सावता माळी म्हणतो की,

> कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी
> लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी
> मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी
> सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा.

ह्या अभंग वाचल्यावर कोणी म्हणेल की ह्यात नवीन ते काय आहे? नवीन काय आहे हे समजण्यासाठी सामान्य माणसाचा दैनंदिन व्यवहार निरखून पाहणे आवश्यक आहे. सामान्य माणसाचा दैनंदिन व्यवहार कसा असतो? आई मुलाला म्हणते की, 'अरे, लवकर आंघोळ आटोप, पूजा करायची आहे ना!' कोणी कोणाला म्हणते की, 'काम लवकर संपवा, देवळात जायचं आहे.' शेतकरी म्हणतो, 'पेरण्या लवकर करू या, वारीला जायचं आहे.'

म्हणजे, आंघोळ, काम, पेरणी ह्या गोष्टी वेगळ्या आणि देव, देऊळ, वारी ह्या गोष्टी वेगळ्या. त्या त्रासदायक म्हणा किंवा अशा तशा म्हणा, त्या गोष्टी संपवून मग देवभेट घ्यायची. आता काही तत्त्वज्ञानी लोक आले आणि त्यांनी सांगितले की, त्रासदायक गोष्टींचा त्रास वाटू नये अशी दृष्टी आम्ही तुम्हाला देतो. तरी काय झाले? देव आणि कामे ह्या गोष्टी दोन वेगवेगळ्या गोष्टी राहिल्या त्या राहिल्याच.

पण सावता माळ्याने ह्या सर्व कटकटी नकोत म्हणून एक पुढची इयत्ता काढली. त्याने मुळी देव आणि दैनंदिन कामे ह्यांची वेगवेगळी चूलच मोडून टाकली. तो म्हणतो,

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी. म्हणजे कांदा मुळा हेच जर देव तर मग त्या कामांचा कंटाळा कसा येणार ? आणि ती कामे कशीबशी उरकण्याचा प्रश्न तरी कसा उरणार ? उलट कांदा मुळा यांची मशागत अगदी मन लावून, प्रसन्नपणे करता येणार. देवळात गेल्यावर जशी मनाला शांती वाटते असे भलेभले लोक म्हणतात तशीच शांती शेतीतली भाजपाल्याची कामे करताना मिळणार. मग ती कामे उरकून पंढरपूरची वारी करण्याचाही प्रश्न उपस्थित होणार नाही. कारण सावता माळ्याच्या मते,

मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी. पंढरपूर, पंढरपूर म्हणून जे म्हणतात ते ह्या माझ्या मोट, नाडा, विहीर ह्या गोष्टींपेक्षा काय वेगळे आहे ? ह्या मोटेची डागडुजी करणे, विहिरीची साफसफाई करणे ह्या गोष्टी कंटाळवाण्या तर नाहीतच, पण पंढरपूरची बडव्यांच्या हस्ते अगर सध्याच्या काळात मंत्र्यांच्या हस्ते होणारी षोडशोपचाराची पूजा पाहण्यापेक्षा मोट, नाडा, विहीर ह्यांची देखभाल करणे म्हणजेच पंढरपूरचीच वारी होय. सावता माळ्याने दिलेली ही दृष्टी फारफार क्रांतिकारक आणि दैनंदिन कामे आनंददायक करणारी आहे. ह्या दृष्टीमुळे रोजची आंघोळ कशीबशी उरकून देवपूजेला धावायची गरज उरत नाही, उलट सर्वांगाला चोळूनमोळून गरम वा गार पाण्याने शरीर स्वच्छ करण्यातील आनंदाचा अपूर्व ठेवा सामान्य माणसाला मिळतो. जोपर्यंत हा सामान्य माणूस जिवंत आहे तोपर्यंत त्याला आंघोळ तर चुकत नाही, मग ती आंघोळ कशीबशी 'उरकून' टाकण्याऐवजी ती आंघोळ करणे म्हणजेच देवपूजा करणे ह्या श्रद्धने केली तर बारीकसारीक काम 'हलके' होऊन आनंद तर लाभेलच लाभेल, शिवाय शरीरही व्यवस्थित आंघोळीमुळे ताजेतवाने होऊन मनाला प्रसन्न करील. शरीराचा आणि मनाचा हा परस्परपोषक संबंध देवभोळ्यांनी फार दुर्लक्षित केला आहे. सावता माळ्याने 'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी' असे सांगितल्याने दैनंदिन कामांचे स्वरूपच बदलायला फार मोठी मदत झाली, असे मला वाटते.


सावता माळ्याने कांदा, मुळा, भाजी ह्यांनाच परमेश्वर म्हटल्याने आणखी एक क्रांतिकारक गोष्ट साध्य झाली, असे मला वाटते. कांदा, मुळा, भाजी हे परमेश्वर झाल्याने काय फरक होतो ? फरक असा होतो की, परमेश्वर हा जसा अनादि, अनंत असतो तशीच ही माझी भाजी—कांदा, मुळा—अनादि आहे, म्हणजे अशी भाजी मागे कधी झाली नाही, पुढे कधी होणार नाही इतकी अप्रतिम झाली आहे. प्रत्येक कांदा, प्रत्येक मुळा मी असा पिकवीन, की त्याच्यासारखा उत्कृष्ठ तोच-आणि येणाऱ्या प्रत्येक गिऱ्हाईकाला मी असा सर्वोत्कृष्ट कांदा, सर्वोत्कृष्ट मुळा देईन, अशी जर प्रत्येक



कपडे धुण्यासाठी
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि चोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हां, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं! मग वापरतेस तरी काय तू?
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं! डेट डिटर्जंट वडीनं साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं!
NEW! det
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो–अगदीं क्षारयुक्त असलें तरी!
स्वस्तिक ऑईल मिल्स, मुंबई.
Shilp. HPMA-45 A/71 Mar

शेतकऱ्याची जीवनधारणा झाली तर मग मानवी संसार सुखाचा होणार नाही काय ? ' अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ' ही संतांची प्रतिज्ञा आहे ती पूर्ण करण्यासाठी आभाळातल्या देवाची गरज नाही, किं टाळ कुटीत पंढरपूरला जाण्याची आवश्यकता नाही, किंवा कर्मयोग समजण्या च आटापिटा करून कर्मफळ देवाच्या चरणी अर्पण करण्याची गरज नाही. कारण सावता माळ्याने कामालाच देव करून टाकल्याने फळ अर्पण करणार कोणत्य देवाला ?

सावता माळ्याने सामान्य माणसाच्या दैनंदिन कामकाजाबद्दल जो जीवनपोषक आस्तिक भाव दाखवला तो दुसऱ्या कोणत्याही आस्तिकभावापेक्षा अणूभरही कमी नाही. सावता माळ्याच्या आस्तिकभावामुळे सामान्य माणूस देवकल्पनेच्या जोखडातून मुक्त होण्याची फार मोठी संधी प्राप्त झाली होती. परंतु नंतरच्या ह. भ. प. कीर्तनकारांनी आणि प्रवचनकारांनी सावतामाळ्याच्या ह्या आस्तिकभावाची कदर न करता पुन्हा पंढरपूरची वाट धरल्याने सामान्य माणसाची फरफट चालूच राहिली. पेरणीची कामं आटोपून तो पुन:पुन्हा पंढरीची वाट तुडवित राहिला. परत आल्यावर शेतीची कामं करताना त्याच्या मनात पुढच्या वारीची ओढ जागत राहूली. काम शेतात करायचं आणि मन पंढरपूरला रेंगाळत ठेवायचं अशी फारकत जीवनात आल्यावर कोणत्या घरात शांती नांदेल ? वास्तविक ही शांती प्रत्येक सामान्य माणसाच्या जीवनात क्षणोक्षणी अखंडपणे नांदण्याची युक्ती फार सोपी आहे. आणि ती युक्ती म्हणजे दुसरे तिसरे काही एक न करता ' कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ' अशा प्रेमानं, तन्मयतेनं रोजचं काम करायचं. मग विठोबाच्या भक्तीनं जे जे लाभ घडतात ते सर्व लाभ सामान्य माणसाच्या जीवनात फुलाप्रमाणे उमलत राहतात; जीवनाला सुगंधित करतात.



# कविता

## कविता

या बलदंड बाहूंनी–
–कोसळत्या आकाशाचा
तोल सावरायचा आहे
–तळपत्या वेदनेचा सूर्य
दृष्टीआड करायचा आहे.
–भिरभिरणाऱ्या मृत्यूचे थैमान
चिरडून टाकायचे आहे
दोन बोटांच्या चिमटीत
इमानदार असावी फक्त
पायाखालची माती फूलवती.

प्रा. वि. त्र्यं. पाटील

## कविता

अशीच प्रतिभेची
येतो पाखरे...
घेऊनी सोबतीला
कल्पनांचा थवा...
शब्दाद्वारे भरवितात मला
अनेक कथा–
व्यथांचा मेळावा...

फिलीप पाटोळे

## अट्टाहास

केवढा हा अट्टाहास
रात्रंदिन सुखासाठी
सत्य सोडूनिया कां रे
लागतोस मिथ्यापाठी ?
जीर्ण प्रपंच अंबर
जोडशील कुठवरी
सदा राहील फाटके
जन्म सारा गेला तरी

अविश्रांत खटपट
चाले ज्याच्या सौख्यासाठी
क्षणभंगूर हा देह
नाही तोहि तुझ्या हातीं
ज्याने तुला निर्मियले
तोचि वाहे तुझी चिंता
नाठविसी तया चित्तीं
क्षण दवडसी वृथा

पार्वतीनंदन

प्रा. वि. त्र्यं. पाटील यांच्या कवितेत एक मनस्वी जिद्द आणि त्यामागची प्रामाणिक अपेक्षा साकार झाली आहे. बाहू बलदंड आहेत आणि मनातली जिद्द त्याहून बलदंड आहे. भोवताली आकाश- कोसळत आहे, पण ते सावरण्यासाठी ही जिद्द उभारलेली आहे. वेदनेचा सूर्य साक्षात तळपतो आहे. पण तो दृष्टिआड करण्याचा सोशिक निर्धार आहे. मृत्यूलाही आव्हान देणारी ही जिद्द समर्थपणे साकारली आहे. तिला कशाचीच पर्वा नाही, कुणाच्या साहाय्याची अपेक्षा नाही. तिची अपेक्षा फक्त एकच : पायाखालची फुलवती माती इमानदार असावी. तिथे बेइमानी नको आधार डळमळता नको. फुलणारा, फुलवणारा हवा. तीन विराट रूपकांना या फुलवती मातीच्या इमानाने सावरून धरले आहे. तोलले आहे. बलदंड बाहूसारखे !

फिलीप पाटोळे यांच्या छोटयाशा कवितेत कवीच्या अनुभवाचे चित्र एका रूपकातून रेखले आहे. हे परंपरित रूपक आहे. प्रतिभेची पाखरे, कल्पनांचा थवा, शब्दद्वारे भरविला जाणारा कथाव्यथांचा मेळावा ही सगळी रूपके परस्परांत बसलेली आहेत. कवीचा कथारूप अनुभव व्यथांची कहाणी सांगणारा असतो. जगाच्या निरीक्षणातून शब्दांच्या माध्यमातून कवीने या व्यथा जाणून घेतल्या आणि जाणवून दिलेल्या असतात. हे सत्य या रूपकातून फार सुरेख रीतीने व्यक्त झाले आहे. पुन्हा त्याला दृश्याचे परिमाण लाभले आहेत. हा अनुभव एकाचवेळी सत्यान्वेषी नि मोहक झाला आहे.

'अट्टाहास' या कवितेतून पार्वतीनंदन यांनी एक साधा सरळ उपदेश साध्या सरळ भाभडेपणाने केला आहे. रात्रंदिवस सुखासाठी अट्टाहास करणाऱ्या आणि त्यापोटी सत्य सोडून मिथ्यापाठी लागणाऱ्या माणसाला हा उपदेश आहे. प्रपंच हे जीर्ण अंबर आहे. सारा जन्म गेला तरी ते फाटकेच राहणार. 'अंबर' या शब्दातील श्लेषध्वनी लक्षणीय आहे. अंबर म्हणजे वस्त्र, आणि आकाश. फाटलेले आकाश शिवणे शक्य आहे काय ? बरे, ज्याच्यासाठी ही अविश्रांत खटपट करायची, तो देहही आपल्या हाती नाही. तो तर क्षणभंगूर आहे. अशा परिस्थितीत आपल्या निर्मात्या ईश्वरालाच आठवणे म्हणजे क्षणांचे सार्थक होय, असा हा सरळसरळ हिशेब आहे.

– रसिक

# वळी



उग्गुलीनं आपल्या लांबसडक पापण्या हलकेच उघडल्या तेव्हा दिवस चांगलाच वर आला होता. आपग आपल्या घरात नसून डाकबंगल्यांतच झोपलो आहोत याची आठवण येताच ती लगबगीने उठून बसली. हवेत एव्हाना ऊष्मा जाणवू

लागला होता. 'अरे देवा! आज लवकर उठायचे ठरवले होते आपण! आता ब्रेकफास्ट वगैरे होऊन बाहेर पडेपर्यंत नक्कीच नऊ वाजणार आणि मग ते रणरणते ऊन!' ती स्वतःशीच पुटपुटली. अजून जॉर्ज पति-पत्नी उठलेले दिसत नव्हते.

जॉर्जची आठवण येताच तिला तिरस्कार वाटला. जन्माने खरं तर तो भारतीय तरुण! पण तरीही भारताबद्दल त्याच्या मनात द्वेष भरलेला होता. असं म्हणतात की तो आठदहा वर्षांचा असतानाच त्याचे आई-वडील वारले. त्यानंतर दोनतीन वर्ष त्याला फारच हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. पुढे मिशनरी लोकांनी त्याला संभाळले आणि आपल्या शाळेत शिक्षणही दिले. त्याचं सारं आयुष्य अशाप्रकारे गेलं की हिंदुस्थानबद्दल त्याच्या मनात काडीचंही प्रेम राहिलं नाही. पुढे तो इंग्लंडमध्येच स्थायिक झाला होता आणि तिथेच त्याने लग्नही केलं होतं. भारतातल्या खेडूत लोकांच्या वागण्याची, अंधश्रद्धांची त्याच्या मनातली आठवण मात्र इतकी तीव्र होती की भारतीय लोक म्हणजे खेडवळ व मूर्ख लोक अशी त्याची ठाम समजूत झाली होती.

ज्युली आणि जॉर्जची बायको ब्रिजिता या दोघींच्या आग्रहाखातर केवळ तो भारतात आला होता. त्या दोघींना भारतातली प्रेक्षणीय स्थळं पाहायची होती. भारतीयांची संस्कृति जाणून घेण्याचा प्रयत्न करायचा होता. ज्युलीला तिच्या वर्तमानपत्रासाठी त्यातल्या काही ठिकाणांचे फोटो व माहिती हवी होती. हिंदुस्थानी रीतिरिवाजांविषयी तिला लेख लिहायचे होते; आणि त्यामुळे मोठ्या रसिक दृष्टीने प्रत्येक गोष्टीकडे ती पाहात होती. आग्र्याचा ताजमहाल पहाताना तिचं मन तृप्त होऊन गेलं होतं. अजिंठा-वेरुळच्या लेण्यातलं सौंदर्य निरखताना तिच्या डोळ्यांचं पारणं फिटलं होतं. म्हैसूरच्या वृंदावन गार्डन्समध्ये तऱ्हेतऱ्हेच्या आकाराच्या फवाऱ्यांवर केलेल्या रंगाच्या किमयेनं जे स्वर्गीय दृष्य निर्माण केलं होतं, त्यात ती स्वतःला हरवून बसली होती. श्रीकृष्णाची मथुरा पाहताना तिचं हृदय उचंबळून आलं होतं. याखेरीज कन्याकुमारी, मद्रास, गोवा, हैद्राबाद, मुंबई, ग्वाल्हेर, काशी, पंढरपूर गया, हरिद्वार, दिल्ली अशा अनेक ठिकाणी जाऊन तिनं जे जे म्हणून पाहण्याजोगं आहे ते ते सर्व तिथं पाहिलं होतं. निरनिराळ्या प्रांतातल्या सणांची अन् प्रथांची माहितीही तिनं मिळवली होती. पुष्कळदा भारतीयांचं श्रद्धावान्, भावूक मन तिला जवळून पहायला मिळालं होतं. एकंदरीत भारत तिला आवडला होता.

पण ती अशा तऱ्हेनं प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेत असतानाच, जॉर्ज मात्र त्या

साऱ्याचीच टवाळी करीत होता. भारतीयांच्या प्रत्येक कृतीला मूर्खपणाचा शिक्का मारून छद्मीपणानं हसत होता. आतादेखील ते त्या दुष्काळी प्रदेशात आले, ते त्याच्या या छिद्रान्वेषी वृत्तीमुळेच. भारत किती कंगाल आहे, हे त्याला त्या दोघींना दाखवून द्यायचं होतं. उपासमारीनं अशक्त झालेल्या स्त्री-पुरुषांचे आणि पंडुरोगानं ग्रासलेल्या लहान मुलांचे त्याला फोटो घ्यायचे होते. कालचा सबंध दिवस या उजाड, रखरखीत प्रदेशातून प्रवास करताना, तो मोठ्या उत्साहाने काचेतून बाहेर पहात होता आणि त्या शुष्क दृष्यांतून आसुरी आनंद मिळवीत होता. बाहेर आपले पर्णहीन हात पसरून आकाशाकडे पहात उभी असलेली शुष्क झाडं, आणि मधूनच दृष्टीस पडणारी मोडकळीस आलेली एखादी झोपडी याखेरीज काहीही दिसत नव्हतं. वेगाने जाणाऱ्या त्या कारमुळे तापलेली धूळ तेवढी वर उडत होती. बाहेरचा ऊष्मा भयानकपणे जाणवत असल्याने ब्रिजिता आणि ज्युली त्यावेळी अगदी गळून गेल्या होत्या. पाठीमागे मान टाकून त्या स्वस्थ पडल्या होत्या. पण जॉर्जवर त्यांच्या या उदासीनतेचा किंचितही परिणाम झाला नव्हता. रात्रीच्या मुक्कामासाठी ती सारीजणं डाकबंगल्यात उतरली होती.

" बाईसाहेब..." देवेंद्रच्या आवाजानं ज्युली एकदम दचकली.

" आपण आपल्या सहप्रवाशांना कृपा करून जागं कराल तर बरं होईल. ऊन व्हायच्या आत आपल्याला प्रवासाची सुरुवात करता येईल."

देवेंद्र हा भारतीय तरुण त्या सर्वांचा मार्गदर्शक आणि मदतनीस म्हणून काम पाहत होता. तो देखणा तरुण ज्युलीला फार आवडला होता. त्याच्या रूपाबरोबरच त्याची शिष्टाचारपूर्ण अशी वर्तणूक आणि त्याच्या काळ्याभोर, विशाल डोळ्यांतली बुद्धिमत्तेची चमक तिच्यावर अधिकच प्रभाव पाडीत होती. देवेंद्रकडे पाहून ती संमतिदर्शक हसली आणि चटकन् उठून जॉर्ज पती-पत्नींना उठविण्यास गेली.

थोड्याच वेळात ती सारीजणं ब्रेकफास्टसाठी टेबलाभोवती जमली. ऊष्मा वाढू लागला होता. कुठूनतरी आदिवासी लोक वाजवीत असलेल्या ढोलक्यांचा आवाज कानावर येत होता. जॉर्जच्या चेहऱ्यावर तिरस्कारयुक्त हास्य विलसत होते. एकदम त्याचे बाजूच्या खिडकीतून बाहेर लक्ष गेले आणि त्याने ज्युलीला खुणावून तिकडे बघायला सांगितले. तिने तसे करताच ती एकदम दचकली. डाकबंगल्यांत माणसांचा वावर पाहून काही आदिवासी बाहेर जमा झाले होते. त्यांच्या शरीरातले हाड न् हाड मोजता येईल इतके ते कृश होते. खोल गेलेल्या डोळ्यांत कुठल्याही प्रकारे जिवंतपणाची छटा दिसत नव्हती. थिजलेल्या दृष्टीने ते बंगल्याकडे पाहात होते. त्यांच्या काळ्या कुळकुळीत रंगामुळे त्यांचे डोळे आणि दात तेवढे चमकत होते. हाडांचे सापळेच थडग्यांतून उठून समोर येऊन उभे राहिले असावेत असा भास होत होता.

" वा ! काय माणसं आहेत ! जनावरं बरी यांच्यापेक्षा." जॉर्ज उपहासाने म्हणाला.

ज्युलीला मात्र त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटली. एक सुस्कारा सोडून ती पुढ्यांतल्या चमच्यांशी चाळा करू लागली.

"फार सुंदर देश आहे बरं का मिस्टर देवेंद्र तुमचा! पूर, दुष्काळ, उपासमार, यांनी जनता हैराण झालीय. महागाई दिवसेंदिवस कडाडते आहे. रुपयाचं अवमूल्यन झालंय्! राजकारणात भ्रष्टाचार, अंदाधुंदी माजलीय. प्रत्येकजण सत्तेसाठी हपापलाय्. आपलाच स्वार्थ साधून घेण्यासाठी टपून बसलाय्. कुणाचा कुणाला ताळमेळ नाही. अशा परिस्थितीत इतर बलाढ्य आणि पुढारलेल्या राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा आणि सल्लामसलती करण्याचा उद्धटपणा तुमच्याने करवतो तरी कसा? इतर देशांच्या कृतीवर टीका-टिप्पणी करण्याचं तुमचे हे कृत्य, म्हणजे एखाद्या भिकाऱ्यानं भीक घालणारालाच उपदेशामृत पाजण्याइतकंच असह्य आणि मूर्खपणाचं आहे."

जॉर्जची ही बडबड देवेंद्रासारख्या देशाभिमानी तरुणाला अर्थातच सहन होणारी नव्हती. क्षणार्धात त्याचे डोळे लाल झाले. आपल्या लांबसडक बोटांनी तो आता जॉर्जचा गळा आवळणार की काय असा रंग दिसू लागला. पण मोठ्या संयमाने त्याने स्वतःला सावरले. तेथले तंग वातावरण निवळावे म्हणून ज्युलीने विषयांतर करण्यासाठी विचारलं—

"मिस्टर देवेंद्र, इथून थोड्याशा अंतरावर तो जो जुनाट किल्ला दिसतोय् त्याविषयी तुम्ही काही सांगू शकाल काय?"

देवेंद्राने तिच्याकडे पाहिले आणि तो थोडासा हसला.

"तो फार जुना किल्ला आहे," तो सांगू लागला. "त्या किल्ल्याविषयी सांगण्यासारखं फारसं काहीच नसलं तरी आसपासच्या खेड्यांत मात्र त्याचं फार महत्त्व आहे; कारण वरुणदेवाला माणसाचा बळी देण्यासाठी ते याच जागेचा उपयोग करीत असत. आता कायद्याने ती प्रथा बंद करण्यात आली आहे. तरीही असा बळी दिल्याखेरीज पाऊस पडत नाही असा समज त्यांच्यात अजूनही कायम आहे."

"म्हणजे ते लोक अजूनही माणसाचा बळी देतात की काय?" ब्रिजिताने घाबरून विचारले.

"बाई ग! ते असं करायला धजावतात तरी कसे?" ज्युली पुटपुटली. भारतीयांच्या अडाणीपणाचा आणखी एक दाखला मिळाल्याने, जॉर्जने विजयी चेहऱ्याने ज्युलीकडे पाहिले.

इतक्यात देवेंद्रच पुन्हा म्हणाला—

"हा ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनाचा प्रश्न आहे. बाईसाहेब, हे लोक एका माणसाने इतर लोकांच्या जीवनासाठी आत्मत्याग करणे एवढाच या गोष्टीचा अर्थ घेतात. या उलट ज्या लोकांशी आपलं काही शत्रुत्व नाही अशा परदेशातल्या

लोकांना मारून त्यांच्यावर राज्य करण्यासारखी गोष्ट मात्र ते जंगलीपणाची समजतात." असं म्हणत त्यानं खुर्ची मागं सरकवली आणि तो उभा राहिला.

त्याचा हा फटका अर्थातच वर्मी बसल्याने जॉर्ज उसळला.

"म्हणजे तुमच्या या अडाणी टोळयांच्या बळी देण्याच्या पद्धतीची आणि आधुनिक युद्धपद्धतीची तुलना करू पाहता की काय तुम्ही?" दातओठ खात जॉर्ज म्हणाला. पण त्याचे बोलणे ऐकून घ्यायला देवेंद्र तिथे थांबलाच नव्हता.

ब्रेकफास्ट झाल्याबरोबर त्या दुष्काळी प्रदेशांतल्या स्त्रीपुरुषांची छायाचित्रं घेण्यासाठी आपण बाहेर पडणार असल्याचं जॉर्जनं जाहीर केलं. त्याच्या या वर्तणुकीचा तिटकारा वाटत असल्यानं ज्युलीनं त्याच्याबरोबर जाण्याचं नाकारलं. ब्रिजितानेही आपल्याला उन्हात फिरण्याचा कंटाळा आला असल्याचं सांगितलं. दोघींच्या नकारामुळे वैतागलेला जॉर्ज देवेन्द्राकडे वळून म्हणाला—

"ठीक आहे. मिस्टर देवेंद्र, चला. मला त्या खेडुतांच्या वस्तीवर जायचं आहे."

"माफ करा मिस्टर जॉर्ज! मी येणार नाही." हाताची छातीवर केलेली घडी तशीच ठेवून देवेंद्रानं थंडपणे उत्तर दिलं.

जॉर्जच्या तळपायाची आग मस्तकात गेली. संतापाने त्याच्या कपाळावरील शीर ताड्ताड् उडू लागली.

"बस्स् झालं! त्यासाठी तुम्हाला पगार दिला जातोय. यायलाच पाहिजे तुम्ही!" संतापाने बेभान होऊन तो ओरडला.

"तुमचा गैरसमज झालाय मिस्टर जॉर्ज! तुम्हाला प्रेक्षणीय स्थळं दाखवावी यासाठी मला पगार मिळतोय. दुसऱ्या कशासाठीही नव्हे." मुळीच न संतापता देवेन्द्र उत्तरला.

जॉर्ज आ वासून त्याच्याकडे पाहातच राहिला. त्याचा संताप अनावर झाला होता. पण तरीही तो संयम राखण्याचा प्रयत्न करतोय हे अगदी स्पष्टपणे दिसून येत होतं. त्याने आपली हॅट चढवली आणि एक अक्षरही न बोलता तो बाहेर पडला. सकाळच्या कडक उन्हाचे चटके त्याला जाणवू लागले. पण त्याकडे लक्ष देण्याच्या मन:स्थितीत तो नव्हता. भारतीयांबद्दलच्या चिडीने त्याचे मन व्याप्त झाले होते. पायाखालचा रस्ता अगदीच ओबडधोबड आणि खाचखळग्यांचा होता. शेतांमध्ये झुडुपाचे वाळलेले बुडखे इतस्ततः दिसत होते. अधूनमधून त्याला ठेचा लागत होत्या. मध्येच त्याचा तोल जात होता आणि स्वतःला सावरता सावरता शिव्या हासडीत होता. उन्हामुळे त्याच्या अंगातून घामाच्या धारा चालल्या होत्या; त्यामुळे अशा उन्हात गरम सूट घालून येण्याचा मूर्खपणा केल्याबद्दल तो स्वतःवरच जळफळत होता.

थोडयाच वेळात तो त्या खेडुतांच्या वस्तीजवळ येऊन पोहोचला. क्षणभर थांबून त्याने आपल्या सेंट शिंपडलेल्या हातरुमालाने एकवार चेहरा पुसून जरा साफ केला

आणि नंतर तो पुढे झाला. झोपड्यांच्या बाहेर आणि दारांत मिळेल तेवढ्या सावलीत, स्त्रीपुरुष अजिबात हालचाल न करता पडलेले होते. त्यांचे चेहरे उपासमारीने इतके रोड झालेले होते की, एका दृष्टिक्षेपात त्यांच्यापैकी कोण तरुण आणि कोण म्हातारे आहे हे देखील ओळखणे अशक्य होते. तो तिथे आल्यावर कोणीही उठून बसले नाही. अगदी निश्चलपणे ते सर्वजण पडून राहिलेले होते. परंतु त्यांचे डोळे मात्र तो जसजसा फिरेल तसतसे त्याच्या मागोमाग फिरत होते.

जॉर्ज मोठ्या आनंदीत मुद्रेने इकडे–तिकडे फिरू लागला. त्याला ते दृश्य म्हणजे करमणुकीचा विषय वाटत होता. आता चांगल्यापैकी फोटो घेऊन भारताचे दारिद्रय चव्हाट्यावर मांडता येईल या कल्पनेने त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. इतक्यात एक बालक छातीशी घेऊन अर्धनग्नावस्थेत पडलेली एक तरुण स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. जॉर्ज तिच्याजवळ गेला, तेव्हा ते बालक मृत आहे, हे त्याच्या लक्षात आले; पण दुधाच्या निरर्थक आशेने उघडे पडलेले त्याचे तोंड अजूनही तसेच उघडे दिसत होते. हा फोटो चांगला येईल या विचाराने तो खाली वाकला आणि त्या स्त्रीला सावलीतून हलविण्याच्या उद्देशाने त्याने तिच्या खांद्याला स्पर्श केला. पण त्याने तसे करताच त्याला तिथल्या भयाण शांततेत एक वेगळीच निःस्तब्धता पसरल्याची जाणीव झाली. तो एकदम मागे सरकला आणि त्याने सभोवार पाहिले.

प्रत्येक झोपडी-झोपडीतले स्त्री-पुरुष एकदम पैशाचिक शांतपणे उठून उभे राहिले होते. सगळ्या झोपड्या आयताकृती जागेत पसरलेल्या होत्या; आणि सर्व बाजूंनी एकाएकी उभी राहिलेली ती माणसे, मधल्या मोकळ्या जागेकडे हलके हलके सरकू लागली होती. त्यांच्या हालचालीत अतिशय भयाण शांतता दिसून येत होती. निर्दयपणे पाहाणाऱ्या त्या असंख्य काळ्याभोर डोळ्यांनी आपली नजर बांधून, मारून टाकल्यासारखी झाली आहे असं जॉर्जला वाटू लागलं. भुताप्रमाणे अगदी सावकाश गतीने ते चोहोबाजूंनी पुढे येत होते. जवळ...! अधिक जवळ...!!

भीतीची एक लाट त्याच्या शरीरातून थरथरून गेली. त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. हवालदिल होऊन सभोवार पाहत तो हळू हळू मागे सरकू लागला. लवकरच त्याची पाठ एका झोपडीला टेकली आणि त्याच्याभोवती चारीबाजूंनी गूढ आणि भयाण असे काळेभोर डोळे आणि काळेशार चेहरे यांची गर्दी झाली.

एक प्रकारचा उग्र दर्प आता त्याच्या नाकाला जाणवू लागला. स्वतःच्या बचावासाठी हातदेखील न उचलता तो स्वतःच जणू काळाच्या जबड्यात ओढला जात होता. असहायपणे ! एकाएकी त्याच्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली; आणि लगेच आपला कोट फाडून त्याने बऱ्याचशा नोटा बाहेर काढल्या. "हे घ्या ...हे घ्या !" असे म्हणत तो त्या नोटा त्यांच्याकडे भिरकावू लागला. पण संथपणे पुढे सरकणाऱ्या पावलांखाली त्या नोटाही तुडवल्या गेल्या. त्यांची ती पैशांविषयीची उदासीनता पाहून जॉर्जची शेवटची आशाही मावळली आणि तो भयाने जागच्या जागीच थिजल्यासारखा झाला. त्याच्या घशाला कोरड पडली. जीभ आत ओढली

जाऊ लागली. "वाचवा...वाचवा...!"—असे खूप जोरात किंचाळावे असे त्याला वाटत होते पण जीभ टाळूला घट्ट चिकटली होती. प्रयत्न करूनही त्याच्या तोंडून शब्दही फुटेना.

...डाक बंगल्यामध्ये जॉर्ज पाचला हजर नव्हता; तरीही कुणाला त्याबद्दल फारशी काळजी वाटली नाही. पण जेव्हा आसपासच्या प्रदेशात ढोलक्यांचा आवाज घुमू लागला तेव्हा सारीजण अस्वस्थ होऊन गेली. थोड्याच वेळात त्या निःस्तब्ध शांततेतून बंगल्याभोवतालच्या परिसरात माणसं जमू लागली. ते लोक बेभान होऊन ढोलकी वाजवीत होते. त्यांच्या त्या वेळच्या रानटी, आनंददर्शक आरोळ्या आणि चित्रविचित्र चित्कार, ह्यांनी वातावरण भारून टाकलं होतं. बंगल्यापासून थोड्या अंतरावर त्यांचा थयथयाट चालू होता. त्यामुळे ज्युली आणि ब्रिजिता, दोघीही भीतीने गारठून गेल्या होत्या.

दिवस कलू लागला, झाडांच्या सावल्या लांब होऊ लागल्या. तेव्हा मात्र साऱ्यांनाच जॉर्जबद्दल काळजी वाटू लागली. अखेर सारी जणं जॉर्जच्या शोधार्थ बाहेर पडली. बंगल्याबाहेर पडताच त्यांना सर्वत्र ढोलक्यांचा आवाज घुमत असलेला ऐकू येऊ लागला. त्या रानटी लोकांचा तो विजयदर्शक थयथयाट पाहून ब्रिजिताच्या मनात अशुभाची पाल चुकचुकली. बराच वेळ हिंडूनही जॉर्जचा पत्ता लागेना. तिघांचेही चेहरे त्याच्याविषयीच्या चिंतेने काळवंडून गेले. अखेर हताश होऊन ते परतणार, तोच एका ठिकाणी गिधाडांचा समुदाय जमा झालेला त्यांनी पाहिला. ते सर्व अधिक जवळ गेले आणि तिघांच्याही छातीत धस्स झाले! कारण त्या गिधाडांचे भक्ष्य झालेली ती व्यक्ति म्हणजे खुद्द जॉर्जच होता. त्याचा चेहरा ओळखूही न येण्याइतका विद्रूप बनला होता. ते दृश्य पाहून ब्रिजिता एकदम किंचाळली. ज्युलीदेखील भीतिने पांढरीफटक पडली.

त्या दोघींना कारमध्ये बसवून देवेंद्राने जॉर्जचे शव एका पांढऱ्या चादरीने आच्छादले आणि अलगद उचलून त्याने ते स्टेशनवॅगनमध्ये ठेवले. एक शब्दही न उच्चारता देवेंद्राने आपली जागा घेतली. परतीच्या प्रवासाच्या साऱ्या योजना मनाशी पक्क्या करीत तो कार चालवू लागला. ज्युलीच्या खांद्यावर डोकं ठेवून ब्रिजिता मुसमुसत होती आणि ज्युली एखाद्या संगमरवरी पुतळ्याप्रमाणे स्तब्ध बसली होती. तिच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. निःस्तब्धपणे त्यांचा प्रवास चालू होता.

अन् मग थोड्याच वेळात पावसाला सुरुवात झाली. पावसाचे मोठमोठे टपोरे थेंब गाडीच्या टपावर, बाजूंवर आपटत होते. त्यांचा होणारा ताड् ताड् आवाज कर्णकटू वाटत होता. घनघोर पावसाच्या त्या आवाजांतूनही ढोलक्यांचा तो विजयसूचक आवाज सर्वांच्या कानावर येत होता. आधाशाप्रमाणे ते पावसाचे पाणी पिणाऱ्या, तहानलेल्या वसुंधरेच्या रोम-रोमांतून जणू तो आवाज घुमत घुमत वर येत होता, आणि अजूनही घुमत होता. हृदयाला भेदून जात होता. ◻ ◻ ◻

सौ. पुष्पा भावे

# पुस्तके

## श्री. विजय वाडेकरांच्या दोन कादंबऱ्या

## योगभ्रष्ट । मन वढाळ वढाळ

श्री. वाडेकरांच्या 'नामा म्हणे' या कथासंग्रहाचा परिचय या सदरातून वाचकांना करून देण्यात आला होता. त्या वेळी लेखकाच्या नवे अनुभव शोधण्याच्या प्रवृत्तीचा उल्लेखही, मला वाटते, मी केला होता. त्यानंतर श्री. वाडेकरांनी लिहिलेल्या दोन लघुकादंबऱ्यांत याच प्रवृत्तीचा प्रत्यय येतो. 'योगभ्रष्ट' ही एका सामान्य लेखकाची शोकांतिका आहे, तर 'मन वढाळ वढाळ' ही एक मनोविश्लेषणात्मक कादंबरी आहे. या दोन्ही कादंबऱ्यांतून मूळ अनुभवाशी एकनिष्ठ राहण्याच्या प्रयत्नांचेही दर्शन घडते.

'योगभ्रष्ट' या कादंबरीतील अनुभवांची मांडणी काहीशी 'नामा सुढाळाचे सुखदुःख' या व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेसारखी आहे. रंगनाथ जोशी यांच्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन आणि आयुष्यात अचानक उशीरा आलेले त्याच्या पत्नीचे बाळंतपण या दोन प्रसंगांनी या कादंबरीतला ताण निर्माण केलेला आहे. पुष्कळ वर्षे लिहीत असूनही आपले वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व निर्माण करू न शकलेला रंगनाथ एका मोठ्या प्रकाशकाकडे नोकरीला असल्याने त्याची खंत द्विगुणित होत असते; तरीही तो लेखनसंन्यास घ्यायला तयार नाही. कधीतरी आपल्या हातून खऱ्या कथा लिहून होतील असे त्याला वाटते. त्या अपेक्षेने तो बेचैन आहे, तर त्याची पत्नी मूल होत नाही म्हणून असमाधानी आहे. या दोन बेचैन जीवांच्या संसाराचा ताण लेखकाने संयततेने व्यक्त केले आहेत. अचानक एक दिवस त्या दोघांच्या लक्षात येते की त्यांना बाळ होणार आहे; —आणि रंगनाथचा मंदावलेला उल्हास पुन्हा उमलतो. तो पुन्हा लिहायला लागतो. सायंदैनिकाच्या निमित्ताने अनेक नव्या अनुभवांना तो सामोरा जातो. पण आपण लिहिलेले पुन्हा वाचताना 'त्याला ते सारे कागद एखाद्या वाया गेलेल्या रोलसारखे फिक्कट आणि हाललेल्या

अस्पष्ट दृश्यासारखें वाटले.' (पृ. ६७) तरी उत्साहाच्या भरात तो आपल्या मालकाला कथासंग्रहाच्या प्रकाशनाविषयी विचारतो. त्याला निरुत्साही करीत, त्याच्यावर उपकार केल्याप्रमाणे, मालक कबूल होतो. त्याची पत्नी वाढत्या गरोदरपणाच्या कळांचा अनुभव घेत आहे तर रंगनाथ पुस्तकांची प्रुफे तपासतो आहे. अचानक फोन खणखणतो आणि निरोप येतो की, त्याचे मूल जन्मतःच मृत होते. या बातमीने त्याच्या पहिल्या प्रकाशनाचे भविष्य जन्मापूर्वीच जणू निश्चित होते. श्री. वाडेकरांना एक वेगळा अनुभव, वेगळेपणाने मांडायचा होता. तसा प्रयत्नही त्यांनी कसोशीने केला आहे. वेगवेगळ्या स्वभावांच्या माणसांच्याशेजारी नायकाचे चित्र ठेवून त्याला मिती देण्याचा यत्न ते करतात. परंतु या छोट्या कादंबरीत प्रत्यक्ष प्रतिक्रियांपेक्षा प्रतिक्रियानिमित्तांच्या तपशीलवार वर्णनामुळे वाचकांचे अवधान अनेकदा ढळते. इतकेच नाहीतर एखाद्या प्रतिक्रियेच्या नेमक्या अविष्कारानंतर येणाऱ्या पसरट वर्णनाने पूर्वीचा परिणामही नाहीसा होतो. प्रस्तुत कादंबरीतल्या लेखकनायकाला जसे समर्थ अनुभव हाती असूनही ते समर्थपणे व्यक्त करता येत नाहीत तसेच श्री. वाडेकरांचे या कादबरीत झाले आहे.

## सांकेतिक कथेचे रूप

श्री. वाडेकरांची 'मन वढाळ वढाळ' ही दुसरी कादंबरी एका तरुण मुलीच्या अंतर्मनामध्ये खोल रुजलेल्या एका भयाची–एका मनोगंडाची कथा सांगणारी आहे. असे विषय मराठी कादंबरीला फार नवे नसले तरी अशा विषयांचे समर्थ आविष्करण अजूनही मराठी कथाकादंबऱ्यांत क्वचित्‌च आढळते. विनय काळे नामक एका नटाला सुचेता जोशी नावाच्या मुलीविषयी आकर्षण वाटते; त्या भावनेला प्रतिसाद मिळत आहे असेही वाटते. परंतु सुचेता कसल्यातरी दडपणाखाली वावरते असे दिसते. पोरक्या सुचेताचे पालक असणाऱ्या डॉ. कारखानिसांविषयीच तिच्या मनात अत्यंत किळसवाणी जाणीव आहे. आपल्या थोरल्या बहिणीचे आणि त्यांचे संबंधच तिच्या आत्महत्त्येला कारणीभूत झाले होते हेही तिला माहीत आहे. त्यामुळे विनयवरचे आपले प्रेम ती व्यक्त करू शकत नाही; आपल्या वयाला साजेशा निर्भरपणाने जगू शकत नाही. शेवटी ज्या वाक्याचे तिला अनेक वर्षे भय वाटत असते त्या : 'चल बंगल्यावरच...तिथंच झोप...सकाळी पोचवतो' या वाक्याने तिच्या मनाच्या कोंडमाऱ्याचा निचरा होतो. कारण तेव्हा ती पोरकी असहाय नसते–शेजारी विनय असतो. हा गुंतागुंतीचा अनुभव व्यक्त करताना लेखकाने विनय नट असणे, त्याच्या व्यवसायाला त्याच्या पित्याचा विरोध असणे इत्यादी अप्रस्तुत तपशिलाला का महत्व दिले नकळे. किंबहुना बापूंच्या मनातील असंतोषाने या कादंबरीचा प्रारंभ का व्हावा ? सुचेता–डॉ. कारखानीस यांच्या संबंधाकडे अधिक लक्ष पुरवले असते तर हा अनुभव तीव्रतेने व्यक्त झाला असता. डॉ. कारखानिसांचे इतरांवर हुकमत गाजवणारे व्यक्तिमत्त्व लेखकाने चांगले उभे केले आहे. परंतु

सुचेतासारखा गंड असणारी मुलगी पुरुष-आकर्षणाला सामोरी कशी जाईल याचा फारसा विचार लेखकाने न केल्यामुळे एका मुलाला एक मुलगी भेटते इ. इ.सारख्या सांकेतिक कथेचे रूप या कादंबरीला प्राप्त झाले आहे.

श्री. वाडेकरांच्या या दोन कादंबऱ्या वाचीत असताना त्यांच्या भाषेच्या प्रवाही-पणाची साक्ष पटते. त्यांच्या कथातील भाषेपेक्षा कादंबरीची भाषा अधिक सरळ आहे. वर उल्लेखिल्याप्रमाणे त्यांच्या कादंबऱ्यांचे अनुभव वेगळे आहेत. परंतु नव्या विषयातून कादंबरीची समर्थ संकल्पना उभी करणे त्यांना अजून जमलेले नाही. आपले कथन सोपे, प्रसन्न करण्याच्या भरात त्यांनी आपल्या अनुभवांवर अन्याय केला आहे. तरी ते ज्या मार्गावर आज उभे आहेत तो त्यांना कादंबरीकार म्हणून पुढे नेणारा निश्चित आहे. □

**योगभ्रष्ट : विजय वाडेकर : अस्मिता प्रकाशन : मूल्य तीन रुपये.**
**मन वढाळ वढाळ : विजय वाडेकर : सायली प्रकाशन : मूल्य चार रुपये.**


अवघ्या १०० रुपयांत

# श्री अष्टविनायक यात्रा सहल

मुंबईहून १ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजतां निघून
३ सप्टेंबर रोजी रात्री मुंबईत परत.

**मर्यादित जागा शिल्लक : रात्रीचा मुक्काम पुण्यात**
**स्नानासाठी गरम पाणी : शाकाहारी भोजन व्यवस्था.**

त्वरीत संपर्क साधा :—

**मुसाफिर**

गणेश निवास, गणेश पेठ लेन.
खांडके बिल्डींग नं. ९ समोर.
प्लाझा सिनेमा नजिक. दादर, मुंबई २८.

टेलिफोन : ४५ ८४ ६७.

कार्यालयाची वेळ : सायंकाळीं ५ ते ८ फक्त.



# ब्रमी फ्रंट

लेखांक : तीन

कर्नल आ. भा. जाधव

# शूरा मी वंदिले

२६ ऑगस्ट ४४



इंफाल–कोहिमा–दीमापूर रस्त्यावर आम्ही काही ऑफिसर्स आऊट डोअर मॅप रीडिंग एक्झरसाईजला गेलो होतो. या भागात आता शांतता नांदत होती. खेडी, बाजार, शेतीभाती पूर्ववत वसायला लागली होती. कोहिमा ते दीमापूर रस्ता अत्यंत वळणावळणाचा आहे. त्या सुमारे चाळीस मैलांत शंभर गजांचा तुकडासुद्धा सरळ सापडण्याची मुष्किल. एका बाजूला उंचच उंच आस्मानाशी हितगुज करणारे हिरवे जर्द पहाड तर दुसऱ्या बाजूस खोलच खोल पाताळाला जाऊन भिडणाऱ्या दऱ्या. या जंगली भागात नागा लोकांची वस्ती आहे. ट्रेनिंग एक्झरसाईज संपवून रस्त्याकडेच्या एका खेड्याजवळ आम्ही आलो व तेथे जीप्स उभ्या केल्या. तेथील एका रहिवाशाला– 'येथे जवळपास गर्द छाया आणि पाणी असलेली एखादी जागा आहे का ?' असं मी सहज विचारलं. त्यानं तत्परतेनं आहे म्हणून सांगितलं. हे ऐकताच आमच्याबरोबर असलेले सीनियर ऑफिसर मेजर ग्रीफ म्हणाले– 'गू ऽ ऽ ड. देन लेट अस् हॅव अवर हॅवरसॅक लंच अँड रेस्ट देअर ओनली.'.

तो वाटाड्या आम्हाला जंगलात घेऊन गेला. इतके मनोहारी सौंदर्य तेथे पहायला मिळेल अशी कल्पना नव्हती. दोन तीन स्पॉटस तर अप्रतीम सुंदर होते. स्फटिकवत वाहाणारे असंख्य छोटे-मोठे धबधबे, गर्द छाया देणारे उंच प्रशस्त वृक्ष, अननस, जांभळं, करवंद, वगैरेंची झाडे, वेली, त्या भागात विपुल होती. लंच घेऊन कोणी आरामात गप्पा मारत, कोणी पत्ते खेळत वगैरे बसले होते. इतक्यात आमचा वाटाड्या धावत आला आणि म्हणाला– 'तुम्हाला हत्तींची झुंज पाहायची आहे ? आता इतक्यात सुरू होईल.

आम्हाला त्यानं एका डोंगरावर नेलं. तेथून खालील मैदानातील देखावा स्पष्ट दिसत होता.

इतक्यात एका दिशेने एक उंचापुरा राजबिंडा गजराज चार-पाच हत्तिणी उजव्या बाजूस, चार-पाच हत्तिणी डाव्या बाजूस अशा मेळाव्यात मोठ्या डौलाने मजा करीत चाललेला दिसला. थोड्याच वेळात विरुद्ध दिशेने एक अकेला प्रचंड मस्त हत्ती मोठमोठ्या गर्जना करीत, वर हवेत सोंड उडवीत दौडत आला. त्या मैदानात आमनेसामने दोन्ही पक्ष क्षणभर उभे ठाकले. अकेल्या हत्तीने उजवा पाय

पुढे घेऊन जमिनीवर आपटत, गर्जना करत, सोंडेला तुतारीसारखा बाक देऊन युद्धाचं आव्हान दिलं. हत्तिणीवाल्या गजराजानं तितक्याच मस्तीत गर्जना करून ते स्वीकारलं. साऱ्या हत्तिणी आपल्या इवल्याशा डोळ्यांनी टकमक पाहात एका बाजूला चुपचाप उभ्या राहिल्या. जवळजवळ अर्धा-पाऊण घंटा खूप जोराच तुंबळ युद्ध झालं. दोन्ही गजराज आपले सुळे आणि सोंडींचा भरपूर उपयोग करून एक-मेकाला जेरीला आणण्याचा प्रयत्न करत होते. विजयाचे पारडें जिकडे झुकलेसे वाटे तिकडे हत्तिणींची झुंड वळे. दोन्ही लढवय्ये रक्तबंबाळ झाले. शेवटी अकेल्या हत्तीने शेवटचा निकराचा हल्ला चढवला. त्याने आपले शीर, सुळे, सोंड आणि साऱ्या शरीराचा भार आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या शरीरावर झोकून त्याला मागे रेटत रेटत दोन झाडांच्या खबदाडीत घुसवले. त्याला नामोहरम केले. त्या दिमाख-दार हत्तिणीवाल्या गजराजानं रणांगणातून माघार घेतली. विजयी गजराजानं हवेत सोंड हलवून विजयाचं शिंग फुंकलं. आता त्या राण्या या विजयी गजराजा-भोवती गोळा झाल्या. आपल्या मऊ मखमली सोंडांनी त्याचं रक्त टिपू लागल्या. हा सोहळा संपल्यावर विजयी गजराज या सर्व राण्यांसह मोठ्या डौलानं आल्या वाटेनं निघून गेला.

लढाई खेळण्याची ईर्षा फक्त मानवजातीतच नाही तर ती इतर प्राण्यांतही तितक्याच उत्कटतेने वास करते, याचं जिवंत उदाहरण होतं हे. स्त्रियांच्यासाठी राज्ये घालवणाऱ्या योद्ध्यांच्या अनेक कथा आम्ही वाचल्या. ही प्रत्यक्ष पाहिली.

'शूरा मी वंदिते' ते हे असे.

# खुदा हाफिज

**८ डिसेंबर ४४**



व्हिक्टोरिया टर्मिनसच्या अकरा नंबर प्लॅटफॉर्मच्या छताला लोंबकाळणाऱ्या विजेच्या मोठ्या गोल घड्याळानं आपले भले दांडगे काळे कुळकुळीत हात पसरून चार वाजून अठ्ठावीस मिनिटं झाल्याचं दर्शविलं. प्लॅटफॉर्मवर इकडून तिकड रेंगाळत फिरणाऱ्या अँग्लोइंडियन गार्डाला ते जणू बजावत होतं—'काय सुस्त आहेस लेका, साडेचार वाजायला आले गाडी सोडायची आहे की नाही तुला ?' घड्याळाच्या त्य धमकवण्यानेच की काय भानावर आलेल्या गार्डने मुळातच फुगीर असलेले आपले गाल अधिकच फुगवून डाव्या हाताने तोंडाशी धरून शिटी जोराने फुंकली आणि

उजव्या हातात पकडलेली हिरवी जर्द झंडी मोठ्या रुबाबात हवेत हलवली. इषारा मिळतांच प्लॅटफॉर्मच्या उजव्या किनाऱ्यावर सुस्तावून पसरलेली, 'कलकत्ता मेल व्हाया नागपूर' एकमेकांशी हस्तांदोलन करणाऱ्या डब्यांच्या साखळ्यांचा कर्णकर्कश आवाज करत आस्ते आस्ते सरकू लागली.

फर्स्टक्लास कंपार्टमेंटच्या दाराबाहेरील चकचकीत रुपेरी साईड बार्स दोन्ही हातांच्या मुठीत गच्च पकडून, दरवाजाच्या खिडकीबाहेर कंबरेवरील भाग झुकवून क्षणाक्षणाला मागे हटणाऱ्या स्टेशनकडे नजर फिरवून मी पुनः पुन्हा आपली माणसं दिसतात का ते पाहत होतो. गाडीनं उजवीकडं वळण घेतलं तशी मी स्टेशनावरून नजर काढून समोर लावली. प्रचंड वेगानं धावणारी कलकत्ता मेल मसजीद, भायखळा, दादर वगैरे स्टेशनं मागे टाकीत झपाट्याने पुढे चालली होती. मी आणखी कितीवेळ तसाच उभा राहिलो असतो कोण जाणे पण पश्चिमेकडे कललेल्या सूर्याची किरणं सरळ रेषेत येऊन माझ्या डोळ्यांशी भिडली तसा मी दरवाजापासून दूर झालो. नजरेच्या एका झोतात डब्याचं निरीक्षण करून व आपल्या सहप्रवाशाकडे पाहात स्मित हास्य करून माझ्या सीटवर पडलेले हार तुरे मी बाजूला सारले आणि मागच्या शेवाळी रंगाच्या मऊ कुशनवर बेछूटपणे अंग झोकून दिले.

खिडकीतून येणाऱ्या खारट दर्प असलेल्या वाऱ्याचे झोत अंगावर घेत माझ्या विचार लहरी सुरू झाल्या.

बर्मा फ्रंटवरून डेहराडूनला सहा आठवड्याचा कोर्स करून घवघवीत पंधरा दिवसांच्या 'वॉर लीव्ह'वर मी आलो होतो. ते पंधरा दिवस मी बेछुटपणे मनमुराद लुटले होते. मस्तपैकी झोप काढावी, मन मानेल तसं भटकावं, आपल्या माणसात हसत खेळत गप्पा माराव्यांत, नाटकं, सिनेमे, क्रिकेट मॅचेस पहाव्यांत, लहर येईल तेव्हा बरोबरच्या मंडळीसमवेत वेगवेगळ्या रेस्टांरंटसमध्ये जावे, खावे, प्यावे अशा या स्वच्छंदी वातावरणातील क्षण न् क्षण मी लुटला होता.

सकाळी मी जेव्हा उठे तेव्हा दादा स्नान आटपून ऑफिसची वेळ होत आल्यामुळे जेवायला बसायच्या गडबडीत असत. वहिनी छोट्या मीनाला 'बघ, काका उठले का? म्हणजे चहा टाकते'—असं म्हणत, ते माझ्या कानांवर येई. माझी लहान भाची शोभा जवळ येऊन जोरजोराने हलवून मला म्हणे—

'बाळमामा, उठला नाहीत तुम्ही अजून? आळशी रे आळशी. अशीच झोपून लढाई करता का?'

आता मात्र नाईलाज होई व उठून झटकन तोंड धुवून दादा जेवायला बसलेले असत तेथे टेबलाजवळ चहाचा कप घेऊन जाई. आबा व मा तेथेच बसलेले असत. त्यांच्याशी गप्पा मारत चहा घेई आणि माझा दिवस सुरू होई.

आज मात्र खरोखरच प्रातःकाली साडेपाच वाजता मी उठलो. माझ्या सुट्टीचा

आज शेवटचा दिवस होता. सामान, सुमान आवरून, सर्वांचा निरोप घेऊन, दुपारी व्ही. टी. वर जाऊन मला साडेचारची कलकत्ता मेल पकडायची होती.

आबा, मासह मुंबईतली झाडून सारी नातेवाईक मंडळी आणि मित्र मंडळी स्टेशनवर आस्मादिकांना अलविदा करायला आली होती. आमच्या गोतावळ्यानेच आर्धा प्लॅटफॉर्म भरला होता. अलाहाबादला किंवा पाटण्याला निघालेल्या एका भय्याला पोचवायला येणाऱ्या दोनशे पुरभय्यासारखीच माझी अवस्था दिसत होती. अगदी त्या गळ्यांत लटकणाऱ्या हारापर्यंत. आप्पाने (माझे वडील बंधू) त्याच्या कॅमेऱ्याच्या साहाय्याने आणि खंडू रांगणेकरने त्याच्या अखंड बडबडीने त्या तंग वातावरणात आल्हाद निर्माण केला. आप्पाने तर इतके फोटो खेचले की शेवटी माझ्या मनात शंका आली की हा गृहस्थ इतक्या तसबिरी खेचतो आहे, पण त्याच्या कॅमेऱ्यात फिल्मतरी आहे की नाही कोण जाणे, तशी शंका मी प्रदर्शित करताच त्यानं मला ठणकावलं—

'तुला आता कॅमेऱ्यात काही नाही असं वाटतंय, पण फोटो पाहिल्यावर मात्र चाट पडशील.'

'ए बाळ्या, कॉलेजात मारत होतास तशा लढाईच्या थापा नकोरे मारूस परत आल्यावर. आणि येताना माझ्यासाठी जपानी निशाण घेऊन ये.'—खंड्या बोलला.

या त्याच्या बोलण्यावर सर्वजण हसली. आबा पण खूप मोठ्यानं हसले. मासुद्धा रडता रडता हसल्या. खंड्यानं चुटकीसरशी सारं वातावरण आनंददायी केलं. मला खूप बरं वाटलं.

इतक्यात गाडीचा वेग कमी होऊन रुळांच्या बदलणाऱ्या सांध्यावरून खडाडखट्ट असा लयबद्ध आवाज करत माणसांनी फुललेल्या कल्याण स्टेशनवर येऊन ती आस्ते आस्ते उभी राहिली. डब्याबाहेर उडी टाकून रेस्टॉरंट कारच्या वेटरला मी चहा, टोस्टची ऑर्डर दिली अन् पँटच्या खिशात हात अडकवून प्लॅटफॉर्मवर इकडून तिकडे—'भगवान किनारेपे लगा दो मोरी नय्या'—या गाण्याची शीळ घालत हिंडू लागलो. वास्तविक, प्लॅटफॉर्मवर कोणी 'बघणीय' दिसते का पहावे असाच मनात विचार होता. पण किस्मत अशी की हा विचार मनात यायला आणि डोक्यावर केसांचा बुचडा बांधलेल्या एका तेलकट चेहेऱ्याच्या मद्राशाने आपली लुंगी एखाद्या परकऱ्या पोरीसारखी दोन्ही हातांनी वर उचलून, फुटणाऱ्या फटाकड्यासारखा तोंडातून आवाज काढत समोरच्या डब्यातून उडी मारायला एकच गाठ पडली. आपण गुणगुणत असलेलं गाणं या प्रसंगाला किती साजेसं आहे हा विचार मनात येऊन मी स्वतःशीच हसलो आणि चहा आला म्हणून डब्यात शिरलो.

माझ्याच पाठोपाठ शेरवानी आणि लाल भडक गोंडेदार टोपी डोक्यावर चढवलेला एक वयस्कर मुसलमान डब्यात चढला. एक तरुण त्याला निरोप द्यायला आला होता. गाडी सुटतांना दोघांनी एकमेकांना आलिंगन देत म्हटलं—'खुदा—हाफीझ'—

मी वसलो होतो त्या जागेवरून खिडकीतून दिसणाऱ्या रुळांवर एक आंधळा भिकारी सात, आठ वर्षांच्या एका गोड दिसणाऱ्या मुलीसह उभा असलेला दिसला, भिकाऱ्याच्या वाटीत एक आणेली टाकून त्या छोटया मुलीला हात हालवून मी म्हणालो, 'खुदा हाफीज'. माझ्या बोलण्याची गंमत वाटून खुदकन हसून हात हलवीत ती चिमुरडी ठमी गोड अन् मंजुळ आवाजात बोलली, 'खुदा हाफीझ!'

## कलकत्यात

**१० डिसेंबर ४४**



दुपारी साडेबारा वाजता कलकत्ता मेल हावडयाच्या प्रशस्त स्टेशनात येऊन थांबली. एखाद्या जत्रेचं स्वरुप आलेल्या त्या स्टेशनांतून मोठया मुष्किलीनं वाट काढत टॅक्सी पकडण्यासाठी मी बाहेरील भव्य पोर्चमध्यें येऊन उभा राहिलो. मिळालेली पहिलीच टॅक्सी पकडून दरवाजा बंद करता करता मी ड्रायव्हरला सुनावले – 'सियालदा.' तेथे दिमापूरला जाणाऱ्या गाडीचे रिझर्वेशन करुन ग्रँड हॉटेल गाठलं. २२७ नंबरच्या खोलीत सामान टाकलं. बाँश घेतला आणि जेवणापूर्वी कांहीतरी थंड पेय घ्यावं म्हणून लाऊंजमध्ये गेलो. तेथे अंकल अग्यंगार, डीन, लिली, रानीवाला मृणाल, तिचा भावी पति सुशीलकुमार मुकर्जी आणि कानन भेटले. कानन व डीन आज या गाडीने मी येईन असा अंदाज करत होते म्हणून ही सर्व मंडळी ग्रँडमध्ये जमली. माझी व सुशीलची रीतसर ओळख करुन देण्यात आली. सुशील आर्किटेक्ट असून स्वतंत्र धंदा करतो. त्याच्या एकंदर नोकझोकावरून तो अगदी 'वेल प्लेस्ड' दिसला. हसतमुख आणि उमद्या स्वभावाचा भिडू आहे हा. मृणालला शोभण्यासारखा. झकास जोडा जमला हा. आपण खूष आहोत. मी दोघांच मनःपूर्वक अभिनंदन केलं. आजची लंच पार्टी सुशीलची होती. त्यानं मला विचारलं–'व्हॉट इज युवर पॉयझन बॉस?' मी हसत म्हटलं. 'जिन अँड लाईम प्लीज.' त्यावर सगळी खळखळून हसली. अंकल वॉज हॅपी विथ हिज चिल्ड बीअर. लिलीला वॅकआय (डब्ल्यू. ॲ. सी. आय) च्या युनिफॉर्ममध्यें डीनने पाठवलेल्या फोटोतच मी पाहिलं होतं. पण आता प्रत्यक्षांत ती या गणवेषात सुंदर दिसत होती. मी तिला 'लिली यू लूक क्यूट इन धिस युनिफॉर्म. होप यूवर बॉस इज नॉट अेनव्ही ऑफ धिस रास्कल' असं म्हणत डीनच्या पाठीवर थाप मारली.

काननला मी म्हटलं – 'यारें, तुम यहाँ कैसे टपके !'.

त्यावर तो म्हणतो – 'क्या छुट्टीका ठेका सिर्फ तुमनेही लिया है ? हमे नही मिल सकती ? मै भी वॉर लीव्हपर जा रहा हूँ.'

यावर डीन बोलला – 'अरे आनंद, यह मजनू महू जा रहा है अपनी लैलाको मिलने. अब खूब तसवीरे खिचवायेंगे दोनो.

यावर – 'अरे यार तुम्हाराही तो चेला हूँ मै. आय ॲम फॉलोइंग युवर स्टेप्स.' असं कानन बोलला.

अंकल आपला पाईप शिलगावत म्हणाले – 'अच्छा आनंद माय सन, व्हाटस् द न्यूज ऑन युवर फ्रंट ? अॅनी गुड न्यूज ?

मी म्हटलं – 'नो न्यूज इज अ गुड न्यूज अंकल. माय होम फ्रंट इज ॲबसोल्युटली क्वायेट '!

इतक्यात वेटर जेवण तयार असल्याची वर्दी द्यायला आला, तसें आम्ही ड्रिंक्स संपवून डायनिंग रूमकडे गेलो.

जेवण झाल्यावर मी व कानन त्याच्या रूमवर गेलो. तो संध्याकाळची ट्रेन पकडणार होता. रात्री लिलीनं रंगून रेस्टॉरंटमध्ये जेवण दिलं. जेवायला कानन सोडून दुपारचाच क्राऊड होता.

अंकलना बेव्हर्ले मॅन्शनला सोडून रात्री बारा वाजता हॉटेलवर आलो. थंड पाण्यानं तोंड धुवून भिरभिर फिरणाऱ्या पंख्याचा वेग मंद करून दिवा मालवला आणि बिछान्यात अंग फेकुन दिलं.

## ११ डिसेंबर ४४

दूर कुठेतरी सकाळचे सात वाजल्याचे टोले पडलेले मी ऐकले. ऑईलपेंट केलेल्या पांढऱ्याशुभ्र तक्तपोशीकडे आळसावलेल्या नजरेनं पहात मी कितीतरीवेळ बिछान्यात पडून होतो. रजेत घालवलेल्या दिवसांच्या रम्य आठवणी चाळवतां चाळवता अचानक एक आठवण झाली नी मी बेचैन झालो.

घरून निघताना मी 'मां' ना सांगितलं होतं की – 'आता मला लढाईवर मुळीच जावं लागणार नाही. माझी पलटण आघाडीपासून दीडशे मैल मागे असून येत्या चार-सहा महिन्यांत ती खचित हिंदुस्तानात परत येईल.' हे मी साफ खोटं बोलली होतो.

डेहराडूनला कोर्सवर असताना आमच्या पलटणचे सेकंड इन कमांड मेजर किंग-हॉर्न सीनियर विंगमध्ये कोर्स करत होते. त्यांच्याबरोबर एकदा खाना खाताना ते मला म्हणाले होते की, पलटण लवकरच इंफाळहून डेरा हलवून पुढे दक्षिणेकडे सरकणार आहे. परत यायची तर बातच नको. त्याचवेळेला मी ठरवलं की घरच्या

मंडळींना याबाबत काही बोलायचं नाही.

पण आज जेव्हा मी याचा सावचितपणानं विचार करू लागलो तेव्हा माझं मलाच समजेना की आपण जं मांना फसवलं ते योग्य की अयोग्य ? आपण रणांगणावर जाणार. शत्रूशी दोन हात करणार. जीवन मरणाच्या सीमेवर सतत राहणार. ही बाब आपण निकटवर्तियांपासून लपवून ठेवली. पण पुढे केव्हातरी ती उघड होणारच. त्याबरोबर मला दुसऱ्या एका थापेची आठवण झाली. बेचाळीस सालच्या ऑगस्ट महिन्यात लाहोरला ट्रेनिंग घेण्यासाठी निघालो तेव्हा मांची समजूत काढताना म्हणालो होतो–

> ' मा, लढाई काय. आता संपतच आली. माझं ट्रेनिंग पुरं होईपर्यंत ती मपेलसुद्धा. मग कशाला काळजी करता ?'

त्यानंतर लाहोर आणि बंगलोरचा शिक्षणक्रम संपवून जून १९४३ मध्ये नोकरीवर रूजू होण्यापूर्वी दहा दिवसांच्या रजेवर गेलो तेव्हा बोललो होतो–

> ' मा, हे पहा, माझी बटालियन किनई हिंदुस्तानातून बाहेरच जाणार नाही मुळी. तुम्ही अगदी काळजी करू नका. '

आणि आमची बटालियन भारतावाहेर गेली होती. गेली दीड वर्ष ती दुष्मनशी झुंज देत होती आणि आता पंधराच दिवसांपूर्वी आघाडीवरून मी जेव्हा घरी गेलो होतो तेव्हा मला आढळून आलं की आपण सांगतो त्यावर मा काही बोलत नसल्या तरी त्यांचा आता आपल्यावर विश्वास राहिला नाही आणि हे माहीत असूनही आपण पुन्हा एकदा खोटं बोललो.

इतक्यात वेटर छोटी हाजरी (बेड टी आणि बिस्किटे) घेऊन आला, तसा मी उठलो. थंड पाण्यानं स्वच्छ तोंड धुतलं आणि कॉटसमोरील सोफ्यावर बसून चहा घेतला. मला तसंच बसून राहावंसं वाटत होतं. मनाला विलक्षण थकवा आला होता. मी चौफेर खोलीभर नजर टाकली. माझं सामान इतःस्ततः पसरलं होतं. ते सारं माझ्याकडे भकास नजरेनं पहात होतं. मी सहज घड्याळाकडे पाहिलं, आता मात्र मला उठलंच पाहिजे होतं. ऑफीसर्स शॉपमध्ये जाऊन थोडीशी खरेदी करायची होती. सामान बंद करून हॉटेलचं बील भागवून साडे अकरापर्यंत अंकलकडे पोचायचं होतं. त्यांच्याकडेच जेवण करून दीड वाजता दिमापूरला जाणारी मिलिटरी स्पेशल सियालदाला पकडायची होती.

एक वाजता मी व अंकल स्टेशनवर पोचलो. थोड्याच वेळानं डीन आणि लिली आमच्याकडे येताना दिसले. दोघेही युनिफॉर्ममध्ये असल्यामुळे लीली डीनवरोबर स्टेप्स मिळवून मार्च करत होती. जवळ आल्यावर सेकंड लेफ्टनंट लिली रॅबीटनं लेफ्टनंट जाधवला स्मार्टली सॅल्युट केला. मीही स्मित करत रिटर्न केला व म्हणालो–
' लिली आय मस्ट से यूवर मार्चिंग अँड टर्न आऊट इज व्हेरी स्मार्ट. '

त्यावर अंकल डीनकडे पाहून मिष्कीलपणाने म्हणाले–' आनंद शी वॉज इन

स्टेप्स विथ डीन.'

त्यावर ती चटकन हसून म्हणाली–' अंकल, ऑलवेज अँड फॉर अेव्हर.'

इतक्यात गाडी सुटली. अंकलनी माझा हात दाबला नी म्हणाले–' लुक आफ्टर युवरसेल्फ सन.'

मी, डीन आणि लिलीने एकमेकांना सॅल्युट केले.

# मणिपूर

## १३ डिसेंबर ४४



संध्याकाळी साडे पाच वाजता मी इंफालला पोचलो. अॅडजुटंट कॅप्टन स्टीलला मी आल्याचा रिपोर्ट केला आणि बटालियनचा मेडिकल ऑफिसर (डॉक्टर) कॅप्टन प्रेमचंदच्या डेऱ्यांत सामान टाकले. स्नान आटपून अंगावर गरम बॅटलड्रेस चढवून मी ऑफीसर्स मेसच्या बाशांत गेलो. थंडी खूपच होती. कर्नल रॉबर्टशिवाय बाकी सर्व ऑफिसर्स पेटलेल्या शेगडीभोवती कोंडाळे करून शेकत मोठमोठ्याने हसत गप्पा मारत बसले होते. आज मेजर कॉटमनही मेसमध्ये आले होते. मला पाहून त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी ताबडतोब माझ्यासाठी वाईन वेटर हरीला 'ज्याडवसाब के लिये एक बडा लाव'ची ऑर्डर दिली.

मी म्हटलं, 'सर, अॅज पर मेस रूल्स आय मस्ट बाय माय ओन ड्रिंक.'

यावर नेहमीप्रमाणे जाड भिंगाच्या चष्म्याच्यामागे डोळे बारीक करून मिष्किलपणाने ओठाच्या कोपऱ्यात सिगरेट दावत ते म्हणाले––

'ऑफ कोर्स यू आर साईनिंग फॉर इट ओल्ड बॉय. आय ऑर्डर्ड इट बिकॉज यु वेअर डिलेईंग दि इश्यू.'

यावर सर्वजण मोठ्याने हसले. इतक्यात कर्नल आले. त्यांनी मेसमध्ये पाऊल ठेवताच तिथल्या क्रॉफर्ड मार्केटचे एकदम सोनापूर झाले.

कर्नलनी मला कोर्स कसा झाला, सुट्टी कशी घालवली वगैरे औपचारिक प्रश्न विचारले.

जेवण झाल्यावर कर्नल सर्वांना गुड नाईट करून गेले.

स्टीलने मला एका बाजूला घेऊन सांगितले, की इंफालच्या दक्षिणेला सुमारे तीस

मैलांवर पलेल या ठिकाणी मेजर डनलॉपच्या कमांडखाली 'ए' रायफल कंपनी आहे. त्याच कंपनीला बटालियनचे 'थ्री इंच मॉर्टर प्लटून' (उखळी तोफा) जोडलेलं आहे. प्लटून कमांडर कॅप्टन हरिकेशचंद्र गहलोट एक कोर्स करायला गेला असून त्या प्लटूनची कमांड मी करायची आहे. उद्या सकाळीच पलेलला जायला निघायचे असल्यामुळे स्टीलने हा हुकूम मला मेसमध्ये दिला. बटालियन हेडक्वार्टर्सपासून दूर, शिवाय इंडिपेंडंट कमांड मिळणार म्हणून मला बरं वाटलं.

## १४ डिसेंबर ४४

दुपारी तीन वाजता पलेलला पोचलो. 'ए' कंपनी कमांडर मेजर डनलॉपना रिपोर्ट केला आणि मॉर्टर प्लटूनचा चार्ज घेतला. इंफालपेक्षाही पलेलला जास्त थंडी आहे. रात्री अंगाभोवती पाच ब्लँकेटस् घेतली तरी ऊब येईना. पण त्यातूनच मस्त झोप लागली.

## १५ डिसेंबर ४४

सकाळी सहा वाजता उठून डेऱ्याबाहेर आलो आणि पाहिलं तर थोडसं झुंजुमुंजु दिसू लागलं होतं. एका अर्धवर्तुळाकार टेकडीवर मी उभा होतो. आवतीभवती चारी बाजूला उंच डोंगर होते. त्यांच्या पायथ्याजवळून जाणारा नागमोडी रस्ता, दऱ्या, नाले, मणिपुरी लोकांची जागजागी असलेली छोटी छोटी भातांची शेते व झोपड्या ही सारी दाट धुक्यात गुरफटून गेली होती.

मॉर्टर प्लटूनच्या लंगरमध्ये (स्वयंपाकघर) बनवलेल्या गरम चहाने भरलेला मग रणजितने मला आणून दिला. दोन्ही हाताने मग पकडून त्याची ऊब घेत गरम चहाचे घुटके घेत घेत ती सृष्टिशोभा पाहाताना प्रसन्न वाटलं.

आठ वाजता तयार होऊन प्लटूनची पाहाणी करायला गेलो. प्लटूनचे सेकंडइन कमांड जमादार उदेरामनी संत्री आणि पेट्रोलड्युटीवर गेलेले जवान सोडून सर्व जवान एकत्र केले. मी सर्वांची ओळख करून घेतली व प्लटूनची पाहाणी केली. लंगर, ॲम्युनिशन बंकर, स्टोअर बंकर, वगैरे पाहिले. जवानांचे ट्रेनिंग चालूच होते, ते पाहिले.

दुपारी मांना व दादांना पत्रे लिहिली.

## १६ ते ३० डिसेंबर ४४

मेजर डनलॉपच्या संगतीत माझे पलेलचे दिवस मजेत चालले आहेत. उंच

मजबूत बांध्याचा डनलॉप हॉलीवूडचा प्रसिद्ध नट एरॉल फ्लिनसारखा दिसतो. बरोबरच्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांत तो 'ज्यूनियर' या नावाने ओळखला जातो. आमच्या ग्रिनेडियर्स ग्रूपमध्ये हा लोकप्रिय आहे. आराकाने आघाडीवर ट्वेन्टी-फिफ्थ ड्रगून कार्बाइन्स या टँक रेजिमेंटबरोबर आमची 'ए' कंपनी काम करत असताना जवानांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. याचं बरंचस श्रेय ज्युनियर डनलॉप आणि कॅप्टन हरिकेशचंद्र गहलौट यांना आहे. स्वच्छंदी, दिल चाहेल ते करणारा, शूर, बेडर आणि आपल्या जवानांवर मनापासून प्रेम करणारा उमद्या स्वभावाचा आनंदी प्राणी आहे हा. आमच्या जाट जवानांचा तर हा जीव की प्राण आहे. लढाई नसली व वेळ मिळाला तर त्यांच्या कोंडाळचात बसून हुक्का ओढेल, त्यांचा चुरमा, पराठे, लोणचे खाईल, जाटू भाषेत हास्य विनोद करेल व असा जीव लावेल.

'ए' कंपनीतल्या जवानांकडून त्याच्या आराकान आघाडीवरील लढाईच्या एकेक रोमांचक आणि चित्तथरारक कथा ऐकून माझं भान हरपून जातं. त्याच्या सहवासात मी आहे याचा फार आनंद वाटतो मला, पुढील समरप्रसंगांना उपयोगी पडतील असे कैक धडे आणि डावपेच मला त्याच्याकडून शिकायला मिळत आहेत. त्याच्या व्यक्तिमत्त्वाने मी भारावून गेलो आहे. डनलॉप माझ्यावर धाकट्या भावाप्रमाणे प्रेम करतो. त्याच्या मानाने मी सर्वच बाबतीत म्हणजे उंचीतसुद्धा लहान पडतो. तो मला 'बच्चा' या नावाने पुकारतो. त्याचे पुढे 'बच' असे नामांतर होऊन आमचे सर्व ऑफिसर्स मला आता याच नावाने पुकारतात.

## ३१ डिसेंबर ४४

आज १९४४ सालचा शेवटचा दिवस. उद्यापासून नवं वर्ष सुरू होणार. गेली पाच वर्षे मोकाटपणे भडकलेल्या युद्धाच्या या तप्त ज्वाला निदान उगवणाऱ्या वर्षांत तरी विझतील का असा विचार करतच मी उठलो.

पलेलला असलेल्या इंडियन जनरल हॉस्पीटलमधील डॉक्टर्स आणि सिस्टर्सनी आम्हा दोघांना आज रात्री न्यू ईयर्स ईव्ह पार्टीला बोलवलं होतं. तिथे पेगी कँपबेल या स्कॉटीश महिलेची आणि माझी विशेष मैत्री जमली. गेल्यावर्षी ती स्कॉटलंडहून भारतात आली होती. ब्रिटनवर अविरत होणाऱ्या जर्मन विमान हल्ल्यात जखमी होणाऱ्या लोकांची शुश्रुषा करण्याची कामगिरी तिने आत्मीयतेनं पार पाडली होती. या बाँब वर्षावात ४५ लक्ष घरे म्हणजे प्रत्येक ३ घरामागे १ घर उध्वस्त झाले होते. यावरून मनुष्य हानी किती झाली असेल याची कल्पना करा. पेगीचे आई वडील आणि धाकटा भाऊ या बाँब हल्ल्यात बळी पडले होते. तिचा मोठा भाऊ एका ब्रिटिश रेजिमेंटमध्ये सार्जंटच्या हुद्यावर असून इटलीच्या रणांगणांवर जर्मन सेनेशी लढत आहे. तिचा प्रियकर रॉयल एअरफोर्समध्ये स्क्वाड्रन लीडरच्या

हुद्यावर असून मध्य पूवकडील आघाडीवर उत्कृष्ट कामगिरी बजावत आहे. आता पर्यंत त्याने दुष्मनच्या पाच विमानांचे बळी घेतले आहेत.

मध्यपूर्वेतील एका हॉस्पिटलमध्ये काम करत असताना पेगीची व या स्क्वाड्रन लीडर वॉटरलोरींगची ओळख झाली. मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. पेगीनं हा पेशा सोडून देऊन लग्न करावं अशी त्याची इच्छा होती. पण तिनं वॉटर लोरींगला— 'लढाई संपेपर्यंत मी जखमी सैनिकांची सेवा करणार. त्यानंतर स्वतःच्या सुखाचा विचार करणार' असं सांगितलं. वॉटर लोरींग लढाई संपण्याची वाट पाहातोय.

किंचित नकटी आणि निळसर घाऱ्या डोळ्यांची, आकर्षक चेहऱ्याची आणि सुडौल बांध्याची ती तेजस्विनी पुढे म्हणाली—.

'यू नो बच, आय व्हॉलंटीयर्ड टु कम टु धिस फरगॉटन बर्मा फ्रंट अँड सर्व्ह, व्हेअर हंड्रेडस अँड थाऊजंडस ऑफ सोल्जर्स लाईक यू आर फायटींग इन सायलेंस.'

तिच्या या वक्तव्यान मी चकीत झालो. भारावून गेलो. किती उदात्त विचार. केवढा स्वार्थत्याग.

या लढाईनं सारं जग हादरून सोडलं. या टोकाचा माणूस त्या टोकाला फेकला गेला. ग्रेट ब्रिटनच्या स्कॉटलंडची महिला, भारतातील कोल्हापूरच्या सैनिकाला बर्मा फ्रंटवर पलेलला भेटते. मोठी गंमत आहे.

या युद्धामुळे माझा जाट, गुरखा, रजपूत, शीख, डोग्रा, मुसलमान, गुजर, मद्रासी, ब्रिटिश, आफ्रिकन, अमेरिकन वगैरे अनेक जमातीतील सैनिकांशी संबंध येत आहे. त्यांची सुखदुःखं, आचार विचार, आवडीनिवडी, या साऱ्या जवळून निरखून पहायला मिळतात. किती अमोल शिक्षण आहे हे.

रात्रो बारा वाजून एक मिनिटानं सर्वांना 'हॅपी न्यू इयर' विश करून मेजर डनलॉप आणि मी कँपवर यायला निघालो, डनलॉपचं जीप ड्रायव्हिंग और आहे. बेदरकार, बेफाम गती. वळणावर दोन किंवा तीन चाकावर सर्रकन स्टिअरिंग फिरवायची सवय. रस्त्यात खाचखळगे असले तरी सुद्धा हा गाडीचा वेग कमी करायचा नाही की ब्रेक दाबायचा नाही. याची सारी दोस्ती अॅक्सीलरेटरशी, असं काहीतरी अजब तंत्र आहे त्याच्या ड्रायव्हिंगचं. बेफाम, बेदरकार, वाऱ्यासारखं जीवन जगण्याचं प्रतीकच जणू.

## १ जानेवारी ४५

नवं वर्ष उगवलं आणि आम्ही हॉस्पिटलची टेकडो उतरून यायला निघालो. वळणं घेत जाणाऱ्या रस्त्यावरून डनलॉपने जीप भरधाव सोडली. इतक्यांत एका,

घोडयाच्या नालाच्या आकारासारख्या दिसणाऱ्या वळणावर झटक्यात स्टिअरिंग फिरवताना रस्त्याच्या डाव्या बाजूला ती इतकी कलंडली की दोन कोलांटया खाऊन बाजूला पडली. जीप उघडी असल्यामुळे डनलॉप व मी वर हवेत फेकले गेलो. क्षणभर काय झालं ते कळलंच नाही. पण दुसऱ्याच क्षणी आपण, गुडघ्यापर्यंत असलेल्या थंडगार चिखलात रुतल्याची जाणीव दोघांनाही झाली. कोणालाही दुखापत झाली नाही. थोडया कष्टानं उठून आम्ही जीपजवळ गेलो. स्वत:चं आणि माझं ध्यान पाहून डनलॉप हसत होता, ती पठ्ठी जीपही आपल्या चारी चाकावर उभी होती. तिच्या बॉनेटला थोपटून डनलॉप म्हणतो–' शी इज ए गुड गर्ल वच.'

कँपवर परतल्यावर रात्री दीड वाजता स्नान करताना माझ्या मनात विचार आला की नवं वर्ष उगवता उगवता स्नान करण्याचं आपल्यासारखं भाग्य कोणाला लाभलं असेल का ? (क्रमश:)


**निसर्गाच्या रम्य पार्श्वभूमींत चितारलेली आल्हाददायक प्रणयकथा ...**




निर्माता दिग्दर्शन
**देवेन वर्मा**
संगीत
**शंकर जयकिशन**
गीते
**हसरत**

**भू. – आशा पारेख, नवीन निश्चल, मदनपुरी, देवेनवर्मा, बेला बोस, जयराज, कीरण रीवान, असीत सेन, सुंदर व निरुपा रॉय**

**मराठा मंदिर,** २॥, ५॥, ९, **रेक्स,** १।१,२॥,५॥,९ **लोटस** १।॥,२॥,६,९। **पॅलेस** १।॥,२॥,६,९।

**चित्रा** २॥, ६ ,९। **सिटीलाईट** १।॥, २॥, ६, ९। **रुपम** २॥, ५॥, ९

**डिफेन्स** (कुलाबा), **नंदी** (बांन्द्रे), **मिलन** (सांताक्रूझ), **हंजर** (जोगेश्वरी), **टोपीवाला** (गोरेगांव), **अंबर-संगम** (अंधेरी), **संगीता-न्यूइरा** (मालाड) **जया** (बोरीवली), **सहकार** ( चेंबूर ), **श्रेयस** ( घाटकोपर ), **कल्पना** ( कुर्ला ), **कृष्ण** (भांडूप), **वंदना** (ठाणे), **आल्बीन** (कल्याण), **सपना-प्रभात** (उल्हासनगर)

प्रत्येक शनिवारी दुपारी १॥ वाजता विविध भारतीवर, प्रत्येक रविवारी सकाळी ८॥ वा. बुधवारी रात्रो ९ वा. रेडीओ सीलोनवर ऐका.

( प्रकाश पिक्चर्स प्रकाशन )

दुभंगलेल्या प्रणयाचे विदारक दर्शन :

# सनफ्लॉवर

दुसऱ्या महायुद्धामुळे जिचे प्रणयजीवन उध्वस्त झाले, अशा एका इटालियन स्त्रीची हृद्य प्रणयकथा सांगणारा 'सनफ्लॉवर' हा चित्रपट.

नामवंत इटालियन, दिग्दर्शक व्हिट्टोरिया डि सिका यांनी दिग्दर्शिलेल्या या चित्रपटाची नायिका आहे सोफिया लॉरेन. सोफिया व मार्सेलो मॉस्ट्रियानी हे एकमेकांवर उत्कट प्रेम करणारे एक दांपत्य. पण विवाहानंतर आठच दिवसांनी लष्करी आदेशानुसार मार्सेलोला रशियन सरहद्दीवर युद्धासाठी जावे लागते आणि बर्फाळ रशियात तो कोठेतरी गायब होतो.

अल्पकालच टिकलेल्या प्रेमाच्या सोनेरी क्षणांची स्मृती उरापाड जपत, मार्सेलोच्या वस्तंना कुरवाळीत, शिवणकाम करून उपजीविका करीत सोफिया दिवस ढकलीत राहाते– एकाच श्रद्धेने की, तिचा मार्सेलो तिच्याकडे परत येईल. त्याचा ठावठिकाणा शोधण्याकरिता लष्करी कार्यालयात खेटे घालीत राहाते, खचलेल्या वृद्ध सासूला धीर देत राहाते, युद्धावरून परतणाऱ्या सैनिकांना आशेने मार्सेलोबद्दल विचारीत राहाते.

काहीच तलास लागत नाही हे पाहून शेवटी सोफिया एका बॅगेनिशी रशियात जाते. तिथल्या गर्दीच्या ठिकाणी हिंडते, लांबच लांब पसरलेल्या सैनिकांच्या कबरभूमींमध्ये मार्सेलोचे नाव दिसते का, हे बघण्याचा निष्फळ प्रयत्न करते, खेड्यापाड्यांतील साध्याभोळ्या शेतकरणींना 'असा दिसणारा कोणी सैनिक कधी पाहिलात का' असे मार्सेलोचा फोटो दाखवीत आशेने विचारीत फिरते आणि अखेर त्यातील एकजण तिला तिच्या मार्सेलोचे घर दाखविते.

### प्रेमाची प्रतारणा

–पण मार्सेलो आता तिचा राहिलेला नसतो. बर्फाळ सरहद्दीवर मृतवत पडला असता त्याचा प्राण वाचविणाऱ्या लुडमिला सावेल्वा या लोभस शेतकरणीशी लग्न करून त्याने नवा संसार थाटला असतो. त्यांना एक गोंडस छोकरीही असते. रेल्वे-

तील कामावरून परतणाऱ्या आपल्या एकेकाळच्या पतीला व प्रियकराला समोर पाहाताच, प्रेमाच्या विश्वासघाताच्या भावनेने मनोमन खचलेली सोफिया त्याच्याशी अक्षरही न बोलता धावतच चालत्या गाडीत चढते आणि जणू काही कोणी मेले आहे, असा हुंबरडा फोडते.

इटालीला परतलेली सोफिया ही संपूर्णपणे नवी व्यक्ती असते. आपल्या एकनिष्ठ प्रेमाची प्रतारणा करणाऱ्या मार्सेलोच्या फोटोची, वस्तूंची दुःख–संतापाने कोळपून ती मोडतोड करते, सासूचा अपमान करून तिला परतून लावते आणि रशियात पाहिलेली मैलोन् मैल लांब पसरलेली उत्फुल्ल सूर्यफुलांची शेते आठवून, नवीन आनंदी जीवन जगण्याचा निर्णय घेते. ती नव्याने कामाला लागलेल्या कंपनीतील एका सुखवस्तू सहकाऱ्याशी विवाह करते व संसार थाटते.

## अनावश्यक लांबण

'सनफ्लॉवर' या चित्रपटाची खरी कथा इतकीच आहे व इतकीच ठेवली असती तर, हा चित्रपट डि सिका यांच्या 'बायसिकल थीफ्', 'टू वुईमेन' या नामवंत चित्रपटांइतका दर्जेदार झाला असता! पण हा चित्रपट पुढे उगाचच लांबवण्यात आला आहे. रशियात मार्सेलोला अपराधी वाटू लागते व सारा संसार गुंडाळून घेऊन तो इटालीला परत येतो. सोफियाचा शोध करतो व तिला भेटायला येतो. सुरुवातीला ती त्याची कानउघाडणी करते व आपल्याबरोबर चलण्याची त्याची विनंती धुडकावून लावते पण पहिल्या प्रेमाची सरशी होऊन काही क्षण ते एक-मेकांच्या बाहुपाशात हरवलेले प्रेम शोधू पाहातात.

परंतु तेवढ्यात दुसऱ्या विवाहापासून सोफियाला झालेले मूल झोपेतून रडत उठते आणि तिला वस्तुस्थितीचे भान येते. आपलेच नाव सोफियाने त्या मुलाला ठेवले आहे, हे उमजताच, आपल्या हरपलेल्या प्रेमाबद्दल हळहळत मार्सेलो आपल्या दुसऱ्या पत्नीकडे परततो व हा चित्रपट संपतो! या लांबणीमुळे त्या प्रेमाचे दुभंगलेपणच चित्रपटाअखेर प्रेक्षकांच्या मनावर ठसते व त्यामुळे 'सनफ्लॉवर' हे नाव निरर्थक वाटू लागते.

## उत्कट अभिनय

बेपत्ता पतीच्या शोधार्थ तडफडणारी निष्ठावान पत्नी व तो सापडला असता त्याने केलेल्या विश्वासघाताच्या जाणिवेने बदललेली पत्नी अशी सोफियाला या चित्रपटात मिळालेली भूमिका तिच्या पूर्वीच्या 'ज्यूडिथ' या चित्रपटातील भूमिके-सारखीच आहे. पण या चित्रपटातही तिने केलेला अभिनय झपाटून टाकणारा आहे, मार्सेलो आपला राहिलेला नाही या जाणिवेने त्याच्यासमोरून पळणे व घरी येऊन दुःख–संतापाने आकांत करणे, रशियात मार्सेलोसारख्या दिसणाऱ्या एका इटालियनला तिने हटकणे हे तिच्या अभिनयाचे काही सर्वोच्च बिंदू या चित्रपटात आपल्याला पाहायला मिळतात! देखण्या मार्सेलो मॉस्ट्रियानीनेही ठीक अभियन

केला आहे, लुडमिला सावेल्वा या 'वॉर अँड पीस्स 'फेम रशियन अभिनेत्रीला या चित्रपटात अभिनयाला विशेषशी संधी नाही. पण तरीही कुचंबलेली पत्नी तिने चांगली दाखविली आहे.

### कलात्म दिग्दर्शन

वास्तविक डि सिका हे एक कसलेले दिग्दर्शक आहेत, पण या चित्रपटाच्या कथानकाची त्यांनी लांबविलेली लांबण हानिकारक होतेच. शिवाय काही ठिकाणी ते अगदी सांकेतिक शिळ्या कल्पनांचाही उपयोग करताना आढळतात. मार्सेलो युद्धावर निघतो तेव्हा प्लॅटफॉर्मवर त्याला निरोप देण्यासाठी आलेल्या सोफियाचे अखेरचे चुंबन घेतो. त्यावेळी त्यांचे प्रतिबिंब पडलेल्या समोरच्या आरशाला तडा गेलेला असणे; लुडमिलच्या घरात सोफिया जाते तेव्हा समोच्या घड्याळात नेमके सकाळचे साडेसहाच वाजलेले असणे व त्यामुळे सोफियाला त्यांची एक प्रणयी सकाळ आठवून रडे कोसळणे हे अगदी सकेतबद्ध वाटते.

पण या चित्रपटात खूपसे उत्कट क्षण असेही विखुरलेले आहेत की, ज्यांमध्ये डि सिकांच्या कलात्मक दिग्दर्शनाचा खास 'टच्' दिसतो! मार्सेलो–सोफिया यांच्यातील सुरुवातीची उत्कट शृंगारदृश्ये त्यांनी अशी काही समर्थपणे घेतली आहेत की, त्यांच्या पार्श्वभूमीवर सोफियाची एकाकी तडफड अधिकच काळजाला भिडावी! त्यातल्या एका दृश्यात तर मार्सेलो सोफियाची आवेगाने चुंबने घेताना तिचे एक कर्णफूलच गिळतो! मार्सेलो मधुचंद्राच्या वेळी चोवीस अंड्यांचे आम्लेट बनवितो व लष्करात दाखल होण्याचे टाळण्यासाठी वेडा असल्याचा बहाणा करतो, हा खास इटालियन चावटपणा आहे. युद्धभूमीवरून परतणाऱ्या सैनिकांना न परतलेल्यांच्या नातेवाईकांनी दीनवाण्या आशेने आपल्या घरच्या सैनिकांचे फोटो दाखविणे व 'याला कोठे पाहिलात का' विचारणे, हे दृश्य तर हृदय हेलावणारे आहे.

या कलात्मक दिग्दर्शनामुळे आणि सोफिया–मार्सेलो यांची शृंगारदृश्ये, रशियातील खेड्यांचे प्रत्यक्ष चित्रण व संबंध चित्रपटातील करुण–वास्तवतेचा गाभा इत्यादी या चित्रपटाच्या वैशिष्ट्यांमुळे, ही हळुवार प्रेमकथा निश्चितच प्रेक्षणीय झाली आहे. निदान सूर्यफुलांच्या शेतांची सोनेरी रंगाची मुक्त उधळण डोळ्यांत साठवून घेण्यासाठी तरी हा चित्रपट जरूर पाहावा.



सुरुवात केली. मी ऐकू लागलो.

'तुम्हाला सर्पदर्शन वारंवार होतं ?' ज्योतिषाचा पहिला प्रश्न.

'हो. वारंवार होतं. शंकर ही माझी आराध्यदेवता आहे. त्याचं सर्पप्रेम सर्वश्रुत आहे. साहजिकच, शंकराचा प्रसाद म्हणून मला सर्प वारंवार दिसतात. जरा कुठे ग्रामीण भागात गेले की सर्पदर्शन होतंच. त्यांची मला भीती वाटत नाही.'

'शंकराच्या एखाद्या स्थानात तुमचा जीव रमतो का ?'

'हो. क्षेत्र महाबळेश्वराला आमचा बंगला आहे. त्याच्याजवळ एक शंकराचं पडकं देऊळ आहे. दीडहजार वर्षांचं जुनं आहे म्हणतात. गुप्त राजांच्या काळातलं. तिथे कुणीच जात-येत नाही. एकदा माझ्या मनात आलं, की त्या देवळातला आपण कचरा काढावा. बाबांनी परवानगी दिली. मी झाडू घेतला नि देऊळ साफसूफ केलं. तेव्हापासून त्या पुण्य वास्तूचं नि माझं नातं जुळलं आहे. ते देऊळ आता माझ्या चिंतनाचाच भाग झाला आहे.'

'मी तुम्हाला सांगतो, वाटल्यास माझे शब्द लिहून ठेवा, तुम्ही ह्या आजारातून खडखडीत बऱ्या होणार.'

'ते विसरा.'

'माझं ऐका. ह्या आजारातून तुम्ही खडखडीत बऱ्या होणार. इतक्या, की तुम्ही बऱ्या होऊन आम्हाला हातचे बटाटेपोहेसुद्धा खायला द्याल. ह्या आजारात तुम्हाला मृत्यू नाही. मात्र पुढेमागे तुम्हाला चुटकीसरसा मृत्यू येईल. घड्याळ अचानक बंद पडतं, तस तुमचं हृदय आसभास नसताना खटकन् बंद पडेल. माझे शब्द वाटल्यास लिहून ठेवा.'

आम्ही तिघेही पोटभर हसलो. आपण अदृष्य नियतीची पावलं ओळखली म्हणून ज्योतिषी खुषीने हसला. आपला अस्त ज्योतिषालासुद्धा आकळला नाही म्हणून हंसाबाई उपरोधाने हंसल्या. जन्ममरणाविषयी हे लोक इतक्या सहजपणे बोलतात, ह्याचं मला हसू आलं.

'आता थोडं अप्रिय विचारू का ?' ज्योतिषी.

'विचारा की, आता प्रिय-अप्रियाच्या मी पार पलीकडे गेले आहे. तुमच्या ह्या जगाशी माझा काहीच संबंध नाही.'

'तुमचे ग्रह सांगतात की प्रसंगविशेषी तुम्ही असत्य बोलाल. सत्यासत्याचा फारसा घोळ तुम्ही घालणार नाही.'

'साफ खोटं. मी खर तेच लिहिलं. काही खऱ्या गोष्टी लिहायच्या मी टाळल्या. मात्र लिहिल्या त्या खऱ्या आहेत.'

'कथानकाला चव यावी म्हणून जादा मीठमसाला लावलात? सत्य अधिक भडक करून सांगितलत?'

'नाही. उलट फारच संयम राखला. माझं खरं आयुष्य काहीच्या काही भयानक आहे. 'पण घाण उपसत कशासाठी बसायचं? मला त्यात आनंद नाही.'

'तुम्हाला तुमच्या जुन्या संसाराची काळजी वाटते?'

'अजिबात नाही. माझ्या पूर्वायुष्यावर मी पडदा टाकला आहे. बाबा, बाबांच्या तीन मुली, आणि मी स्वतः, असा हा माझा पांच जणांचा संसार आहे. तशी मी समाधानात आहे. पण प्रकृतीने मला संकटात आणलं आहे.'

'असो. तुम्ही ह्या साऱ्या संकटातून खडखडीत बऱ्या व्हाल. पैशाची ओढगस्त मिटण्याची चिन्हं नाहीत. तरीसुद्धा वेळ भागेल. तुमचं इथून पुढे सगळंच चांगलं होईल.'

मी 'तथास्तु' म्हटलं

नको म्हणायला? ज्या बाईने तनमनधन अर्पून मनाच्या त्यागपूर्वक एकतानतेने पंधरा सोळा वर्षं, एरव्ही वाऱ्यावर चिटोऱ्यांसारखा वाहून गेला असता असा बिन-खांबी संसार पदर बांधून एका रेषेत बाळबोध संस्कृतीच्या अंगाने चालवला, तिचं शुभ चिंतायला नको? अवश्यमेव चिंतिलं पाहिजे. बाई पट्टीच्या मद्यपी होत्या. हे त्यांनी स्वतःच निःसंकोचपणे लिहिलं आहे. त्यांच्यावर कृत्रिम गर्भपातांची मालिकाच लादण्यात आली, हेही त्यांच्याच हातचे कथन आहे. पुढे कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्ये रश्मीच्या भुमिकेत त्या टपल मारून रंगमंचावर आल्या आणि प्रमुख नटाची भूमिका करणारे आणि नाट्यसंस्थेचे भागीदार राजन् जावळे ह्यांना बाईंनी पिऊन रंगमचावर येणं अजिबात आवडलं नाही. बाईंचे काही चिक्कार प्यायलेले अंमलदार मित्रही रंगपटात जेठा मारून बसलेले होते. जावळेंची आणि त्यांची तिथे हाणामारी झाली. नंतरच्या बोलाचालीतून बाईंनी खेळ सपल्यावर सपाटून व्हिस्की पिण्याची स्पर्धा आरंभिली. त्या स्पर्धेत त्या जावळेंसमोर पार हरल्या. त्यांना आपल्या फोल गर्वाची आणि नाहक व्यसनाची खंत वाटली. उपरती झाली. त्या दिवसापासून त्यांनी दारू सोडली ती शेवटपर्यंत. दारू सोडल्याच्या निर्णयापासून जावळेंचं आणि बाईंचं सहजीवन मरीनलाईन्सच्या एका हॉटेलात राज-रोसपणे सुरू झालं. राजनच्या तिन्ही मुलींचं त्यांनी आईच्या मायेने पालनपोषण केलं, राजनच्या आईला जीव लावला. त्यांच्या आयुष्याच्या महाभारताचं नवं कोरं पर्व त्या सोज्वळ मजकूराने भरून काढू लागल्या. नाटकांचे दौरे आणि अधून मधून मिळणारी चित्रपटातली कामं, हे त्यांच्या उपजीविकेचं एकमेव साधन झालं.

अशी उणीपुरी बारा वर्षं संसारिक आनंदाच्या सुखकर वाऱ्यात गेली.

मग वारा पडला.

सदुसष्ट साली बाई पंचेचाळिशीच्या उंबरठ्यावर असताना मासिकपाळीच्या त्रासाच्या विकाराने आजारी पडल्या. गर्भाशयावर शस्त्रक्रिया झाली. त्यावेळी

तिथे कॅन्सरच्या ग्रंथी प्रथम दिसल्या. मग दुसरं ऑपरेशन झालं, तिसरं झालं, चौथं झालं, पांचवं झालं. घोर शस्त्रक्रियांची ती एक प्रदीर्घ मालिकाच झाली. उठता बसता पाण्यासारखा पैसा लागू लागला. बाईंचे इतके चहाते होते. बाईंच्या कलागुणांवर ते गबरही झाले होते. मात्र पैशाची गरज पडली, तेव्हा बाईंच्या सभोवार शुकशुकाट झाला. पूर्वीची पुंजी संपुष्टात आलेली. बाईंना घोर लागला. पैशासाठी रापाराप झाली. वेळ जेमतेम निभावून निघाली. ह्याच सुमारास मी त्यांना जवळून पाहू लागलो. त्या संसारात होत्या. संसारी होत्या. पण तोंडाने मात्र सतत म्हणत, 'मी चिठीची वाट पाहात्येय.' ते तेवढंसं खरं नव्हतं. कारण पुढच्याच क्षणी म्हणत, 'केव्हा चलणार महाबळेश्वरला ? तिथून पाय काढावासा वाटणार नाही तुम्हाला.' खरी गोष्ट अशी होती की त्यांच्याच चित्ताचा एक पाय क्षेत्र महाबळेश्वरातल्या त्या गुप्तकालीन शिवमंदिरात अडकलेला होता. बाबानेही संसार सावरण्याची शर्थ केली. स्वतः आजारी असतानाच तो बाईंचाही आजार निभावून नेत होता. आपली दानात शाबूत आहे हे त्याने कृतीने दाखवून दिलं. त्याने बाईंना लाखमोलाची साथ पडत्या काळात दिली. जरा बरं वाटलं की बाबाच्या मोटारी-तल्या मागल्या सीटवर आडवं पडून त्या महाबळेश्वरी जात. अस्वस्थ वाटलं की औषधोपचारासाठी तशाच मुंबईला माघारी येत. बाबा कामधंद्याला जाई. संसाराचा सर्व भार त्याने आपखुषीने खांद्यावर घेतला होता. सर्व दिवस तो त्यातच असे. मुली शाळेत जात. दुपारचा वेळ मोकळा असे. बाई त्या वेळात डायरी लिहीत. त्यात फक्त मनात उमटलेल्या भक्तिमार्गी विचारांचं टिपण करून ठेवत. शंकराचा जटाधारी मुखवटा काढीत. कधी 'ॐ नमःशिवाय' हा मांगिरीशी मंत्र घोटवीत. ती सगळी डायरी मी वाचून काढली. बाईंनी रचलेल्या शंकराच्या आणि शनिदेवाच्या आरत्याही त्यात होत्या. कविताही होत्या. आपल्याच हाताने आपण आपल्या शरीराची चाळण करून घेतली याची वाटणारी खंत त्यात जागोजाग नोंदलेली आहे. 'संपत्ति ही आयुष्याच्या प्रवासात अंगावर जमणारी धूळ आहे' अशी वरकरणी चांगली वाटणारी पण आतून पोकळ असलेली, अनुभवाच्या ऐरणीवर न टिकणारी, वाक्यं त्यात शेकड्यांनी आहेत. मोक्ष म्हणजे काय त्याचे विवरण सुलभ शब्दात आहे. लिखाणाचा एकूण सूर कमालीचा निराशेचा आहे. पानोपानी वाटतं, बाई मृत्यूला कवटाळण्यासाठी अधिर झाल्या आहेत. मला मरण दे, अशी शंकराला त्या सतत, प्रत्येक पानावर, प्रत्येक परिच्छेदात, प्रत्येक ओळीत गळ घालीत आहेत. मनाच्या उमेदीचा फुलोरा साफ झडलेला आहे. लेखनातच नव्हे तर खाजगी बोलण्यातही त्यांचा शेवटी शेवटी तोच सूर असे. एकदा बॅ. नाथ पै भेटीला आले होते. त्यांनीही बाबांकडे तक्रार केली की, 'अरे, ही बाई किती कमालीची उदासीन झाली आहे!' परंतु परमार्थाकडे झुकलेल्या हंसाबाईंना कशातही रस म्हणून कसा तो उरला नव्हता. जणू काही त्या उतरंडीलाच लागल्या होत्या.

इतकं असूनही बाईंचा कॅन्सर बरा झाला! त्या हिंडत्या फिरत्या झाल्या.

नाटकांना जाऊ लागल्या. त्यांनी स्वयंपाकपाणी केलं. आमच्या ज्योतिषी मित्राची बत्तीशी खरी झाली. बाई ऐन पावसात पुण्याहून महाबळेश्वरला एस. टी. ने. गेल्या. ह्याचा सरळ अर्थ त्या खडखडीत बऱ्या झाल्या असाच सर्वांनी केला. आम्ही खुष झालो. बाईंना लेखन प्राविण्याबद्दलचं पारितोषिक मिळालं. सर्वांनाच कृतार्थ वाटलं. सुखदु:खाच्या ऊनपावसातला त्यांचा बाळबोध संसार सुखेनैव सुरू झाला.

ह्या सुखसोहळा चालू असतानाच बाईंच्या दुखण्याने पुन्हा एकदा अचानक उसळी मारली. पोटात शूळ उठू लागला. हॉस्पिटलात सहाव्वी कापाकाप झाली. त्यात कॅन्सरच्या ग्रंथींचा पूर्ण निचरा होऊन गल्याचं आढळलं. मग हे नवं दुखणं कोणतं? शरीरशास्त्रीय चिकित्सा चालू झाली. त्यासाठी बाई हॉस्पिटलात दीड महिना पडून होत्या. ह्या दीड महिन्यात त्यांनी आपल्या ममताळू वागणुकीने सर्वांना दिलासा दिला. डॉ. देवराजनना त्यांनी नारळीपौर्णिमेला बहिणीच्या उमाळयाने राखी बांधली. डॉक्टरसाहेब विरघळून गेले. आजूबाजूच्या रोग्यांमध्ये त्या फिरत. त्यांना धीर देत. कुणाला कुंकू लावीत. कुणाला अंगारा लावीत. कुणाला मोसंबी-संत्री देत. बंदरकर भेटायला आले. त्यांना नमस्कार करून बाईंनी त्यांचा शेवटचा निरोप घेतला. आई, भाऊ, मुलगी सर्वजण समाचाराला येऊन गेले. त्यांच्याशी त्या गोड बोलल्या. त्यांना अन्नपाण्याविना बावीस दिवस ठेवलं होतं. भुकेलेल्या अवस्थेत त्यांचा जीव कळवळला. मुलीला म्हणाल्या, 'मला वरण-भात लिंबू आणि वाटाण्याची उसळ दे ग. किती दिवसात मी जेवलेले नाही.' पण ते कसं शक्य होतं? डॉक्टरांनी नाकाला प्राणवायूसाठी नळया जोडल्या होत्या. त्याही त्यांनी खेचून काढून टाकल्या. म्हणाल्या, 'मला निरोप आला आहे. आता मला कशाला जगवता?' पण बाबांनी पटवून दिल्यावर त्याच नळया त्यांनी स्वत:च्या हातांनी पुन्हा नाकाला लावून घेतल्या. बाबा दूर बाहेर उभे राहिले. तेव्हा त्यांना जवळ बोलावून बाई म्हणाल्या, 'बाबा, बाहेर का उभा राहिलास? आत ये. मी आता देवाकडे निघाले आहे.' डॉक्टरांनी विचारलं, 'तुम्हाला काही सांगायचं आहे काय?' बाईंनी नकारार्थी मान हलवली. त्या तृप्त होत्या. मन शांत होतं. चित्त समाधानी होतं. त्यांनी ज्याचा ध्यास घेतला होता, त्या देवाकडे त्या निघाल्या होत्या. वेदना फारच असह्य झाल्या तेव्हा डॉक्टरांनी मॉर्फीयाचा डोस दिला. गुंगीच्या त्या प्रदीर्घ अवस्थेतच त्यांना महानिद्रेचं अनुपमेय सुख लाभलं. आयुष्याच्या जंजाळातून मुक्त होण्याच्या अगोदर काही वेळ त्यांनी आपले पति राजन (बाबा) जावळे यांना आपली अखेरची इच्छा बोलून दाखवताना सांगितलं होतं, 'मी पूर्ण समाधानात आहे. माझ्या मरणानंतर माझ्या अस्थी क्षेत्र महाबळेश्वरातल्या कृष्णामाईच्या कुंडात टाका.' बाईंच्या नश्वर देहाला भडाग्नी देण्याचं ज्याच्या ललाटी नियतीने लिहून ठेवलेलं होतं, त्या बाबांचं आश्वासन मिळाल्यावर वादळ शांत झालं.

□ ■ □

# सॉफ्टबॉल

क्रिकेटशी जवळचे नाते सांगणारा हा खेळ अल्पावधीतच महाराष्ट्रात फार झपाट्याने लोकप्रिय होईल असे दिसते. २१ ऑगस्ट रोजी नेहरू स्टेडियमवर झालेल्या अंतीम सामन्याने पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले.

**माणिक मंत्री**

'पूना अॅमॅच्युअर्स' क्लबच्या वतीने खुले सॉफ्टबॉलचे सामने दि. १४ ऑगस्टपासून फर्ग्युसन कॉलेजच्या क्रीडांगणावर घेण्यात आले. या सामन्यांचे उद्‌घाटन फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. देवदत्त दाभोळकर यांच्या हस्ते झाले. पुरुषांचा अंतिम सामना मात्र 'नेहरू स्टेडियम' वर घेण्यात आला. अशा प्रकारचा सामना पुण्यात प्रथमच भरविण्यात आला असून पुण्यातील क्रीडाप्रेमी लोकांनी त्याला मोठ्या हौसेने साथ दिली. त्या दिवशीचा बक्षिस समारंभ पुणे शहराचे उपमहापौर श्री. जेधे यांच्या हस्ते झाला.

हे सर्व सामने बाद पद्धतीने घेण्यात आले. एकंदर पुरुषांसाठी १० व महिलांसाठी ८ संघांनी भाग घेतला होता. परंतु ह्या स्पर्धेमध्ये उल्लेख करण्याजोग्या अशा दोनच स्पर्धा झाल्या. त्या म्हणजे पुरुषांचा व महिलांचा अंतिम सामना. पुरुषांचा अंतिम सामना 'पूना अॅमॅच्युअर्स' व 'परशुरामीयन्स' यांच्यामध्ये झाला. परशुरामीयन्स क्लबमधील खेळाडूंनी प्रयत्नांची शिकस्त करूनसुद्धा अजिक्यपद 'पूना अॅमॅच्युअर्स क्लब' ने पटकावले व 'कै. यशवंतराव गिरमे' चषकाचे मानकरी झाले. महिला विभागासाठी 'श्री. चंद्रकांत कुदळे' ढाल ठेवण्यात आली होती. या विभागात 'पूना अॅमॅच्युअर्स' व 'पूना सॉफ्टबॉल क्लब' या दोनच संघात खरी चुरस होती. बाकीचे सर्व संघ फारच कमी दर्जाचे होते. 'पूना सॉफ्टबॉल' क्लब हा गेली ३ वर्षे अजिक्य असा संघ होता. शिवाय या संघात ७ राष्ट्रीय खेळाडूंचा समावेश असल्यामुळे हा क्लब नक्कीच अजिक्यपद पटकावणार अशी सर्वांची खात्री होती. याउलट पूना अॅमॅच्युअर्स क्लबमध्ये बऱ्याच शाळेतील खेळाडूंचा समावेश होता. तरीसुद्धा पुना अॅमॅच्युअर्स क्लबने आत्मविश्वास व सांघिक कौशल्याच्या जोरावर अशा बलाढ्य संघाचा पराभव करून प्रेक्षकांना चांगलाच धक्का दिला.

सॉफ्टबॉल हा खेळ सुरुवातीस महाराष्ट्रात फक्त शाळा व महाविद्यालयातूनच खेळला जात असे. परंतु महाराष्ट्रात पुणे सोडून इतरत्र हा खेळ म्हणावा तसा कोठेच खेळला जात नाही. परंतु राष्ट्रीय पातळीवर जेव्हा ह्या खेळाच्या स्पर्धा भरविण्यास सुरुवात झाली तेव्हांपासून गेल्या चार वर्षात ह्या खेळास विशेष

महत्त्व प्राप्त झाले आहे. तरीसुद्धा सर्वसामान्य क्रीडाप्रेमी प्रेक्षकाला ह्या खेळाची काहीच माहिती नसल्यामुळे त्यांना ह्या खेळात विशेष औत्सुक्य वाटत नाही. तरीसुद्धा गेल्या चार वर्षांतील वाढत्या प्रोत्साहनाची दखल घेऊन 'महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन'ने खेडोपाडी ह्या खेळाचा प्रचार करण्याची जबाबदारी घेऊन त्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत.

अमेरिकेत ज्याला 'बेसबॉल' म्हणतात तोच, हा खेळ होय. हा खेळ निरनिराळ्या ठिकाणी 'राऊंडर्स' ह्या नावानेसुद्धा प्रसिद्ध आहे. विशेषतः इंग्लंडमध्ये राऊंडर्स हा खेळ फारच लोकप्रिय आहे. अमेरिकेत बेसबॉल ह्या खेळास अतिशय महत्त्वपूर्ण स्थान असून हौशी खेळाडूंचा हा खेळ म्हणून ओळखला जातो. थोडक्यात हा खेळ असा : प्रत्येक संघात ९ खेळाडू असतात. पंचानी टॉस केल्यावर दोन्ही संघात फलदाजी व क्षेत्ररक्षण अशी विभागणी होते. क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघात प्रत्येक बेसवर १ असे ४ खेळाडू असतात. फलंदाज उभा राहतो त्या बेसला 'होमबेस' असे म्हणतात व त्यावरील बेसमनला 'कॅचर' असे म्हणतात. ह्या खेळामधील गोलंदाज हा 'पिचर' ह्या नावाने ओळखला जातो. पिचरच्या उजव्या बाजूस दुसऱ्या व तिसऱ्या बेसमधील खेळाडूस 'शॉर्ट स्टॉप' असे म्हणतात. क्षेत्ररक्षणातील उरलेले ३ खेळाडू 'लेग लाँग,' 'सेंटर लाँग' व 'ऑफ लाँग' ह्या नावाने ओळखले जातात. पंचांनी 'बॉल इन प्ले' म्हटल्यावर पीचर पिचींग करू शकतो. पिचरचा बॉल हा फलंदाजाचा खांदा व गुडघा यांच्यांमधून व होमबेसवरील पंचकोनावरूनच जावा लागतो तरच तो बॉल बरोबर आहे असे समजतात. अशा बॉलला 'स्ट्राईक' असे म्हणतात. चेंडू जर चुकीचा असेल तर 'बॉल' असे म्हणतात. असे ४ बॉल लागोपाठ पिचरने टाकल्यास फलंदाजाला १ बेस फ्री मिळते. परंतु असे ३ स्ट्राईक झाल्यास व फलंदाज मारू न शकल्यास फलंदाजाला बाद करण्यात येते. एक फलंदाज चारही बेसवरून परत होमबेसवर पोहोचल्यास त्याची १ संपूर्ण धाव धरण्यात येते. फलंदाज बेसवर पोहोचायच्या आत बेसमनच्या हातात बॉल असेल तर फलंदाज औट समजला जातो. असे ३ खेळाडू बाद केल्यावर साईड चेंज करण्यात येते. अशाच प्रकारे ५ इनिंग्ज खेळल्या जातात व खेळ संपल्यावर ज्या संघाच्या धावा जास्त असतील तो संघ अजिंक्य समजला जातो. ढोबळ मानाने सॉफ्टबॉल हा खेळ असा समजावून सांगण्यात येईल. तरीसुद्धा ह्या खेळातील इतर नियम अत्यंत गुंतागुंतीचे असल्यामुळे सर्वसामान्य प्रेक्षक ज्याला ह्या खेळाची अजिबात माहिती नाही अशाला हा खेळ फार कंटाळवाणा वाटतो !

सॉफ्टबॉलची बॅट ही आकाराने गोलाकार दंडुक्यासारखी व निमुळती असते. तिची लांबी, ३४ ते ३६ इंच असू शकते. फलंदाज आपापल्या उंचीप्रमाणे कोणतीही बॅट निवडू शकता. बॉल हासुद्धा क्रिकेटच्या चेंडूपेक्षा आकाराने बराच मोठा व खेळाच्या नावाप्रमाणेच थोडाफार सॉफ्टच असतो. परंतु त्यामुळे तो टोलवताना फलंदाजाला तंत्राप्रमाणे ताकदीचाही उपयोग करावा लागतो. त्यामुळे फलंदाजाला

'होमर' टोला मारणे हे अतिशय अवघड आहे. 'होमर' टोला याचा अर्थ फलंदाजाने स्वतःच्या एकट्याच्या फटक्यावर ४ ही बेसेस पळून पूर्ण केलेली १ धाव. ही धाव पूर्ण होण्यासाठी चेंडूचा पहिलाच टप्पा २०० फुटांच्या सीमारेषेपलीकडे पोहोचावा लागतो. अशा तऱ्हेचा फटका मारणे अतिशय अवघड असून ह्या खेळात 'होमर' टोला मारणे ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट समजली जाते व त्यासाठी खऱ्या कसबदार फलंदाजाची आवश्यकता असते. अशा तऱ्हेचे फलंदाज हे संघाचे कणेच म्हणावे लागतील. त्याचप्रमाणे क्षेत्ररक्षणाच्या बाबतीतही 'पिचर' व 'कॅचर' हा संघाचा कणाच असतो. चांगल्या पिचरला जर चांगल्या कॅचरची साथ नसेल तर त्या संघाची क्षेत्ररक्षणाची बाजू लगडी पडते.

सध्यातरी पुण्यात सॉफ्टबॉलचे ६ क्लब्ज् अस्तित्वात आहेत. वर्षभर त्यांच्या आपापसात खुल्या स्पर्धा चालू असतात. ह्या स्पर्धांत शाळा व कॉलेजेसपण सहभागी होतात. त्याचप्रमाणे पुण्यात ह्या खळाचे आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन सामनेसुद्धा भरविले जातात. सध्या आंतरविद्यापीठ सामन्यात ह्या खेळाचा समावेश करण्याचा विचार चालू असून त्यामुळे ह्या खेळास विशेष 'दर्जा' प्राप्त होईल असे मला वाटते.

ह्या खेळाची 'जोधपूर' येथे राष्ट्रीय संघटना असून त्या संघटनेतर्फे राष्ट्रीय पातळीवर ह्या खेळाचे सामने भरविले जातात. महाराष्ट्र, उ. प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरियाना, दिल्ली, मध्य प्रदेश इ. राज्ये ह्या सामन्यात भाग घेतात. आत्तापर्यंत अशा प्रकारचे सामने जोधपूर, हैद्राबाद, रोहटक व लखनौ येथे भरविण्यात आले आहेत. बहुतेक करून हे सामने डिसेंबर अखेरीस भरविले जातात व ह्या वर्षी हे सामने दिल्लीला भरण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्यातील महिलांनी ४ ही वर्षे ह्या सामन्यात अजिंक्यपद पटकाविले असून, पुरुष संघानेदेखील २ वर्षे हा मान मिळविला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील अनेक खेळाडू वैयक्तिक पारितोषिकाचेदेखील मानकरी आहेत. त्यात महिलांमध्ये माणिक मंत्री, शैला सावंत, भारती नवरे व पुरुषांच्यात सुरेश ढमके, अशोक मनोहर व प्रमोद जोशी यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

महाराष्ट्र राज्य क्रीडा विभागाने सॉफ्टबॉल खेळास मान्यता दिल्यामुळे या खेळास विशेष 'दर्जा' प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशनदेखील मुंबई, पुणे, नागपूर इ. शहरांत प्रदर्शनीय सामने भरवून ह्या खेळाचा प्रचार करण्याच्या प्रयत्नात आहे. तरीदेखील ह्यातील कित्येक गोष्टी करण्यासाठी आर्थिक मदतीची फार जरूर वाटते, तरी महाराष्ट्र राज्य क्रीडा विभागाने ह्या खेळाकडे शक्य तितके लक्ष पुरवून आर्थिक मदतीचा हात पुढे केला तर असोसिएशनच्या मेंबर्संना त्यांचे कार्य सुलभपणे पार पाडता येईल असे मला वाटते. □ □ □

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. M-H 649

हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील
एका तेजस्वी पर्वाची सत्यकथा
प्रथमच प्रकाशात येत आहे–

# ऑपरेशन उमरी बँक

लेखक : सुधाकर डोईफोडे, नांदेड

पुढील अंकी